# माणूस

# १५ ऑगस्ट



स्वातंत्र्यदिन विशेषांक १९७२ : एक रुपया

माणूस
शनिवार
१२ व १९ ऑगस्ट १९७२
शंभर पैसे

वर्ष : बारा
अंक : अकरा-बारा

वार्षिक वर्गणी
पंचवीस रुपये

परदेशची वर्गणी
पासष्ट रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव
पुणे ३०.

दूरध्वनी : ५७३५९

# माणूस

या अंकात


| | | |
|---|---|---|
| संपादकीय | श्री. ग. मा. | २ |
| सामान्य जन | प्रतिनिधी | ४ |
| मंगलधाम | रवींद्र पिंगे | ६ |
| स्वदेशी बहिष्कार | दादूमिया | १७ |
| एका रुखवताची कहाणी | रमेश मंत्री | ३३ |
| पाच भूमिगत आठवणी | नानासाहेब गाडगीळ | ४० |
| बॅटल ऑफ आराकान | कर्नल जाधव | ५४ |
| मी नेताजींना बघितलंय् | अशोक शहाणे | ६४ |
| फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ९५ |


मुखपृष्ठ : बाळ ठाकूर
रंगतरंग स्पर्धा : श्याम जोशी

# माध्यान्ह !

स्वातंत्र्याची पंचवीस वर्षे म्हणजे नेहरूंची, नेहरू कुटुंबाची पंचवीस वर्षे. १९४७-४८ पासून हे नेहरूयुग सुरू झाले. सध्या या युगाचा माध्यान्ह आहे – जरा कललेला.

या युगसूर्याचा प्रवास मात्र पश्चिमेकडून पूर्वेकडे असा झाला – चालू आहे. नेहरू गंगेचे सुपुत्र खरे. पण आपादमस्तक पाश्चिमात्य आचारविचारात रंगलेले, वाढलेले. त्यामुळे पश्चिमेचा, विशेषत: इंग्लंडचा थोर वारसा त्यांच्या रक्तात प्रारंभीच भिनला. या मुळावर त्यांनी थोडेबहुत पौर्वात्य – भारतीय संस्कार केलेही. पण अखेरपर्यंत प्रबळ राहिला, भारतीय भूमीत त्यांनी वाढवला – फुलवला तो एक पश्चिमेकडचा वृक्ष होता. प्लासीच्या लढाईनंतर पेरल्या गेलेल्या या भूमीत बीजाचा हा एक गगनावर गेलेला विस्तार होता.

संसदीय लोकशाही, संमिश्र अर्थव्यवस्था ही या वृक्षाला आलेली दोन मोठी फळे. इतर अनेक थोर व्यक्ती, पक्षोपपक्ष यांचा या फलनिष्पत्तीत महत्त्वाचा वाटा असला तरी हे फलित मुख्यत: नेहरूंच्या प्रयत्नांचे. नेहरूंची देणगी, नेहरूयुगाचा वारसा म्हणून जो काय मानायचा तो हा आणि–हा एवढाच.

तसा भारताचा शोध नेहरूंनी फार उशीरा घेतला. पूर्वेकडेही ते फार शेवटी शेवटी वळले. त्यामुळे एकीकडे लोकशाही आणि संमिश्र अर्थव्यवस्था यांची पाया-भरणी चालू असतानाच त्यांना दुसरीकडे असेही अंधुकसे जाणवू लागलेले होते, की हा पाया कुठेतरी कमी पडतो आहे, कच्चा राहतो आहे, वरचे बांधकाम बरे-चसे अर्धवट व एकतर्फी होत आहे. ५९ साली केलेल्या एका महत्त्वाच्या व्याख्या-नात ते म्हणाले होते : उद्याच्या भारताची घडण आजच्या आमच्या परिश्रमांवर अवलंबून आहे. औद्योगिक आणि इतर क्षेत्रात भारताची उन्नती होईल, विज्ञानात आणि तंत्रशास्त्रात त्याची प्रगती होईल, आमच्या लोकांचे जीवनमान वाढेल, शिक्षणाचा प्रसार होईल, आरोग्य सुधारण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होईल आणि कला आणि संस्कृती लोकांचे जीवन समृद्ध करतील याविषयी मला मुळीच शंका नाही...परंतु मला जी चिंता आहे ती केवळ आमच्या भौतिक प्रगतीविषयीच नव्हे तर आमच्या लोकांचे शील आणि त्यांच्या मनाची सखोलता याविषयी आहे. औद्योगिक प्रगतीने सामर्थ्य प्राप्त झाल्यामुळे वैयक्तिक संपत्ती आणि सुखी जीवन साध्य करून घेण्याच्या प्रयत्नात आम्ही आमचे व्यक्तिमत्त्व तर

गमावणार नाही ना ? तसे झाले तर ती एक शोकांतिका ठरेल....

नेहरूयुगाचा हा माध्यान्ह आहे, यशकीर्तीप्रतापाच्या नौबती दणाणता आहेत— तरी या शोकांतिकेचे सूरही दूरवरून ऐकू येण्याइतके स्पष्ट आहेत. भारत विजयी आहे, पण भारताचे मन खोलवर कुठेतरी आक्रंदतही आहे. ज्या गुणांसाठी भारत प्रसिद्ध होता ते गुण आज मातीमोल ठरलेले आहेत. नैतिकतेचे दिवसाढवळ्या वाभाडे निघत आहेत, सत्ता आणि संपत्तीने विद्येचा आणि विनयाचा बळी घेतला आहे. या प्रवृत्ती अशाच फोफावत राहिल्या तर जी लोकशाहीची, आर्थिक समृद्धीची वृक्षवाढ नेहरूंनी केली ती तरी टिकून राहणार आहे का ? कुठल्याही युगाचा अस्त हा नैतिकतेच्या अभावापासून सुरू होतो. नैतिकता याचा येथे अर्थ साधे मानवी सद्‌गुण. प्रामाणिकपणा, सत्याचरण, कष्टाची हौस, नाविन्याची ओढ, परस्पर सद्‌भाव आणि विश्वास, दानत, स्वार्थापलिकडे थोडे तरी पाहण्याची वृत्ती —कशाकशाचा सध्या मागमूस आढळेनासा झाला आहे. सत्तेने आणि संपत्तीने काहीही दाबता येते, खरीदता येते हे आजकालचे तत्वज्ञान बनू पाहत आहे. उद्याची जाणीव नाही. कालचा धरबंद नाही. आजचे आणि आत्ताचे तेवढेच पाहणे ज्याला त्याला अभिप्रेत दिसते आहे. हीच ती युगांताची चाहूल नसेल का ?

युगांतानंतर नवयुगाची सुरूवातही होतच असते. भारतात हे नवयुग केव्हा अवतरणार ? या युगाचा शिल्पकार कोण असेल ? सारे आज अनिश्चित, भविष्यात कोणीच डोकावू शकत नाही. एवढे मात्र खरे, की या युगाची लाट एखाद्या राजधानीतून, महानगरातून उसळलेली दिसणार नाही. सत्ता आणि संपत्ती याभोवती आज घोटाळणाऱ्या कुणातही ही लाट उठवण्याचे सामर्थ्य असणार नाही. एखादा टिळक, एखादा गांधीच अशी लाट उठवू शकतो.—जो नव्या मातीत घुसतो, नवी माणसे घडवतो, नीतीचे-चारित्र्याचे नवे मानदंड स्थापित करतो; थंड गोळ्यांचे मग अग्निगोलकांत रूपांतर होत असते. युगारंभ दिसू लागतो. अशी माती जागवणारा, हलवणारा आज कोण आहे ?

अशांच्याही फौजा लागतील—ज्या खेडोपाडी पोचतील, जंगलात राहतील. मोजक्या ठिकाणी साचलेली संपत्ती आणि सत्ता मोकळी करून समतेचे वातावरण सर्व देशभर निर्माण करतील.

कारण नेहरूंच्या लोकशाही युगानंतर अवतरणाऱ्या युगाचे नाव आहे समतायुग. हे समतायुग निर्माण झाले तरच लोकशाहीयुगही टिकणार आहे. त्यामागच्या स्वातंत्र्ययुगाचाही अभिमान बाळगता येणार आहे.

नाहीतर नुसतीच आपण गाणी म्हणत बसू—

आचंद्रसूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे । स्वातंत्र्य भारताचे ।

**—श्री. ग. मा.**




स्वातंत्र्याचा रौप्यमहोत्सव. . . .वगैरे. . . ठीक आहे.
**पण** सामान्य माणूस कोठे आहे ?

काही मुलाखती : माणूस प्रतिनिधी

## पांडुरंग जमदाडे

बॉंबे सेंट्रल स्टेशनात एखादा हमाल मोकळा भेटतो का हे पहात होतो. बोरीबंदर, बॉंबे सेंट्रल, दादरसारखी मोठी स्टेशने म्हणजे हमखास हमाल सापडण्याची जागा. तसे हमाल भरपूर भेटतात पण बोलणारा व बोलायला तयार होणारा हमाल पाहिजे होता. त्याच्या धंद्याचा वेळ घेतल्याबद्दल त्याला मोबदलाही देण्याची तयारी होती. दोघा-तिघांना गाठले पण बिचारे बोलायला बिचकले. शेवटी रस्त्यावरील एका कोपऱ्यात महानगरपालिकेच्या दिव्याच्या उजेडात सांज मराठा वाचत असलेला एक पाटीवाला गाठला. अंगाने मजबूत, दाढी वाढलेली, डोळे निस्तेज असलेला हा माणूस मध्यमवयीन वाटला. अंगाला घामाचा वास येत होता. कपडे मळकटलेले. पायात काही नाही. शेजारी त्याची जिवाभावाची सोबतीण–किंवा अन्नदात्री म्हणा हवं तर–अशी पाटी होती. त्याच्याशी स्मित केलं पण बोलके कसे करायचे ही पंचाईत होती. शेवटी जमले एकदाचे. जवळचा एक इराणी गाठला आणि त्याच्यासह बसलो त्या उपाहारगृहात.

चहा मस्कापाव आणि बिस्किटे मागवली. चहा येईपावतो ओळखदेख झाली.

त्याची विचारपूस करणारा मुंबईसारख्या महानगरात कोण असणार ? कारण एरवी अरेरावीने वागणारा माझ्यासारखा व्हाईट कॉलरवाला असे बरोबरीच्या नात्याने का वागतो याचे प्रश्नचिन्ह त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते.

नाव काय आपलं ?–मी

पांडुरंग जमदाडे.

असे हे भारी कष्टाचे, कमी पैसा मिळणारे हमालीचे काम का करता ?–मी

साहेब पोटासाठी कायबी करावे लागते. त्यात लाज कश्यापाई वाटायची ?

राहाणार कुठले म्हणजे कुण्या गावचे आपण ?

सांगलीकडचा आहे मी–जमदाडे.

तुमच्या घरी कोण कोण आहे ?

म्हातारी आय आणि एक भाव. भाव म्हातारीला पोसतो. मी एक दोन वर्षांनं गावाकडे जातो. म्हातारीला लुगडं चोळी नेतो.

मग एरवी म्हातारीला किती पैसे पाठवता महिन्याला ?

दिवसाचे म्होप कष्ट करणार तेव्हा कुठे पाव उसळ सुटते. मग म्हातारीला पैसे कसे पाठवणार ? भावही मोल मजुरी करून त्याचे व म्हातारीचे पोट भरतो.

बरं इंग्रजाचं राज्य जाऊन आपलं सरकार आलं, माहिती आहे ?

होय साहेब, माहिती आहे. मी काही बुका शिकलो आहे.

मग आपलं सरकार आलं हे बरं वाटत असेल नाही.

आपलं सरकार आहे, बरं आहे. पण गरिबांची अवस्था बघा खरी नाही साहेब. साहेब, सरकार आपलं आहे पण आमच्यासारखा गरीब रस्त्यावरच आहे. रस्त्यावरच झोपायचे. मायबाप सरकारचा पोलिस रात्री केव्हातरी त्याच्या दंडूक्याने ढोसकतो आणि इथे झोपू नको असे सांगतो. दिवसभर घाम पुसायचा आणि रात्रीही झोप नाही. एकतर गुडघ्यात डोकं खुपसायचं नाहीतर केव्हातरी पोलिसाच्या हातावर रुपाया ठेवायचा. कुठल्यातरी स्टेशनवरचा संडास व नळ वापरायचा.

याचा परिणाम कामावर होत असेल ?

होतो साहेब. पण करावे लागते काम. पोट आहे. पावसाळ्यात तर लई हाल होतात बघा.

मग हे सरकार गरिबांचं नाही असं वाटतं का ?

नाही साहेब, हे गरिबांचं सरकार नाही. सरकारचे मोठे लोक मोटारी उडवतात. आम्ही पायीच चालतो. कधी कधी रुपाया दोन रुपये एकदम मिळतील म्हणून, स्टेशनवर जास्त सामान घेऊन उतरलेल्या आणि टॅक्सीतून घरी जाणाऱ्या पॅसेंजरच्या टॅक्सीमागे धावत जातो साहेब. किती तरी वेळ धावाया लागतो साहेब पण पोटासाठी हे बी करतो आम्ही लोक.

पृष्ठ १२१ वर

## मंगलधाम



■ रवींद्र पिंगे ■

# वासुदेव बळवंत

कोकणचा काळपट हिरवा समुद्र मागे पडला. शाईसारख्या स्वच्छ, नितळ निळाशार अरबी समुद्राचं पाणी बोट कापू लागली. लांबच लांब डेकवर उभं राहून मी धुक्यात मावळलेल्या भारताच्या किनाऱ्याकडे पहात होतो. बोट पश्चिमेच्या रोखाने पुढे पुढे जात होती. कृष्णाची कांती मोत्याळ निळी होती म्हणजे नेमकी कशी होती ते सागराचं निळं अलौकिक रेशमी रूप पाहून लक्षात आलं होतं. तो कृष्णरंग मी डोळ्यांनी पोटभर प्यालो. मी निळी कमळं पाहिली होती. कमळासारखे निळे डोळे पाहिले होते. निळे लोलक पाहिले होते. निळंभोर आभाळ निरखलं होतं. निळे पंख पाहिले होते. पण अरबी समुद्राची पारदर्शक निळाई काही वेगळीच वाटली. त्या निळेपणात एक मंत्र होता. त्याचा अंमल मनावर पडला होता. इतक्यात जहाजावरचा एक तरतरीत अधिकारी डेकवर शेजारी

येऊन उभा राहिला. मी विचारलं, 'सगळा अरबी समुद्र असाच निळाभोर आहे?' तो उत्तरला, 'हो. थेट एडनपर्यंत हा एकच एक निळा रंग परसलेला आहे. आपली बोट आता एडनच्याच दिशेने चालली आहे.'

एडन! एडनच्या त्या अनपेक्षित उल्लेखाने माझी तंद्री भंगली. दीड हजार मैलांचा निळा गालीचा ओलांडून मन थेट एडनच्या रखरखीत खडकाळ भूमीवर पाखरासारखं उडून गेलं. वैराण, निष्पर्ण अरबी भूमीचा किनारा दिसू लागला. नुसती पिवळी धगधगीत तापलेली वाळू. वरून सूर्य आग ओकीत होता आणि खाली सागरतीरावर भडाग्नीच्या कराल ज्वाला ध्वजांसारख्या फडफडत होत्या. त्या अग्निशिखांनी बंडवाल्या वासुदेव बळवंतांच्या राजयक्ष्म्याने पोखरलेल्या निश्चेष्ट देहाला कवेत घेतलं होतं. भारतीय क्रांतिकारकांच्या एका अग्रदूताची अखेरची भस्मक्रिया त्या उजाड, तापलेल्या वाळूत चाललेली होती. अखेरच्या साक्षीला होते खडकांवर बसलेले पाच पंचवीस आफ्रिकन कावळे आणि बगळे!

काळजाचा दिवा करून जन्मभर ज्याने मातृभूमीच्या स्वातंत्र्याचं एकमेव स्वप्न पाहिलं, सुखी संसारावर तुळशीपत्र ठेवून ज्याने रामोश्यांबरोबर हत्यारबंद अरण्यवास सुखे पत्करला, जन्मठेपेच्या शिक्षेसाठी हजारो कोसांवरल्या अपरिचित परक्या देशात जाताना ज्याने मातृभूमीची फक्त मूठभर काळी मातीच काय ती धंगारा मानून नेली, त्या उग्र देशभक्ताची अखेर अशा भयाण एकाकी अवस्थेत व्हावी?

माझ्या मनःचक्षूंसमोर त्यांचं मुळातलं धिप्पाड, पण नंतर पिचलेलं उपरणंधारी शरीर दिसू लागलं. ते चांगले गोरेगोमटे, उंचेपुरे, तरतरीत होते. फोटोत लाखवार त्यांची जी पेटलेली क्रोधाग्न नजर पाहिली होती, ती पुन्हा भेटली. त्यांचा पनवेलपासून हाकेच्या अंतरावर असलेला शिरढोणमधला पेशवाई वाडा मी नुकताच पाहिलेला होता. त्यांची खेळातली बोकडाने ओढून न्यायची लाकडी गाडी पाहिली होती. त्यांच्या अगदी छोटेखानी आत्मचरित्राचं इंग्रजी भाषांतर, जे कोर्टापुढे साक्षीपुराव्यातला दस्तऐवज म्हणून पोलिसांतर्फे सादर करण्यात आलेलं होतं आणि ज्याची मूळ अस्सल मराठी प्रत सरकारी फायलीतून आता हरवल्याचं अधिकृतरीत्या सांगण्यात येतं, तेही मी वाचलेलं होतं. ह्या सर्वांतून वासुदेव बळवंतांची एक मूर्ती नजरेसमोर साकारलेली होती.

शेकडो, हजारो भारतीय नेत्यांचे, नागरिकांचे फोटो पाहिले, पण नजरेत स्वधर्माचं पाणी लकाकताना दिसलं होतं फक्त बंडवाल्या वासुदेव बळवंत फडक्यांच्या, रामकृष्ण परमहंसांच्या आणि स्वामी विवेकानंदांच्या नजरेत. फक्त ह्या तिघा समकालीनांच्या नजरेतच काय तो खास त्यांचा स्वतःचा म्हणून अलौकिक ठसा आहे. बाकीच्यांच्या नजरेतला भाव रानफुलांसारखा सर्वत्र भेटणारा, दिसणारा आहे. रानफुलाचं म्हणून काही अंगचं सौंदर्य असतंच, पण त्याला अलौकिकाचा स्पर्श नसतो. जास्वंदाच्या उन्हात डुलणाऱ्या लालभडक टपोऱ्या फुलाला तो असतो.

# १५ ऑगस्ट १९७२

स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सवाचा हा सोन्याचा दिवस सारे राष्ट्र हर्षभराने साजरा करीत आहे.

गोवा, दमण व दीव स्वातंत्र्य, विकास व प्रगती यांचे एक दशक पूर्ण करीत आहे.

ह्या महत्त्वाच्या दहा वर्षांत गोवा, दमण, दीव या प्रदेशाने मारलेली आघाडी

- अन्नधान्यांचे उत्पादन सुमारे ४५ टक्क्यांनी वाढले.
- सर्व गावे व ५५ टक्क्यांच्यावर खेड्यांत वीज खेळविण्यात आली.
- सर्व प्रदेशांत मोठ्या प्रमाणावर वैद्यकीय सोयी उपलब्ध झाल्या. १००० रुग्णांच्या मागे येथे सरासरी २·४ इस्पितळ-खाटा उपलब्ध आहेत. सर्व भारतासाठी ही सरासरी ०·६ एवढी आहे.
- लघुउद्योगांच्या संख्येत दहा पट वाढ झाली. मध्यम स्वरूपाचे उद्योगात दरवर्षी वाढ होत आहे.
- कच्च्या लोखंडाचे उत्पादनात ५१ टक्के वाढ झाली व त्याच्या किंमतीत २० टक्के वाढ झाली.
- शाळा व कॉलेजे यांच्या संख्येत कितीतरी पटीने वाढ झाली.
- ग्रामीण विकासासाठी प्रदेशातील सर्व खेडी सहकारी चळवळीच्या कक्षेत आणण्यात आली.
- प्रवाशांच्या संख्येत झपाट्याने वाढ झाली.

आज स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सवाप्रसंगी गोवा, दमण, दीव प्रदेशातील जनता कल्याणकारी राज्याच्या प्रस्थापने-साठी झटण्याच्या आपल्या प्रतिज्ञेचा पुनरुच्चार करीत आहे व राष्ट्राचे सार्वभौमत्व व स्वातंत्र्य यांचे रक्षणार्थ सदैव सिद्ध राहण्याचा आपला निर्धार प्रकट करीत आहे.

माहिती व पर्यटन खाते – गोवा, दमण, दीव सरकार यांच्यातर्फे प्रकाशित.

वासुदेव बळवंतांची नजर जास्वंदाच्या फुलासारखी लालेलाल होती.

हे सर्व खरं. पण कितीही झालं तरी ती कल्पनाच. सत्यसृष्टीतले वासुदेव बळवंत फडके कसे होते ?

आनंदराव नावाच्या एका माजी तुरुंगाधिकाऱ्याच्या कृपेने ठाणे जेलच्या दफ्तरातला एक अस्सल कागद हाती पडला. त्याचं शब्दशः मराठी भाषांतर पुढे देतो. माझं भाष्य वगैरे करण्याचा प्रयत्न करीत नाही. आता देत आहे ते मूळ इंग्रजी कागदाचं शब्दशः भाषांतर आहे :–

## वासुदेव बळवंत फडके

१८७९

वासुदेव बळवंत फडक्यांबरोबर पुढील आरोपींवर गुन्हा शाबूत झाला आहे :–

१ : २७०९–गणेश लिंबा, वढूळ खुर्द गावाचा रामोशी.

२ : २७१०–भाऊ धाकू, शिक्रापूरचा रामोशी.

३ : २७११–कोंड्या लक्ष्मण, लोणी खुर्दचा न्हावी.

कलम : दरोडेखोरी, ३९५

प्रत्येकाला दहा वर्षांची सजा होऊन ठाणे येथे त्यांना १३–११–१८७९ रोजी आणण्यात आले आणि १८–११–१८७९ रोजी त्यांची अलीपूर तुरुंगात बदली करण्यात आली.

ठाणा १८७९

तक्ता क्रमांक ३

१८७९ साली ठाणे तुरुंगात सजा भोगीत असलेल्या कैद्यांची माहिती देणारी खतावणी.

| | |
|---|---|
| १. क्रमांक | २६७१ |
| २. कैद्याचे आणि त्याच्या पित्याचे नाव | वासुदेव बळवंत फडके |
| ३. जात, वंश किंवा समूह | ब्राह्मण |
| ४. धर्म | हिंदू |
| ५. वय | ३२ |
| ६. उंची | ५ फूट १० इंच |
| ७. पावलाचं माप | ११ इंच |
| ८. छातीचा घेरा | ३४ इंच |
| ९. मस्तकाचा घेरा | २० इंच |

| | |
|---|---|
| १०. कैद्याचे वर्णन, विशेषता न पुसटता येणाऱ्या खुणा किंवा चेहरेपट्टीवरील किंवा एकूण ठेवणीतील वैशिष्टये. | छातीवर सहा तीळ; पोटावर एक तीळ; पाठीवर पंधरा तीळ; खांद्यापासून खाली दोन इंच अंतरावर डाव्या हातावर खूणेचा एक पूर्ण व्रण आणि एक अर्धवट व्रण. |
| ११. रहिवासाचे ठिकाण | शहर किंवा गाव : ठाणे जिल्ह्यातील शिरढाणे, आता पुणे जिल्ह्यात अंतर्भूत. तालुका—पनवेल. जिल्हा—ठाणे. |
| १२. पूर्वीचा व्यवसाय | कारकून. |
| १३. लिहिता वाचता येते काय ? | लिहितो आणि वाचतो. |
| १४. पूर्वीच्या शिक्षा आणि गुन्हे | काही नाही. |
| १५. कुठल्या गुन्ह्यासाठी शिक्षा | १२२, १२१ अ, १२४ अ, ३९५ आणि ४०० कलमान्वये |
| १६. शिक्षा फर्माविणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव आणि पद | एन. एच. न्यूहॅम सेशन्स जज्ज, पुणे |
| १७. शिक्षेची तारीख | ७ नोव्हेंबर १८७९ |
| १८. तुरुंगात आगमनाची तारीख | १२ नोव्हेंबर १८७९ |
| १९. शिक्षेच्या स्वरूपाचा तपशील | जन्मठेप |
| शिक्षेची मुदत, दंड वगैरे | आजन्म |
| जन्म | ४ नोव्हेंबर १८४५ |
| एडनला बदली | ५ जानेवारी १८८० |

क्षयाच्या विकाराने एडन जेलमध्ये १७ फेब्रुवारी १८८३ रोजी दुपारी ४ वाजून २० मिनिटांनी देवाज्ञा.

तुरुंगाधिकाऱ्यांनी केलेली शाईची नोंद इथे संपते. ती वाळलेली आहे. मात्र, मातृभूमीच्या स्वातंत्र्याला आणि ते मिळविताना मध्येच गाठणाऱ्या मृत्यूलाच आपले मंगलधाम मानणाऱ्या ह्या आद्य क्रांतिकारकाची, आता स्वातंत्र्य भोगणाऱ्या सामान्य भारतीयांच्या हृत्पटलावर झालेली रक्ताची नोंद, कालत्रयीही वाळण्यासारखी नाही. वासुदेव बळवंतांच्या नावाला एक उग्र, उत्कट असा गंध सतत येत राहाणार.

वासुदेव बळवंतांना जेमतेम पस्तीस वर्षांचं आयुष्य लाभलं. त्यातली पंधरा वर्षं त्यांनी ब्रिटीश सरकारची कारकूनी करण्यात काढली. मुंबईच्या ग्रँड मेडिकल कॉलेजातही ते कारकून होते. कारकूनी करीत असताना आजारी आईच्या सेवेसाठी त्यांना रजा मिळाली नाही. तिथे पहिली ठिणगी पडली. मग त्यांना एकूण

साहेबी राज्याबद्दलच घृणा उत्पन्न झाली. हत्यारबंद रामोशांना हाताशी घेऊन त्यांनी शस्त्रबळावर इंग्रजी साम्राज्य उलथविण्याचा घाट घातला. स्वतःच्या तरुण पत्नीलाही बंदुक चालविण्याचं शिक्षण दिलं. फौजफाटा जमा केला. तिच्या खर्चासाठी श्रीमंत सावकारांवर ढाके घातले. पण वासुदेव बळवंतांच्या सहकाऱ्यांना त्यांचा ध्येयवाद कळू शकला नाही. स्वातंत्र्यापरते अंतिम हित दुसऱ्या कशात नाही आणि ही बंडाळी अखेर एका महान मंगल क्रांतीला जन्म देणार आहे, हे वासुदेव बळवंतांचे मूलतत्त्व त्यांचे रामोशी आणि धनगर साथीदार आकलन करू शकले नाहीत. त्यामुळे वासुदेव बळवंतांची फार पळापळ झाली. मद्रास राज्यातल्या कर्नूल जिल्ह्यातल्या शैलमल्लिकार्जुनाच्या मंदिरात कंटाळून ते शेवटी अनुष्ठानास बसले. ह्याच मंदिरात बसून त्यांनी स्वतःच्या जीविताची हकीगत लिहून काढली. तिथे पोलिस मागावर आले, म्हणून वासुदेव बळवंत निजामीत शिरले. निजामीतच त्यांना २९ जुलै १८७९ रोजी गिरफ्दार करण्यात आलं. १८ फेब्रुवारी १८७९ ते २९ मे १८७९ ह्या कालखंडात त्यांनी रोजनिशी लिहिली होती. ती आता अभ्यासकांच्या सोईसाठी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.


## एक श्रावण सवलत : पहा आणि घ्या !

गो. नी. दाण्डेकर यांच्या शैलीदार, मधुर भाषेतील
तीस रुपयांची तीन संग्राह्य पुस्तके फक्त वीस रुपयांत !

**श्रीगुरुचरित्र** मूल्य १० रुपये

तेजस्वी, रसाळ, प्रासादिक प्रमाणग्रंथ, कुशल संपादन आणि सुयोग्य टिपा.

**सुबोध श्रीगुरुचरित्र** मूल्य १० रुपये

श्रीगुरुचरित्र या पुण्यदायक ग्रंथाचा मधुर भाषेत संपूर्ण सुबोध अनुवाद. या ग्रंथामुळे श्रीगुरुचरित्र वाचनाचा भक्तिपूर्ण आनंद अनेक पटींनी वाढणार आहे.

**भावार्थ ज्ञानेश्वरी** मुल्य १० रुपये

ज्ञानेश्वरीचा रसाळ भाषेत–आजच्या मराठीत सुबोध भावार्थ.
या ग्रंथामुळे ज्ञानेश्वरीचा आनंद घेणे सुलभ झाले आहे.

तिन्ही पुस्तके फक्त वीस रुपयांत अगर कोणतेही एक पुस्तक साडेसात रुपये.
टपाल खर्च दोन रुपये. तुमच्या पुस्तक-विक्रेत्याकडे मागा अगर–

**मॅजेस्टिक बुक स्टॉल** गिरगाव, मुंबई ४.– शनिपार पुणे २

ग्रंथ जगाशी परिचित राहण्यासाठी 'ललित' मासिक वाचा.

कुठे पनवेलच्या शीवेबाहेरचं हिरव्यागार वृक्षात गुरफटलेलं शांत गाव शिरढोण नि कुठे अरबी समुद्राच्या पलीकडल्या वालुकामय तीरावरचं रखरखीत, खडकाळ निष्पर्ण शहर एडन ! वासुदेव बळवंतांची घोर फरफट मात्र शिरढोणपासून थेट एडनपर्यंत, म्हणजे जन्मापासून थेट मृत्यूपर्यंत झाली. माणसं जातात. मग ती धोपट-मार्गी असोत की झपाटलेली असोत. प्राणांवर स्वातंत्र्याचा मंत्र पडलेले फडकेही त्याच प्रारब्धांकित अटळ दिशेने गेले. मागच्यांसाठी त्यांनी ठेऊन दिली आहे छोटीशी दैनंदिनी, मोडी लिपीत लिहीलेली दत्तपोथी, त्यांनी जन्मठेपेवर निघताना नेलेल्या चिमूटभर भारतीय मातीची दिलासादायक आठवण आणि आपण होऊन वरलेल्या मंगलधामाकडे दाभणासारखी रोखलेली त्यांचा स्वधर्म सांगणारी इमानी नजर ! ◻

# जॅक्सन मर्डर केस

मुंबईहून पुण्याला सडकेवरून जाताना ठाण्याची खाडी ओलांडावी लागते. ठाण्याचा विस्तार आता अगदी खाडीच्या तीरापर्यंत गेलेला आहे. सगळी वस्ती नवी. त्या वस्तीच्या पार्श्वभागी ठाण्याच्या तुरुंगाची जुनाट, भव्य तटबंदी, अंधारात एखादं प्रचंड अस्वल झुलत असावं, तशी सडकेच्या डाव्या हाताला लागते. सहसा त्या किल्लेवजा तुरुंगाच्या भिताडाकडे कुणाचं लक्ष जात नाही. माझंसुद्धा कधी गेलं नव्हतं. म्हणजे, नुसती गवत माजलेली जीर्ण तटबंदी दरवेळी दिसे. एक घट्ट बुरुज दिसे. आतल्या बाजूला कुठे तरी एक छप्पर आणि निशाणाची बोडकी काठी उंच गेलेली दिसे. त्यावरून मनावरून एक तर्क वाहून गेला होता की ही मामलेदार कचेरी असेल ! एरवी ओसाड किल्ल्यात दुसरं काय असणार ?

एकदा पत्रकारांच्या टोळीतून रपेट करताना भालचंद्र मराठे जुनाटपणाची कोळीष्टकं अंगावर सांचलेल्या त्या खाडीकांठच्या भयाण बुरुजाकडे बोट दाखवीत थंडपणे म्हणाला, ' रे, त्या बुरुजाजवळ फाशी कोठडी आहे. कैद्यांना तिथे सकाळी फाशी देतात. ' त्याचे ते संदर्भहीन शब्द हवेत विरले. आमचं वाहन हवा कापीत, रस्ता तोडीत सरसर पुढे गेलं. ठाण्याच्या पुलावरून मी अंग आकसून येणाऱ्या त्या तुरुंगाच्या तटबंदीकडे मागे वळून वळून पाहत होतो. मनात विचार एकच होता, ' ह्या बुरुजावरच काय जॅक्सनवधाचा प्रमुख आरोपी अनंत कान्हेरे फाशी गेला ? ह्या खाडीकाठावरच काय सूर्याला साक्षी ठेवून त्याच्या देहावर अग्निसंस्कार करण्यात आला ?'

ते तेवढ्यावरच राहिलं. आयुष्याची सायंकाळ अंधत्वाच्या अंधारात नाशिकला सध्या व्यतीत करीत असलेले जुने हत्यारी क्रांतीकारक गोपाळ गोविंद धारप ह्यांनी स्वानुभवावर लिहिलेली 'हुतात्मा अनंत लक्ष्मण कान्हेरे' ही बहुमोल पुस्तिका एकदा वाचनात आली. त्यातला कान्हेऱ्यांचा जुन्या संगीत नटासारखा दिसणारा गोंडस, निरागस फोटो पाहून, पुन्हा ठाण्याच्या कैदखान्याचा तो ओसाड परिसर आठवला. ते गवत माजलेले तट आठवले. ते फाशीखान्याचं उतरतं कौलारू छप्पर नि ती बोडकी झेंडाकाठी आठवली. धारप हे स्वत: जॅक्सन खून खटल्यात गोवलेले क्रमांक अकराचे आरोपी होते. त्यांना ह्या अभियोगात जबर शिक्षा झाली. सुटल्यानंतर ते राष्ट्रीय शिक्षणाकडे वळले. त्यांनी कान्हेऱ्यांच्या अलौकिक अंतकाळाबद्दल खरीखुरी माहिती लिहिलेली आहे.

अनंत लक्ष्मण कान्हेरे ह्या सतरा वर्षाच्या क्रांतीकारक तरुणावर, नाशिकचे गोरे कलेक्टर जॅक्सन ह्यांचा विजयानंद नाटकगृहात 'शारदा' नाटकाचा किर्लोस्कर संगीत नाटक मंडळीतर्फे प्रयोग चालला असताना, पिस्तुलाच्या बाराने खून करण्यात आल्याचा आरोप ठेवून, तो शाबीत करण्यात आला. त्यांना फाशीची शिक्षा फर्मावण्यात आली. कृष्णाजी गोपाळ कर्वे, वय वर्षे बावीस आणि विनायक नारायण देशपांडे, वय वर्षे एकवीस, ह्या दोघांना खूनाच्या कृत्यात मदत केल्याचा आरोप ठेवून तो शाबीत करण्यात आला. त्या दोघांनाही फाशी फर्मावली. फाशीच्या आदल्या रात्री कान्हेऱ्यांना गाढ झोप लागली होती. पंहारेकऱ्याने जागे केले तेव्हा ते उठले. अंतिम इच्छा स्नान करून देवाची प्रार्थना करण्याची आहे, असे त्यांनी सांगितले. पोटात काहीही नको म्हणाले. पण जेलरच्या आग्रहास्तव ते कपभर दूध प्यायले. शुचिर्भूत होऊन हातात भगवत्‌गीता घेऊन ते आनंदी मुद्रेने वधस्तंभाकडे चालत गेले. एकोणीस एप्रिल एकोणीसशे दहा ह्या दिवशी सकाळी सात वाजता ह्या तीन तरुण देशभक्तांना एकाच वेळी रांगेत उभे करून एकदम फाशी देण्यात आलं. त्यांचे मृत देह त्यांच्या नातेवाईकांनी मागितले. त्यांना नकार मिळाला. दुपारी बारा वाजता तुरुंगाच्या भिंताडाबाहेरच्या खाडीच्या काठावर त्यांच्या देहांना पोलिसांनी भडाग्नी दिला. राख ठाण्याच्या खाडीत फेकण्यात आली. वामन तथा दाजी नारायण जोशी, वय वर्षे बावीस, ह्यांना कटाचे साक्षीदार म्हणून अंदमानला जन्मठेपेच्या शिक्षेवर पाठविण्यात आले. अशीच जन्मठेपेची शिक्षा झालेले शंकर रामचंद्र सोमण, वय वर्षे एकोणीस, हे अंदमानच्या जहाजात पाय ठेवण्याच्या अगोदरच आजाराचे निमित्त होऊन येरवड्याच्या तुरुंगात एकाएकी निधन पावले. माफीचे दोन साक्षीदार सुटले.

ह्या खटला आणखी अडतीस जणांवर भरण्यात आला. त्याला नाशिक कटाचा खटला म्हणतात. राजकीय क्रांतीकार्यासाठी पिस्तुले, काडतुसे, दारुगोळा, वगैरे जमा करण्याच्या आरोपाखालच्या ह्या मंडळींना कमीअधिक मुदतीचा सश्रम

कारावास भोगावा लागला. त्या क्रांतिकारकांपैकीच सध्या उपेक्षेचे यातनामय जीवन भोगवट्याला आलेले नाशिकचे गो. गो. धारप हे एक.

ठाणे तुरुंगात एकोणीसशे दहा साली ज्या नोंदी झाल्या त्या अशा :–

## जॅक्सन मर्डर केस १९१०

| | |
|---|---|
| कैदी क्रमांक | ८९१ |
| कैद्याचे नाव | श्री. अनंत लक्ष्मण कान्हेरे, वय १७ वर्षे |
| जात | ब्राह्मण |
| धर्म | हिंदू |
| मापे | डावे पाऊल–९॥ इंच, उंची ५ फूट ४॥ इंच, छाती ३१॥ इंच, मस्तकाचा घेरा २१। इच |
| कैद्याच्या अंगावरील खूणा | १. दोन भुवयांच्या मध्ये गोंदवल्याची खूण. २. उजव्या गालावर कानाजवळ तीळ. ३. उजव्या खांद्याच्या हाडावर एक तीळ. दुसरा तीळ त्याच्या जरा वर. ४. डाव्या हातावर 'अनंत' अशी अक्षरे गोंदवलेली आहेत. ५. दोन बावळ्यांच्या मध्ये छोटा व्रण. डाव्या मांडीवर दोन व्रण. |
| गावाचे नाव | इम्माताऊ |
| तालुका | खेड |
| जिल्हा | रत्नागिरी |
| धंदा | विद्यार्थी |
| लिहू वाचू शकतो काय ? | शकतो. |
| गुन्हा | मनुष्यहत्या. आय. पी. सी. ३०२ |
| पूर्वीचा गुन्हा | नाही. |
| शिक्षा देणारे पद | स्पेशल बेंच, मुंबई हायकोर्ट |
| शिक्षेची तारीख | २९ मार्च १९१० |
| तुरुंगात प्रवेश | ३ एप्रिल १९१० |
| शिक्षा | फाशी |
| अपिलाचा निर्णय | अपिल केले नाही. |
| उघडलेल्या डाव्या जबड्याचे | |

| | |
|---|---|
| जमिनीपासून अंतर | ४ फूट १०। इंच |
| गर्दन | १३।। इंच |
| तुरुंगातील वजन | ११० पौंड |
| फासाचा घेरा आणि पायाखालची फळी यांच्यातील अंतर | ७ फूट ४ इंच |
| फासाच्या दोरीची लांबी | ७ फूट ६ इंच |
| लटकवलेल्या फासाची घेऱ्यासकट लांबी | ९ फूट ११।।। इंच |

१९ एप्रिल १९१० रोजी सकाळी ७ वाजता फाशी देण्यात आले. हिज मॅजेस्टीज हाऊस ऑफ करेक्शनचे भायखळ्याचे अधिक्षक साक्षीला हजर होते.

अशाच थंड शब्दातल्या नोंदी हुतात्मा कृष्णाजी गोपाळ कर्वे आणि विनायक नारायण देशपांडे यांच्या बाबतही केलेल्या आहेत. कर्वे विद्यार्थीच होते. वजन


**पॉप्युलर प्रकाशन**

१५ ऑगस्ट १९७२ या शुभदिनी
स्वातंत्र्यवीर सावरकरांचे स्फूर्तिदायक
महाचरित्र प्रसिद्ध करीत आहे

**स्वातंत्र्यवीर सावरकर**

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चरित्रलेखक
**धनंजय कीर**

मराठी अनुवाद
सुप्रसिद्ध मराठी लेखक द. पां. खांबेटे
पृष्ठे सुमारे ६५० डेमी (दुर्मिळ छायाचित्रे)

सवलतीची किंमत रु. २५।– मूळ किंमत रु. ४०।–

१५ ऑगस्ट ते १७ ऑक्टोबर १९७२ (विजयादशमी)
सवलतीच्या दरात पुस्तक मिळेल
पुस्तक विक्रेत्यांनी पत्रव्यवहार करावा

**पॉप्युलर प्रकाशन**
३५ सी, ताडदेव रोड, मुंबई ३४

एकशे सात पौंड. त्यांना फाशी देण्यासाठी दहा फूट अर्ध्या इंचाचा दोर लागला. देशपांड्यांनी व्यवसाय विणकर असा सांगितला. त्यांचे बहुतकरून माग असावेत. वजन सव्वाशे पौंड. त्यांना फांशी देण्यासाठी नऊ फूट पावणे बारा इंचाचा दोर लागला.

साठ पावसाळे जमीन धुपवून गेल्यानंतर यमपुरीतले हे सारे शब्द आज किती थंड थंड वाटतात !

हुतात्मा अनंत लक्ष्मण कान्हेरेंच्या अनेक जबान्या झाल्या. त्यातली काही वाक्यं खाली देत आहे. हेतू हाच की, शब्द ही अंतःकरणाची मातृभाषा असते ह्याचा पुनः एकवार प्रत्यय यावा.

माझे नाव अनंत, बापाचे नाव लक्ष्मण, आडनाव कान्हेरे, जात कोकणस्थ ब्राह्मण, उमर वर्षे १७, धंदा विद्यार्थी, आर्टस्कूल, औरंगाबाद, राहणार औरंगाबाद सकाळी औरंगाबादेहून आगगाडीने निघालो व दोनप्रहरी साडेतीन वाजता नाशकास आलो. मी घाटावर आलो. चहा प्यालो, तेथे मला नाटकाची जाहिरात मिळाली. नाटक पाहण्यास आलो. जॅक्सनसाहेब नाटकास येणार असे मला घाटावर कळले म्हणून मी नाटकास आलो. त्याचा खून करण्याच्या हेतूने आलो. जॅक्सन-साहेब यांनी रयतेवर जुलूम केला म्हणून मी त्यांचा खून केला. रिव्हॉल्वरने. दोन रिव्हॉल्वरे माझेपाशी होती. ती रिव्हॉल्वरे मी ३५ रुपयात हारासीमध्ये म्हणजे लिलावामध्ये औरंगाबादेस घेतली. औरंगाबादेस पुष्कळ हत्यारे हारासीने विकतात. मी सावरकर याजवर चाललेल्या खटल्याचे वेळी हजर होतो. त्या वेळी मी जॅक्सन-साहेब यांस पाहिले होते. तेव्हांपासून त्यांची ओळख धरली. सावरकर यास शिक्षा झाली तेव्हापासून मी त्यांस मारण्याचा बेत केला आहे. दुसरे कोणाचे सांगण्या-वरून केला नाही. ज्या आरबापासून मी रिव्हॉल्वरे घेतली त्याजपाशी काडतुसे खरेदी केली. मी रिव्हॉल्वरची प्रॅक्टीस औरंगाबादेस जंगलात करीत होतो. कलकत्त्यास दंगा होऊ लागला तेव्हापासून रिव्हॉल्वरची प्रॅक्टीस करण्याचा मला नाद लागला. शाळेत मी नावास जात असे. मी नाटकगृहाचे दरवाजाजवळ फळी आहे तेथे बसलो होतो. जॅक्सनसाहेब आत आल्यावर फळीवरून उडी मारली व एक त्याचे पाठीमागे वार मारला व बाकीचे पुढून मारले.

# स्वदेशी बहिष्कार

## लढ्याची आर्थिक पार्श्वभूमी

■ दादुमिया ■

'इंग्रज भौतिक विद्येत फार पुढारलेले होते, त्यांच्यामुळे आपण सुधारलो, इंग्रजी साम्राज्य नसते तर आपण पुढे आलो नसतो, इंग्रजांचे आमच्यावर महदुपकार आहेत, इंग्रजी भाषा म्हणजे वाघिणीचे दूध आहे, ते पिऊन आमचा उद्धार झाला......'

ही झाली सारी 'स्टॉक' विधाने.

मग खरी वस्तुस्थिती कोणती होती ?

खरे म्हणजे, आम्ही भारतीयांनी इंग्रजांचा उद्धार केला. भारत ब्रिटिश मायबाप सरकारजवळ नसते तर इंग्लंड आज आहे तसेच चौथ्या दर्जाचे राष्ट्र राहिले असते.

मग इग्लंडच्या माथी औद्योगिक क्रांतीचे श्रेय थापले जाते त्याचे काय ?

त्यासाठी इंग्रजांनी भारत देशाची किती लूट केली ते आधी समजून घेतले पाहिजे.

त्यासाठी १६०० साली स्थापन झालेल्या व १८५८ साली विसर्जित पावलेल्या ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभाराची थोडीफार जानपहेचान करून घेतली पाहिजे. या कंपनीचा सुरुवातीच्या १५० वर्षांचा इतिहास मोठा मजेदार आहे. या कंपनीचा व्यापार म्हणजे एकतर्फी व्यवहार (one way traffic) होता. कारण भारताच्या धनवान मोगल दरबारी वा पुढे मराठेशाहीस देण्यासाठी ह्या कंपनीजवळ काहीच नव्हते. या दरबारात आज ज्यास Luxury items म्हणतात अशा वस्तूंचा खप असे. पण अशा चीजा कंपनीजवळ होत्याच कोठे ? म्हणून ही कंपनी फक्त चांदी,



गुलामांची विक्री जोरात
सुरू झाली

सोने व परकीय नाणी भारतास देई. त्याच्या मोबदल्यात येथील उत्तम उत्तम पदार्थ ही कंपनी यूरोपच्या बाजारात आणीत असे. इंग्लंडच्या सरकारने ह्या कंपनीस फक्त ३०,००० पौंडाचा व्यापार करण्याचा परवाना दिला होता.

आणि हे इंग्रज ही चांदी कोठून आणत ? सांगायला शरम वाटावी असा सारा प्रकार आहे हा. हे व्यापारी गुलामांना विकून त्यातून होणाऱ्या नफ्यात चांदी विकत घेत व ही चांदी भारतीय व्यापाऱ्यांना देत. हे गुलाम वेस्ट इंडिज, स्पॅनिश, अमेरिका व आफ्रिका येथील असत. पुढे पुढे ही वाटमार करण्यासाठी अनेक कंपन्या पुढे आल्या व त्या स्पर्धेत व्यापार व लूट यांच्यामधील नफ्याचे प्रमाण घटू लागले.

या नफ्याचे प्रमाण घटू लागले. कंपनी चालायला तर पाहिजे ? म्हणून सत्तेतून व्यापार व व्यापारातून जास्त सत्ता हे धोरण कंपनीने आखले. बंगालच्या नबाबाने इंग्रजी गव्हर्नरास १७६२ साली पुढीलप्रमाणे तक्रार केली होती : ‘असले कसले तुमचे व्यापारी ? आमच्या शेतकऱ्याकडून तुमचे व्यापारी पाचपट किंमतीस माल विकत घेतात आणि बळाच्या जोरावर आपला एक रुपायाचा माल पाच रुपायांना विकतात !’ अर्थात आमच्या देशातील सत्ताधीश ही लूट नपुंसकपणे चालू देत. ह्या फिरंग्यांना कॉलर धरून बाहेर हाकलून देत नसत. विशेषत: बंगाली बाबू ! त्यामुळे ईस्ट इंडिया कंपनीच्या भयंकर प्रकारांना मर्यादाच नव्हती.

क्लाईव्हने ३० मार्च १७७२ रोजी इंग्लिश पार्लमेंटात केलेले भाषण महत्त्वाचे आहे,

‘The Company had acquired an Empire more extensive than any kingdom in Europe, France and Russia excepted. They had acquired a Revenue of four million sterling and a trade in

Proportion. It was natural to suppose that such an object would merit the most serious attention of the Administration...Did they take it into consideration? No, they did not. They treated it rather as a South Sea Buble than as anything solid and substantial. They thought of nothing but the present time, regardless of the future : they said, let us get what we can today, let tomorrow take care for itself; they thought of nothing but the immediate division of the loaves and fishes.'

हाच क्लाईव्ह कंपनीच्या एका डायरेक्टरला ३० सप्टेंबर १७६७ रोजी लिहिलेल्या पत्रात म्हणतो,

'Your revenues, by means of this acquisition, will as near as I can judge, not fall far short for the ensuing year of 250 lakhs of Sicca rupees, including your former possessions of Burdwan etc. Hereafter they will atleast amount to Rs. 20 or 30 lakhs more. Your civil and military expenses in time of peace can never exceed 60 lakhs of rupees; the Nobob's allowances are already reduced to 42 lakhs and the tribute to the King (the Great Moghul) at 26; so that there will be remaining a clear gain to the Company of 122 lakhs of Sicca rupees or 1,650,900 sterling.'


१७७३ साली पार्लमेंटला कंपनीच्या सहा वर्षांचे बजेट सादर करण्यात आले ते पुढीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| एकंदर वसुली – | १,३०,६६,७६१ पौंड |
| खर्च – | ९०,२७,६०९ पौंड |
| फायदा – | ४०,३७,१५२ पौंड |

क्लाईव्ह भारतात आला त्यावेळी त्याच्याजवळ एक दमडीदेखील नव्हती. मात्र भारतातून परत मायदेशी गेला त्यावेळी त्याचे स्वतःचे असे अडीच लाख पौंड होते. सत्तावीस हजार वार्षिक उत्पन्न असणारी त्याची भारतात खास इस्टेट होती! दोन वर्षांत आपल्यास एक लक्ष पौंड कमाई झाली असे तो स्वतःच सांगत असे!

स्क्रॅफ्टन् ह्या लेखकाने १७६३ साली 'Reflections on the Government of Indostan' ह्यात पुढील लुटालुटीची माहिती आमच्या विद्वान मंडळींसाठी लिहून ठेवली आहे :

'These glorious successes have brought near three millions of money to the nation; for, properly speaking, almost the whole of the immense sums received from the Subha finally centers in



मुलायम
नि नरम,
पण अतिशय
टिकाऊ
स्वस्तिक
एअर-ओ-फिल
चप्पल
तुमच्या
पाउलांची
शोभा वाढविते!
तुम्हाला चालताना मुळीच अडखळल्यासारखे वाटू नये, अवघडायला होऊ नये, उलट अगदी आराम वाटावा म्हणून खास कुशलतेने तयार केलेली स्वस्तिकची नवीन एअर-ओ-फिल रबर चप्पल तुमच्या पाउलांना कशी मऊमऊ वाटते नि सुखविते. तिची किंमतही किती माफक-सर्वांना परवडेल अशीच! कुटुंबातील सर्वांची आवडती चप्पल!
पुढील साइझेसमध्ये मिळते.
पुरुषांसाठी: ७/१०,
स्त्रियांसाठी: ३/६,
मुलांसाठी: ९/२,
स्वस्तिक स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लिमिटेड, चिंचवड, पुणे-१९.

England. So great a proportion of it fell into the Company's hands, either from their own share, or by sums paid into the treasury at Calcutta for bills and receipts, that they have been enabled to carry on the whole trade of India (China excepted) for three years together, without sending out one ounce of bullion. Vast sums have been also remitted through the hands of foreign companies, which weigh in the balance of trade to their amount in our favour with such foreign nations.'

ह्या कंपनीचा बंगालमधून पुढीलप्रमाण सारा गोळा होत असे :

| | |
|---|---|
| १७६४–६५ | ८,१७,००० पौंड |
| १७६५–६६ | १४,१०,००० पौंड |
| १७७१–७२ | २३,४१,००० पौंड |
| १७७५–७६ | २८,१८,००० पौंड |
| १७९३ | ३४,००,००० पौंड |

ही एका बंगाल प्रांतातील लूट !

जसजसे इतर प्रांत कंपनीच्या हाती येत गेले तसतशी कंपनीची कमाई वाढतच चालली.

पण ह्या संपत्तीचा फायदा ब्रिटिश वनियास पर्यायाने इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीस कसा झाला ?

अ : अठराव्या शतकाच्या मध्यावर इंग्लंड शेतीप्रधान देश होता. ग्लौसेस्टर-शायरची वस्ती १७५० मध्ये लँकेशायरपेक्षा जास्त होती. लोकरी कापडाचा प्रधान उद्योग होता. १७६० मध्ये कापड उत्पादन करणारी इंग्लंडमधील यंत्रे तत्कालीन भारतीय यंत्राएवढीच साधी होती, असे बेन्ससाहेबाने लिहून ठेवले आहे.

ब : १७५७ साली प्लासीची लढाई झाली. तेव्हापासून भारतीय पैशाचा पूर इंग्लंडकडे वळला.

क : इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीच्या पायऱ्या बघणे मनोरंजक ठरेल.

१ : इ. स. १७३३ साली फ्लाय शटल या शोधाचे पेटंट घेतले. पाण्याच्या जोरावर व्याटने रोलर स्पिनिंग मशिनचे पेटंट घेतले. आधुनिक इंग्लंडचा औद्योगिक इतिहास या ग्रंथांत जी. एच. पेरीस म्हणतो, " ...आणि तरीही ह्या दोन शोधांना मूर्त रूप येऊ शकले नाही."

२ : १७६४ साली स्पिनिंग व्हीलचा शोध लावला. १७६५ साली वॅटचे वाफेचे इंजिन तयार झाले. त्याचे ४ वर्षानंतर पेटंट घेतले गेले. १७६९ साली आर्क-राईटची वॉटर फ्रेम आली व ६ वर्षांनी कार्डिग ड्रॉईंग व स्पिनिंग मशिन्सचे त्याने

पेटंट घेतले. १७८५ साली कार्टराईटचे पॉवर लूम आले. इ स. १७८८ साली स्टीम इंजिन ब्लास्ट फर्नेसच्या मदतीस जोडले गेले. तरीही या यंत्रांना मोठ्या प्रमाणात उत्पादनासाठी वापरण्यासाठी प्रचंड पैशाची जरूर होती व ही संपत्ती पुरेशा प्रमाणात हाती आल्यावरच ह्या inventive genius ला वाव मिळाला, तोवर नाही, असे डॉ. कनिंगहॅम आपल्या Growth of English Industry and Commerce in Modern Times या ग्रंथात नमूद करतात.

३ : १७९० साली एडमंड बर्कने लिहून ठेवले आहे की, तो ज्या वेळी १७५० मध्ये इंग्लंडला आला त्या वेळी साऱ्या इंग्लंडात दहा-बारा बँकर्स होते. बंगालमधून संपत्तीचा पूर सुरू होण्यापूर्वी वीस पौंडाच्या नोटेने लोंबार्ड स्ट्रीटच्या बाहेर क्वचितच प्रवास केला, असे ब्रूक्स अॅडम्सने The Law of Civilisation and Decay मध्ये लिहिले आहे.

४ : इंग्रज सरकाराचे मायबाप सरकार म्हणून कोड कौतुक करणाऱ्यांची स्थिती ब्रुक्स अॅडम्स् या साहेबाने मोठी वाईट करून ठेवली आहे. हा साहेब लिहितो.

" The influx of the Indian treasure, by adding considerably to the nation's cash capital, not only increased its stock of energy but added much to its flexibility and the rapidity of its movement. Very soon after Plassey, the Bengal plunder began to arrive in London, and the effect appears to have been instantaneous; for all the authorities agree that the 'industrial revolution' the event which has divided the nineteenth century from all antecedent time, began with the year 1760 ...Plassey was fought in 1757, and probably nothing has equalled the rapidity of the change which followed......Before the influx of the Indian treasure and the expansion of the credit which followed, no force sufficient for this purpose existed; and had Watt lived 50 years earlier, he and his invention must have perished together. Possibly since the world began, no investment has ever yielded the profit reaped from the Indian plunder, because for nearly 50 years Great Britain stood without a competitor. From 1694 to Plassey (1757) the growth had been relatively slow. Between 1760 and 1815 the growth was very rapid and very prodogious ! "

इंग्रज बनियाजवळ राक्षसी उत्पादन करणारी यंत्रे आली. यंत्रे म्हणजे कच्चा माल पाहिजे. हा कच्चा माल खुद्द भारतातूनच आणला जाई.

पण प्रश्न होता गिऱ्हाईकांचा.

इंग्लंडने खूप मोठ उत्पादन केले, पण त्या गोष्टींना गिऱ्हाईकाने हातच लावला नाही तर ती यंत्रे काय करणार होती?

## स्वदेशी चळवळीचे महत्त्व

ही गोष्ट भारतात लो. टिळक यांनी सर्वप्रथम ओळखली. त्यासाठी त्यांनी स्वदेशी चळवळीस उत्तेजन दिले. कारण त्यांच्या डोळ्यासमोर इंग्रज बनिया भारतीयांना किती लुटत होता ते दृश्य सारखे उभे होते.

कच्चा माल भारताचा.

पक्क्या इंग्रजी मालासाठी गिऱ्हाईक भारतातलेच. त्यासाठी भारतीय उद्योगांवर बंदी आणून इंग्रज व्यापाऱ्यांनी आपले भले करून घेतले. अर्थात् इंग्रजी राजसत्ता त्यांच्यामागे उभी होती. त्यामुळे, इंग्रज बनियाची एक शतक चलती होती तर भारतीय उद्योगपति गुलामाचे जीवन कंठीत होता.

इंग्रज सरकाराने आपल्या बगलबच्चांसाठी कोणच्या लांड्यालबाड्या केल्या ते आजच्या पिढीने जाणून घेतले पाहिजे.

१ : भारतीय तलम कापड–सुती व रेशमी–एवढे सुंदर असे की इंग्लंडात इंग्रजी कापडास गिऱ्हाईकच नसे. फक्त अगदी गरीब लोक ते विकत घेत. या स्पर्धेमुळे ईस्ट इंडिया कंपनीचे काहीच चालत नसे. १७२० साली इंग्रज कापडाच्या व्यापाऱ्यांनी सरकारच्या मागे लागून लागून इंग्लंडमध्ये भारतीय कापडावर 'ड्यूटी' (कर) आकारून घेतली.

२ : अॅडम स्मिथचे नाव सर्वांना माहीत आहेच. देशाची संपत्ती या ग्रंथांत ह्या साहेबाने आपल्या बच्चांना पुढील मंत्र शिकवून ठेवला :

"It is in the interest of the East India Company, considered as sovereigns, that the European goods which are carried to their Indian dominions should be sold there as cheap as possible; and that the Indian goods which are brought from thence should bring there as good a price, or should be sold there as dear as possible. But the reverse of this is their interest as merchants. As sovereigns, their interest is exactly the same with that of the country which they govern. As merchants their interest is directly opposite to that interest."

३ : ईस्ट इंडिया कंपनीची भरभराट पाहून लंडनमधील पार्लमेंट सदस्यांचे डोळे दिपून गेले. ही भरभराट त्यांच्या बदमाषीमुळे होती हे उघड आहे. पण ही लूट कंपनीच्या डायरेक्टरांच्या खिशात सरळ जाते म्हणजे काय असा मत्सर या सदस्यांना वाटणे साहजिकच होते. ह्या असूयेचा स्फोट फॉक्स या खासदाराने १७८३ साली ही कंपनी बंद करावी अशी गर्जना करून सुरू केला. पुढील वर्षी पिटचे India Act हे बिल आले. आणखी तीन वर्षांनी कॉर्नवालीसला धाडण्यात

# घरात पुन्हा पाळणा हलण्यापूर्वी
# विचार करा

प्रथम पहिल्या मुलाची
सर्व तरतूद
नीट करायला
नको का ?



त्याला शिक्षणाचे पहिले वहिले धडे गिरवायला मदत. त्याच्यासाठी योजलेल्या इतर अनेक गोष्टींची निश्चित तरतूद. पण अशातच इतक्या लवकर आणखी एक मूल म्हणजे मग हे सर्व कदाचित अवघड होईल. तेव्हा असा प्रसंग टाळणेच श्रेयस्कर नाही का ?

लक्षावधि जोडपी जगात आज हेच करीत आहेत. ती परिस्थिती नीट अनुकूल होईपर्यंत दुसरे मूल होणे पुढे ढकलतात. **निरोध** वापरून तुम्हालाहि हे सहज करता येईल. **निरोध** हे जगातील फार लोकप्रिय असे पुरुषांनी वापरायचे रबरी संतति–प्रतिबंधक साधन आहे. लक्षात ठेवा, पाळणा लांबविण्याचा सर्वात सोपा व बिनधोक मार्ग म्हणजे **निरोध** अनेक पिढ्यांनी तो यशस्वी रीत्या अनुसरलेला आहे. मग तुम्हीहि निरोध का नाही वापरीत ?

**कुठेहि मिळते. फक्त 15 पैशांला 3 (सरकारी मदतीने).**




लांबविण्यास पाळणा, उपाय साधा सोपा जाणा

# निरोध ▼

लक्षावधींच्या पसंतीचे साधे बिनधोक संतति प्रतिबंधक

केमिस्ट, वाणी, जनरल स्टोअर्स, पानाची गादी वगैरे अनेक ठिकाणी सहज उपलब्ध.

davp 71/480

# माणूस
## रंगतरंग स्पर्धा

## स्पर्धा क्रमांक एक

१. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे.
२. स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी प्राण पणाला लावून झगडेन.
३. हिंदवी राज्य व्हावे हे तो श्रींची इच्छा.
४. आनंदीबाई, ध चा मा करून तू काय मिळवलेस ?
५. तुम्ही मला रक्त द्या, मी तुम्हाला स्वातंत्र्य देईन.
६. रामदासांच्या वचनाबाहेर मी कसा जाऊ ?
७. आझाद हिन्दसेना हीच देशाला स्वतंत्र करेल.
८. मुळावर घाव घातला की फांद्या आपोआप खाली येतात.
९. वंदे मातरम्.
१०. मस्तानीचे सौंदर्य म्हणजे कलाकृतीचा कळस.
११. काका मला वाचवा
१२. जन गण मन अधिनायक जय हे ।
१३. चरखा चला चलाके, लेंगे स्वराज्य लेंगे ।
१४. बचेंगे तो औरभी लढेंगे !
१५. करेंगे या मरेंगे ।
१६. मेरे जवान, मेरे किसान
भारतके बलवान पुत्र है ।
१७. आराम हराम है ।
१८. या निधड्या छातीच्या शिंद्यांच्या घराण्यास मरणाचे
काय भय ?
१९. भारतके हर पुत्र का मैं चाचा हूं ।
२०. कभी कभी छोटी छोटी बाते भी जादा काम देती है ।




मागील पानावर दिलेले थोरांचे उद्‌गार आपणा सर्वांच्या परिचयाचे आहेत. त्यात बरोबर दहा व चूक दहा असे मिळून वीस उद्‌गार आहेत. खालच्या बाजूस ज्यांनी हे उद्‌गार काढले त्यांची नावे व जवळच एक कंस आहे. बरोबर उद्‌गारांचा क्रमांक त्या त्या कंसात शाईने स्पष्ट लिहावा.

| | |
|---|---|
| [ ] नेहरू | [ ] गांधी |
| [ ] पहिला बाजीराव | [ ] नेताजी सुभाषचंद्र |
| [ ] शास्त्री | [ ] नारायणराव |
| [ ] टिळक | [ ] शिवाजी |
| [ ] बंकिमचंद्र | [ ] दत्ताजी शिंदे |



१. डाव्या व उजव्या बाजूस सारखी दिसणारी रेखाचित्रे आहेत. त्यातील चित्र क्रमांक १ हे बरोबर चित्र आहे. त्याची नक्कल करताना चित्र क्रमांक २ मध्ये एकंदर २५ चूका झाल्या आहेत. त्या शोधून काढा व त्यावर लाल शाईने अथव लाल पेन्सिलीने खूणा (गोल काढून) करा.

२. चित्र क्रमांक एकला एक चांगले शिर्षक सुचवा. शिर्षक पंधरा ते वीस शब्दापर्यंत असावे.

## स्पर्धेचे नियम

- स्पर्धा 'माणूस'च्या एकूण अकरा अंकात चालेल.
  १५ ऑगस्ट ते दिवाळी अंक.
- स्पर्धकाने प्रत्येक अंकातील एक स्पर्धापत्रक याप्रमाणे एकूण अकरा स्पर्धापत्रके पाठवणे आवश्यक आहे. अकरापेक्षा कमी स्पर्धापत्रके पाठवणारा स्पर्धक स्पर्धेतून बाद ठरवला जाईल.
  प्रत्येक स्पर्धा सोडवलीच पाहिजे असा नियम नाही.
  मात्र कोरे स्पर्धापत्रक पाठवणे जरूरीचे आहे.
- एकाच स्पर्धेसाठी कितीही स्पर्धापत्रके पाठवण्यास हरकत नाही.
- स्पर्धापत्रकात खाडाखोड असल्यास ते पत्रक रद्द ठरवले जाईल.
- ज्या स्पर्धापत्रकावर 'सप्रेम भेट' असा शिक्का असेल ती पत्रके स्वीकारली जाणार नाहीत.
- ही अकरा स्पर्धापत्रके दिवाळीनंतर एकत्रितपणे माणूस कार्यालयात पाठवावयाची आहेत.
- या स्पर्धेसाठी पाच मान्यवर व्यक्तींचे परीक्षक मंडळ नेमले जाईल. परीक्षक मंडळाची नावे दिवाळी अंकात प्रसिद्ध केली जातील.
- प्रत्येक स्पर्धापत्रकावर परीक्षकांकडून गुण दिले जातील व या गुणांची बेरीज करून सर्वाधिक गुणसंख्या मिळवणारा स्पर्धक बक्षिसास पात्र ठरवला जाईल.
- स्पर्धेचे निकाल २६ जानेवारी १९७३ च्या सुमारास माणूसमधून प्रसिद्ध केले जातील.

---

बक्षिस पहिले रुपये २००१ बक्षिस तिसरे रुपये १००१
बक्षिस दुसरे रुपये १५०१ बक्षिस चौथे रुपये ५०१
आणि प्रत्येकी १०० रुपयांची एकूण ५० बक्षिसे

---

स्पर्धकाचे नाव आणि पत्ता

---

माणूस साप्ताहिक : १५ ऑगस्ट १९७२ : किमत १ रुपया
१०२५ सदाशिव पेठ पुणे ३० ५७३५९

---

आले व कंपनीवर बराच ताबा मिळविला गेला. १७८५ साली वॉरन हेस्टींगवर केस करण्यात येऊन त्याने अफरातफर केली असे सिद्ध करण्यात आले. फ्रान्समध्ये क्रांति झाली व १८१३ मध्ये इंग्लंड–फ्रान्सचे युद्ध एकदाचे संपले. त्या काळापर्यंत इंग्रज व्यापाऱ्यांनी बरेच भारतीय सोने व चांदी लंडनच्या तिजोरीत भरली होती. फ्रान्सचा काटा निघाल्यावर १८१३ साली इंग्रज सरकार व इंग्रज व्यापारी यांनी भारतावर आपले लक्ष संपूर्णपणे केंद्रित केले. १८१३ सालपर्यंत भारत–इंग्लंड व्यापार मर्यादित होता. या वर्षानंतर इंग्रजी औद्योगिक इतिहासात एक नवे पर्व सुरू झाले. ते पर्व होते उघड लुटीचे.

४ : १८१३ सालापर्यंत भारतीय तलम कापडावर भारी कराची आकारणी असूनही इंग्रजी कापडापेक्षा ते कापड खुद्द इंग्लंडमध्ये ५० ते ६० टक्के स्वस्त होते आणि म्हणून त्या कापडावर ७० ते ८० टक्के 'ड्यूटी' वाढवा व आम्हाला संरक्षण द्या अशी मागणी इंग्रजी व्यापाऱ्यांनी व उद्योगपतींनी केली. सरकारने ती मान्यही केली. अर्थात् भारतीय व्यापारी व उद्योगपती यांना बळी देऊन ! मात्र हे असे धोरण स्वीकारले नसते तर मँचेस्टर व पैस्ले येथील कापडाच्या गिरण्या बंद करण्याची पाळी आली असती असे विन्सनसाहेब History of British India या आपल्या ग्रंथात defend करतो. इ. स. १८४० साली भारताहून इंग्लंडमध्ये येणाऱ्या सुती कापडावर १० टक्के, रेशमी कापडावर २० टक्के व गरम कापडावर ३० टक्के कर मायबाप सरकरने लावला. त्याच्या उलट इंग्रजी कापड मुंबईत वा कलकत्त्यात उतरले की त्यावर फक्त दोन ते तीन टक्के कर लावला जाई ! ही सरकारी आश्रयाने चालणारी इंग्रज उत्पादकांची व्यापारातील मक्तेदारी थेट विसाव्या शतकापर्यंत चालू राहिली.

५ : स्वस्त इंग्रजी माल व भारतीय निर्यातीवर दबाव यामुळे इंग्लंडची औद्योगिक स्थिती भलतीच सुधारली.

१८१४ साली इंग्रज व्यापारी दहा लाख वार कापड भारतात निर्यात करीत. दोन दशकांनंतर म्हणजे १८३५ साली ही संख्या पाच कोटी वारांवर गेली. या कालखंडात भारतीयांच्या व्यापारावर कोणता परिणाम झाला ? १८१४ साली इंग्लंडात तेरा लाख वार भारतीय कापडाची मागणी असे. १८३५ साली ती मागणी तीन लाख वार तर १८४४ साली फक्त ६३ हजार वार एवढी होती !

१८१५ साली भारतीय कापडासाठी इंग्लंड तेरा लाख पौंड भारतास देई. १८३२ साली ही विक्री फक्त एका लाखावर आली. याच काळात इंग्लंडचे विक्रीचे उत्पन्न मात्र २६,००० पौंडांवरून ४,००,००० पौंडांवर (म्हणजे सोळा पटीने) वाढले. ज्या भारताने आजवर इंग्लंडला कापड पुरविले त्या भारताने १८५० सालापासून इंग्लंडच्या कापडाच्या निर्यातीचा पाव हिस्सा स्वतःसाठी राखून ठेवला! आमच्या विणकरांचा तर धंदाच बसला. १८१८ ते १८३६ या कालखंडात इंग्रजी



**क्रूर पद्धतीने धंदे बंद केले**

कापडाची भारतातील विक्री ५,२०० पटींनी वाढली.

डाक्का, सुरत व मुर्शिदाबाद ही शहरे अत्यंत तलम कापडासाठी जगभर प्रसिद्ध होती. पण तेथील कोष्टयांचे आंगठेच तोडून टाकले गेले. पूर्वी डाक्क्याची वस्ती दीड लक्ष असे, ती १८४० त तीस हजारांवर आली असे पार्लमेंटच्या चौकशी कमिशनमध्ये सर चार्लस ट्रेवलीअनने सांगितले. सर हेन्री कॉटनने १८६० साली लिहिले, ' शंभर वर्षापूर्वी डाक्क्याहून ३० लाखांची मलमल इंग्लंडात जाई. १८१७ साली ती निर्यातच थांबली ! कोष्टयांची कला व विणकामाचे शास्त्र जणू संपले. एके काळी श्रीमंत असणारी घराणी आज देशोधडीस लागली आहेत. '

६ : चामड्याचे पदार्थ, धातुकाम व इतर धंद्यात हीच उतरती भाजणी दिसून येऊ लागली. इंग्रज सरकाराने काही भाट विकत घेतले व त्यांच्यामार्फत आपल्या मालाचा, आपल्या शास्त्रांचा, आपल्या संस्कृतीचा उदोउदो चालविला. आज त्या भाटांच्या विचारांचा पगडा असलेली माणसे सत्तेवर आहेत. त्यांना कदाचित ही विधाने पटणार नाहीत. म्हणून त्यांच्यासाठी खुद्द साहेबांचीच अवतरणे देतो.

' I do not agree that India is an agricultural country; India is as much a manufacturing country as an agricultural; and he would seek to reduce her to the position of an agricultural country seeks to lower her in the scale of civilisation. I do not suppose that India is to become England's agricultural farm; she is a manufacturing country, her manufactures of various descriptions have existed for ages, and have never been able to be competed with by any nation wherever fair play has been given to them. '

(१८४० मधील इंग्रजी पार्लमेंटमधील मार्टीनची जबानी.) ह्याने तरी आमच्या अंग्रेजाळलेल्यांचे डोळे उघडतील का ?

## इंग्रजी धोरण

तागडी हाती घेऊन आलेल्या इंग्रज बनियांनी भारतातून खूप धन गोळा तर केले, त्याच्या जोरावर जंगी उत्पादन चालू केले. त्यांनी बघितले, की या राक्षसी उत्पादनासाठी फार मोठे गिऱ्हाईक पाहिजे. भारत ही Colony म्हणून वापरायाची व ह्या कॉलनीतील रेडिमेड गिऱ्हाईक Develop करायचे असे धोरण इंग्रजांनी आखले. तेल, रंग, चामडी, ज्यूट (ताग) व कापूस हा कच्चा माल भारतात विपुल प्रमाणात उपलब्ध होता. त्यापासून पक्का माल भारतात तयार होऊ द्यायचा नाही, तो फक्त Made in Englnd हे लेबल असलेलाच राहील अशी खबरदारी इंग्रज सरकारने घेतली. त्यासाठी १८३३ सालापासून इंग्रज धनिकांनी भारतात मोठमोठ्या जमिनी खरेदी करून तेथे कच्चा मालाचा पुरवठा करणारे मळे बनविण्याचा सपाटा चालविला. त्या सुमारास गुलामांची पद्धत बेकायदेशीर ठरविण्यात आली होती. इकडे भारतात (व आफ्रिकेत) या गोऱ्या मळेवाल्यांनी आपल्या मळ्यात जवळ जवळ गुलामच राबविण्याची कोशीश केली होती. सत्तेपुढे शहाणपण नसते. त्यांची कृती कायदेशीरच ठरली होती. १८६० सालच्या नीळीच्या चौकशीचा (Indigo Commission) वृत्तांत आजही कोणी वाचला तर इंग्रज बनिये हे केवळ डाकू व लुटारूच नसून ते हिंस्र नरपशूही होते असे उद्‌गार तोंडातून न निघाले तरच आश्चर्य. रबर, कॉफी, चहा इत्यादी वस्तूंच्या मळ्यात परिस्थिती वेगळी होती अशातील भाग नाही.

इंग्रजांनी कच्च्या मालाची लूट कशी चालविली होती हे काही आकडे दिले तर सहज कळून येईल. विशेषत: ही लूट १८३३ नंतर एकदम वाढली. भारताचा कापूस १८१३ साली फक्त ९० लाख पौंडाचा निर्यात होई तो १८३३ साली सव्वा तीन कोटी पौंड वजनाचा निर्यात होऊ लागला. १८४४ साली हीच निर्यात नऊ कोटी पौंडांची झाली ! १८३३ साली पावणेचार हजार मेंढ्यांची लोकर भारताहून इंग्लंडला जात असे. १८४४ साली २७ लाख पौंड लोकर इंग्लंडला निर्यात होऊ लागली.

१८४९ साली भारतीय कच्च्या कापसाची निर्यात १७ लाख पौंड किंमतीची होती ती १९१४ साली सव्वा दोन कोटी पौंड किंमतीची झाली. १८४९ साली ६८ हजार पौंड किंमतीचा ताग इंग्लंडला निर्यात होई तो १९१४ साली एक लाख पौंडाचा निर्यात झाला.

इंग्लंड हळूहळू फक्त उत्पादक राष्ट्रच बनले. शेतीचा उद्योग इंग्लंडने जवळजवळ सोडून दिला. इतक्या सुजलाम् सुफलाम् Colonies हाती सापडल्यावर बिचाऱ्या गोऱ्या शेतकऱ्याने का म्हणून कष्ट करावेत ? इंग्लंडने इतर कच्च्या मालाबरोबर

धान्य पदार्थाचीही आयात सुरू केली. मुख्यतः गहू व तांदूळ १८४९ साली साडेआठ लक्ष पौंडाचा निर्यात झाला. ही निर्यात १८५८ साली ३७ लक्ष १८७७ साली ७९ लक्ष, १९०१ साली ९३ लक्ष व १९१४ साली १९३ लक्ष किंमतीची झाली.

मात्र या इंग्लंडच्या भारत धुवून नेण्याच्या धोरणामुळे भारतातील दुष्काळाचे प्रमाण वाढू लागले. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात सात दुष्काळ पडले व त्यात १५ लाख माणसे मरण पावली. त्या शतकाच्या उत्तरार्धात २४ दुष्काळ पडले. याचा अर्थ, हे प्रमाण चौपट वाढले. त्यात २ कोटी लोक कामास आले. 'भारत व त्याच्या समस्या' या ग्रंथात डब्ल्यू. एस. लिली या लेखकाने दुष्काळातील बळींचे आकडे दिले आहेत ते वाचून दयाळू मायबाप सरकारच्या पराक्रमाची सहज कल्पना येईल.

| कालखंड | भूकबळी |
|---|---|
| १८००–१८२५ | १०,००,००० |
| १८२५–१८५० | ४,००,००० |
| १८५०–१८७५ | ५०,००,००० |
| १८७५–१९०० | १,५०,००,००० |

भारताच्या स्वातंत्र्यार्थ एवढी माणसे लढून मरण पत्करती तर ?

काय चमत्कार, दयाळू इंग्रज सरकारने ह्या भूकबळींची संख्या वाढते का यासाठी इ. स. १८७८ साली एक चौकशी कमिशन नेमले. ह्या कमिशनने निर्भीडपणे लिहिले,...खेड्यात सारेच शेतीवर अवलंबून आहेत. पाऊसपाणी नाही आले, की सारेच्या सारे हवालदील होतात. त्यासाठी ह्या लोकांना निरनिराळे धंदे वाटून दिले पाहिजेत ! त्यायोगे, शेतीवरील जादा माणसे इतरत्र नोकरीस लावली जातील.'

नेमके सरकारला हेच तर नको होते.

चौकशी कमिशनचा केवळ फार्स होता.

१८९४ साली मँचेस्टरहून भारतात येणाऱ्या कापडावरील कर सरकारने काढून टाकण्याची घोषणा करताच महाराष्ट्रातील राष्ट्रवादी वर्तुळात मोठा असंतोष माजला. १४–६–१८९४ रोजी सार्वजनिक सभेत ह्या अन्यायाचा निषेध करण्यात आला. १८९६ साली सरकारने एक पायरी पुढे जाऊन मँचेस्टरच्या कापडाला उत्तेजन देण्यासाठी दरिद्री समाजाला लागणाऱ्या जाडयाभरड्या देशी कापडावरही साडेतीन टक्के कर बसविला. म्हणून लँकेशायरच्या गिरणीवाल्यांना ह्याही कापडाच्या विक्रीत चढाओढ करता येणे शक्य झाले.

'केसरी'तून लो. टिळकांनी त्यांच्याविरुद्ध ठणकावून लिहिले, 'सरकारने जरी अन्याय केला तरी त्याचा प्रतिकार करणे काही अंशी तरी तुमच्या स्वाधीन आहे.



लंकावस्त्रदहन

तो प्रतिकार कोणचा म्हणाल तर सर्वांनी देशी कपडा वापरावयास लागणे, हाच होय जोपर्यंत तुमच्या अंगात अशा प्रकारे प्रतिकार करण्याची शक्ती आली नाही, तोपर्यंत तुमच्या आवेदनास अथवा विधिमंडळातील तुमच्या प्रतिनिधींच्या युक्तिवादास कोणीही भीक घालणार नाही. यापेक्षा अधिक लिहणे अशक्य आहे.' टिळकांच्या प्रचारामुळे १८९६ साली न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी परदेशी कापडाची होळी केली. यास पुण्यात लंकावस्त्रदहन असे नाव पडले. १९०५ साली सावरकरांनी परदेशी कापडाची फार मोठी होळी केली. त्या प्रसंगी शिवराम महादेव परांजप्यांचे अत्यंत प्रभावी भाषण झाले. स्वदेशी, बहिष्कार व लंकावस्त्र-दहन यांच्या प्रचारामुळे १८९६ साली मुंबईत तेरा नवीन कापडाच्या गिरण्या निघाल्या !

'मराठा' पत्रात टिळकांनी पुढील उपदेश केला होता तो ध्यानात घेण्यासारखा आहे :

'Sceptical English opponets of young India have always been crying themselves hoarse, that India can never be a nation. Let this terrible crisis make us one. This is not a time for hesitations and scrupleles. All private differences must be sunk for the national cause, and natives and Anglo-Indians must unite to face the common enemy.'

दुर्दैवाने, गोखले व वाच्छां या soft करन्सी पुढाऱ्यांनी त्यास विरोध केला. त्यामुळे संतापून १७-३-१८९६ व ३१-३-१८९६ रोजी टिळकांनी जोरदार अग्रलेख लिहून या नेमस्तांचा समाचार घेतला.

लो. टिळकांनी साऱ्या भारतात सर्वप्रथम परदेशी कापडावरील बहिष्काराची चळवळ पुण्यात चालू केली. वंगभंगाची प्रतिक्रिया म्हणून १९०५ च्या उत्तरार्धात

छोट्या नायकाला प्रेरणा देणारी साठे माल्टेक्स बिस्किटे

पहिल्या पासूनच मी लढाऊ वृत्तीचा. लुटुपुटीची बंदूक घेऊन फिरण्याची व खेळण्याची भारी हौस. मध्येच भूक लागली तर खायला माल्टेक्स बिस्किटे! माल्टेक्स बिस्किटे माझी तब्येत ही अशी तुस्त राखतात. कारण त्यातील माल्ट व पौष्टिक घटक पूर्णपणे उत्साह वाढविणारी आहेत.




heros' SBC-38A

हे बहिष्काराचे लोण कलकत्त्यास पोचले. बंगाली देशभक्त तर क्रांतिकारक व एकजात जहाल! त्यांनी तर साऱ्याच विदेशी वस्तू त्याज्य ठरविल्या. विदेशी कापड, साखर व मीठ यावर कलकत्त्याच्या काँग्रेसचा विशेष कटाक्ष होता. कलकत्त्याच्या या बहिष्कार चळवळीस मनापासून सहाय्य कोणी केले असेल तर मुंबईच्या गिरणीवाल्यांनी! १९०७ मध्ये २४ गिरण्या बंद पडल्या होत्या त्या ह्या स्वदेशीच्या प्रचाराने चालू झाल्या. त्यामुळे मुंबईचा गिरणी कामगारवर्ग टिळकांना अन्नदाता म्हणून ओळखू लागला.

आणि सर भाटवडेकर व त्यांचे गुरू गो. कृ. गोखले यांनी १९०७ च्या मेमध्ये मुंबई इलाखा काँग्रेसच्या प्रांतिक परिषदेत स्वदेशीचा ठराव आणण्यासही बंदी केली होती!

स्वदेशी आंदोलन चालू झाल्यापासून देशी कापडाचे मूल्य सरासरी दहा टक्क्यांनी वाढले व विदेशी कापडाचे मूल्य पंचवीस टक्क्यांनी घटले. १९०७ साली देशी कापडधंद्यात मंदीची लाट येऊ पहात होती ती या चळवळीने टळली. याच काळात स्वदेशी विमा कंपन्यांची स्थापना झाली. स्पेसी व पिपल्स बँक या स्वदेशी बँकांची स्थापना याच काळातील. चिदंबरम् पिल्ले यांच्यामुळे स्वदेशी नौकानयनाची मडळी निघाली. तर कलकत्त्यास स्वदेशी तागाची गिरणी सुरू झाली. याच काळात जमशेदपूरच्या कारखान्यासाठी ८,००० भारतीयांनी टाटांना तीन महिन्यात त्या वेळी तीन कोटींचे भांडवल पुरविले! बंगालमध्ये टिळकांमुळे लाखो कोष्टयांना पुन्हा रोजी मिळू लागली. त्यामुळे १९०६ मध्ये चित्तगांवमध्ये पंधरा हजार मुसलमान कोष्टयांनी टिळकांचे प्रकट सभेत जाहीर अभिनंदन केले व त्यांनी काँग्रेसचे अध्यक्षपद स्वीकारावे अशी विनंती केली. उर्दू कवि हजरत मोहानी हे त्यामुळे टिळकभक्त बनले, मात्र या गुन्ह्यासाठी त्यांना दोन वर्षे खडतर कारागृहवासाची सजा मिळाली. या प्रचारामुळे मद्रास प्रांतातील अर्बथनॉट व बिन्नी या दोन इंग्रजी पेढयांनी दिवाळे काढले. त्यात मद्रासी जनतेच्या दोन कोटी रुपयांचे नुकसान झाले व त्यामुळे त्यांचा इंग्रजांवर अविश्वास वाढला!

बहिष्कारांची टिळकांची चळवळ बंगालमध्ये किती यशस्वी झाली त्याचे वर्णन ६–७–१९०७ च्या टाईम्समध्ये पुढीलप्रमाणे आढळते–

'There was a time when Police was a real object of fear in every village. He abused the authority, took bribes and extorted money. The Indian sub-inspectors acted as tyrants but today it is they who go in fear and trembling, taking the orders from the local boycott committees and hinderiring instead of helping any attempt to inquire into assault or any Swadeshi cases."

१९०६ च्या काँग्रेसला जात असताना उमरावतीच्या तरुण मंडळींनी टिळकांना

बहिष्काराविषयी विचारणा केली तेव्हा टिळकांनी त्यांना सांगितले, ' बहिष्काराचे तत्त्व पाच वर्षे प्रामाणिकपणे पाळले तर युरोपात युद्ध उत्पन्न झाल्यावाचून रहात नाही. आजचे सारे राजकारण व्यापाराच्या खुंटाभोवती घुटमळत आहे. युरोपातील प्रत्येक प्रबळ राष्ट्र जगातील व्यापाराच्या पेठा हस्तगत करण्याकरता रात्रंदिवस धडपडत आहे. हिंदुस्थानाची व्यापारपेठ इंग्रजांनी सर्वस्वी व्यापून टाकली आहे. ही गोष्ट यूरोपातील प्रत्येक बलाढ्य राष्ट्राच्या मनात शल्यासारखी बोचत आहे. आपल्यात इंग्रजांशी लढण्याचे सामर्थ्य नाही. तेव्हा इंग्रजांशी लढण्याला जे समर्थ आहेत, त्यांना तरी आपण चिथावू या. हिंदुस्थानची व्यापारपेठ इंग्रजांच्या मगरमिठीतून सोडवून जर्मनांच्या अथवा अमेरिकनांच्या हातात काही काळ आपल्याला देता आली तर इंग्रज लोक त्यांच्याशी हातघाईवर आल्यावाचून राहाणार नाहीत, आणि इंग्रज कोठे तरी भांडणात गुंतल्यावाचून आपणास आपले हातपाय पसरण्यास अवकाश मिळावयाचा नाही....स्वदेशीच्या कक्षेबाहेरील क्षेत्रातून इंग्रजांचे उच्चाटन करणे आपल्यास आवश्यक आहे. याकरिता बहिष्काराने शत्रूच्या शत्रूचे महाल्य मिळविणे आणि स्वदेशीने आपल्या आर्थिक उत्कर्षाचा प्रासाद उभा करणे असा हा दुहेरी डाव आहे !'

हा स्वदेशीचा मंत्र म. गांधींनी उचलला व आपल्या तत्त्वानुसार त्यात भर टाकून तो पुढे भारतीयांना दिला. □ □ □



# एका कवकवताची कहाणी

# या देवघेवीला आता प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे

■ रमेश मंत्री ■

लाच घेणे आणि देणे ही आता चोरून करण्याची गोष्ट राहिलेली नाही. या देव-घेवीला प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. पूर्वी लाच घेण्याबद्दल एकांतात, हळू आवाजात आणि इकडे तिकडे कोणी नसल्याची खात्री करून बोलावे लागत असे. पण आता बीअर नाही का उजळ माथ्याने घेता येत ? तसेच लाच घेणे ही क्रिया उघडपणे, निःशंक मनाने करता येईल. परवा तर एका तहसीलदाराने लाच मागितली म्हणून एका आमदारानी चांगली मिरवणूक काढून, वाजंत्री लावून लाच नेली. मात्र ते तहसीलदार प्रसिद्धीपराङ्मुख असल्याने रुखवत म्हणून आलेली ती लाच घेण्यास त्यांनी सौजन्यपूर्वक नकार दिला. चौकशी अंती असे कळले की लाच घेण्यास मिळालेली नवी प्रतिष्ठा त्या बिचाऱ्या लहान गावच्या तहसीलदाराच्या गावी नव्हती.

पण यापुढे मात्र असे होण्याचे कारण नाही. लाच घ्यायची म्हणजे काही अपवित्र कार्य करायचे ही भावना यापुढे टाकून दिली पाहिजे. एखाद्या मामलेदाराने मागितलेल्या लाचेचा त्याच्या छायाचित्रासह असा गौरवपूर्ण वृत्तांत आपल्या मान्य-वर दैनिकातून येण्यास हरकत नाही.

' जमिनीच्या मालकीत फेरबदल करण्यासाठी आणि भूहीनांना जमीन वाटप करण्याच्या कामासाठी तागडी गावचे मामलेदार यांनी पाचशे रुपयांची लाच आणि दोन कोंबड्या व मद्याच्या तीन बाटल्या मागितल्या. आपल्या इतमामास शोभेल अशा सोहळ्याने ही लाच आपल्या कचेरीत ताशे-वाजंत्रीसह आणली जावी असेही



हा लोकशाहीचा विजयच आहे

मामलेदारानी सांगितले. त्याप्रमाणे त्या शेतकऱ्याने सनई, ताशे, ढोल वगैरे लावून पाचशे रुपयांच्या नोटा, कोंबडचा व दारुच्या बाटल्या यांची यथासांग मिरवणूक काढली. ही मिरवणूक गावातील प्रमुख रस्त्यावरून गेली तेव्हा लाच देणारा आणि घेणारा या दोघांचेही लोकांनी कौतुक केले. छायाचित्रकारांनी रुखवताची छायाचित्रे घेतली आणि वार्ताहरांनी बातम्या टिपल्या. ही मिरवणूक दुपारी दोन वाजता मामलेदार साहेबांच्या कचेरीत गेली. दरम्यानच्या काळात सदरहू जमिनीचे काम कलेक्टर साहेबानी अधिक चौकशीसाठी आपल्याकडे मागवून घेतले होते. त्यामुळे मामलेदारांनी त्या शेतकऱ्यास सांगितले, ' आता प्रकरण ' वर 'पर्यंत गेले आहे. किमान दोन हजार रुपये, दहा कोंबडचा आणि परमिटवरच्या पाच बाटल्यांची मिरवणूक काढून जिल्ह्यांच्या गावी जा. '

लोकशाहीत लोकांचेच राज्य आल्याने तो शेतकरी दोन हजार रुपये आणि इतर वस्तू घेऊन जिल्ह्याच्या शहरी गेला. पण तेथे ताशे आणि सनई यांची मिरवणूक अगदीच गावठी दिसायला लागली. म्हणून त्याने बँड आणला. कारण कलेक्टर साहेबांच्या इतमामाला शोभण्यासारखे कार्य झाले पाहिजे. अर्थात मोठचा शहरी आल्यावर त्या शेतकऱ्याच्या मुलाखतीही घेण्यात आल्या. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या मुलाखतीत त्या प्रगतीशील शेतकऱ्याने सांगितले, ' माझे जमिनीचे काम व्हावे म्हणून मी ही लाच आपण होऊन कलेक्टर साहेबांच्याकडे घेऊन जात आहे. आता जमाना बदलला असल्याने मला पूर्वीसारखे हे व्यवहार चोरून करावे लागत नाहीत हा लोकशाहीचा आणि न्यायाचा विजयच आहे. '

' लांच देण्याचे एकंदर प्रमाण काय असते ?' असा प्रश्न विचारला असता त्या प्रगतीशील शेतकऱ्याने सांगितले, ' प्रत्येक अधिकाऱ्याच्या मनोरचनेनुसार आणि धाडसानुसार हे प्रमाण बदलते. पण साधारणपणे जेवढचा किंमतीचे काम असते

त्याच्या दहा ते वीस टक्के हे प्रमाण असते. आतापर्यंत सर्व व्यवहार मी लाच देऊनच केले आहेत, हे सांगण्यात मला कसलाही कमीपणा वाटत नाही.'

'आपण ही लांच समारंभपूर्वक देत आहात. मग तुम्ही स्वतः इतरांची कामे करताना लाच घेता का ?' एका पत्रकाराने जिज्ञासू बुद्धीने प्रश्न केला.

'अर्थातच. लाच ही देवघेव आहे. तिचा प्रवाह एकतर्फी वाहून कसा चालेल ? मी स्वतः सहकारी बँकेचा संचालक आहे. शेतकऱ्यांना कर्जे मंजूर करताना मी कर्जाच्या रकमेच्या पाच ते दहा टक्के लाच घेतो,' जेट युगातील त्या शेतकऱ्याने निस्संकोचपणे सांगितले. ते पुढे म्हणाले,' आपण मराठी माणसे मागे पडतो याचे प्रमुख कारण म्हणजे आपण लाच देण्यात आणि घेण्यात कुचराई करतो. धंद्यात धडाडी पाहिजे म्हणजे मराठी माणूस मागे पडणार नाही.'

या वार्ताहर परिषदेचा वृत्तांत शेतकरी श्री. पाटील यांच्या फोटोसह सविस्तर यावा म्हणून प्रत्येक वार्ताहरासाठी शंभर रुपयांचे एक एक पाकीट देण्यात आले होते. त्यावरून हे प्रगतीशील शेतकरी नुसते बोलणारेच नव्हते तर प्रत्यक्ष कार्य करून दाखविणारेही होते, याबद्दल सर्व वार्ताहरांची खात्री पटली. मग तेही लाच देण्याच्या समारंभात आणि मिरवणुकीत सामील झाले. ही मिरवणूक कलेक्टरांच्या कचेरीजवळ आली तेव्हा पोलिसांनी हा एक नेहमीसारखा निषेध मोर्चा असेल या समजुतीने ती अडवली. पण साहेबांच्याकडे लाच पोचती करायची आहे असा खुलासा बगाराम पाटील यांनी केल्यावर पोलीसांनी या रुखवताचे स्वागत केले.

कलेक्टरसाहेब वाटच पहात होते. कारण नवी मोटार घेतली होती आणि तिचा हप्ता द्यायचा होता. प्रगतीशील शेतकऱ्यांनी बँड लावून आणलेली लाच साहेबांच्या कचेरीत आली आणि ती ते घेणार इतक्यात सचिवालयातून तार आली की जमिनीचे हे प्रकरण तावडतोब राजधानीत ट्रॅन्स्फर करावे. त्याबरोबर साहेब शेतकऱ्याला म्हणाले,' आता हे काम माझ्या हाती राहिले नाही. म्हणून मी मोठ्या दुःखाने तुला निरोप देत आहे.' साहेबांचा गळा दाटून आला होता आणि ते अश्रुपूर्ण नेत्रांनी त्या नोटांच्या बंडलाकडे पहात होते. त्या नोटांचा वियोग त्यांना सहन होत नव्हता. पण आता प्रगतीशील शेतकरी श्री. बगाराम पाटील थांबायला तयार नव्हते. त्यानी दोन हजारांऐवजी पाचहजार रुपयांची लाच तयार ठेवली आणि राजधानीत येऊन पुनः थाटामाटाने मिरवणूक काढली. रुखवताच्या ताटात सर्व सजीव-निर्जीव पदार्थ घातले. सेक्रेटरीसाहेबांच्यापर्यंत हे रुखवत गेलं. काळ्याघोड्याजवळ ही मिरवणूक अडवली गेली नाही. त्यामुळे तिचे सभेत रुपांतर करावे लागले नाही की पोलिसांना लाठीमार वगैरे करावा लागला नाही. सेक्रेटरीसाहेबांनी रुखवताचा स्वीकार करताना पत्रकारांना सांगितले,' गांधीजी म्हणत असत की कोणतीही गोष्ट निर्भय मनाने करा. लोकमान्यानी तर मंत्रच दिला की स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणाले की

'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले ?' या सर्व थोर नेत्यांशी मी सहमत आहे. लोकशाहीत जनसंपर्क हा अत्यंत महत्त्वाचा असतो. लाच घेण्यात माझा मुख्य उद्देश जनतेशी संपर्क साधावा, लोकांचे प्रश्न समजून घ्यावे, देशाच्या समस्यांची चर्चा करावी आणि ते प्रश्न सोडविण्यास मदत करावी हाच असतो. आम्ही कोणतीही गोष्ट जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी करतो हे आता सर्वांना माहीतच आहे.'

दोन देशातील करारावर सह्या करताना पंतप्रधानांचे अथवा तशाच महनीय व्यक्तींचे फोटो घेतात, तसे पाच हजार रुपयांची लाच देताना प्रगतीशील शेतकरी श्री. बगाराम पाटील आणि सेक्रेटरीसाहेब यांचे फोटो घेण्यात आले. साहेबांनी शेतकऱ्याच्या कागदपत्रावर सह्या करून त्याने मागितलेली जमीन त्याला देऊन टाकली. फक्त भूहीनांनाच ती जमीन द्यायची होती. पण पाटलांच्या घरी दुसरी पाऊणशे एकर जमीन असली, तरी त्यांना ती जमीन देण्यात आली. ते आनंदाने आपल्या गावी गेले.

पण हे प्रकरण तेवढ्यावर संपले नाही. विरोधी पक्ष या नावाचे जे काही आमदार असतात, ते विधिमंडळात कधी कधी चमत्कारिक प्रश्न उपस्थित करतात. अशाच एका आमदाराने ही छायाचित्रे आणि मजकूर सादर करून त्याच्या योग्या-योग्यतेचा प्रश्न उपस्थित केला. सरकारतर्फे या प्रश्नाला नेहमीच्या सौजन्याने उत्तर दिले गेले, 'या प्रकरणाची चौकशी करून सरकारने अशा सूचना केल्या आहेत की, संबंधित अधिकाऱ्यांनी घेतलेली लाच या शेतकऱ्यास परत द्यावी.'

'पण लाच घेतल्याबद्दल ह्या अधिकाऱ्यांना शिक्षा काय ?' विरोधी पक्षाच्या नेत्याने विचारले.

'लाच परत द्यावी लागते, हीच त्याला शिक्षा आहे.' सरकारतर्फे सांगण्यात आले.

'आणि ज्याने लाच दिली त्याला कोणती शिक्षा देणार ?'

'श्रीमंतीचे अवास्तव प्रदर्शन त्याने करू नये अशी त्याला सूचना देण्याचे मामलेदारांना कळविण्यात आले आहे.' सरकारी उत्तर.

या प्रकारानंतर अनेक वर्षांनी प्रगतीशील शेतकरी श्री. बगाराम पाटील यानी आपल्या मुलाला सांगितले, 'वाजत गाजत लाच नेल्यामुळे माझा अतोनात फायदा झाला. माझे जमिनीचे काम फुकटात झाले. कारण लाच परत करण्याचा हुकूम सरकारने काढला असला तरी मला जमीन परत करायला सांगितले नाही. त्याही-पेक्षा विशेष म्हणजे ज्या मामलेदाराने आणि कलेक्टरने माझ्याकडून लाच घेतलीच नव्हती, त्यांनीसुद्धा आपण होऊन तेवढे पैसे माझ्याकडे गुपचूप आणून दिले. म्हणून तुला सांगतो, राम्या, तू रुखवत काढ.'

◻

# स्वातंत्र्य आणि साहित्यिक

## रौप्यमहोत्सव कसा साजरा करावा ??

आपल्याला स्वातंत्र्य मिळून पंचवीस वर्षे झाली.

साहित्यिक या रौप्य-महोत्सवप्रसंगी देशासाठी काय करू शकतील ? असा प्रश्न एक भल्या सकाळी मुख्य मंत्र्यांना पडला. त्यांनी आपल्या चिटणीसांना तो प्रश्न विचारला. पण त्यांनाही त्याचे उत्तर गवसेना. मुख्य मंत्र्यांच्या चिटणीसांनी प्रसिद्धी संचालकांना विचाले, 'काय हो, साहित्यिक देशासाठी काय करू शकतील ?' ते म्हणाले, 'काही कल्पना नाही बुवा. पण आपण त्यांनाच बोलावून विचारू की स्वातंत्र्याचा रौप्य-महोत्सव साजरा करण्यासाठी साहित्यिक कसा हातभार लावू शकतील ?'

मग अनेक साहित्यिकांना निमंत्रणे गेली की मुख्य मंत्र्यांनी आपल्याला चर्चेसाठी बोलावले आहे. साहित्यिक खूष झाले. मुख्य मंत्र्यांनी आपण होऊन बोलावणे ही काय लहान गोष्ट आहे ? सभेच्या पूर्वीच बरेच साहित्यिक हजर झाले. पण बहुतेकांच्या मनात एकच प्रश्न उमटत होता, 'मला साहेबांनी चर्चेसाठी बोलावले हे योग्यच आहे, कारण मी मोठाच साहित्यिक आहे. पण हा लेकाचा मध्येच कसा अडमडला ?' वशिल्याने किंवा कारकुनाच्या चुकीने त्या दुसऱ्या साहित्यिकाला निमंत्रण गेले असेल अशी प्रत्येकाने स्वतःची समजूत काढली. तरीपण मनातली मळमळ थांबली नाही.

चर्चेस सुरुवात झाल्यावर एका साहित्यिकाने सूचना केली. दुसऱ्याने तिला विरोध केला. तेव्हा पहिले साहित्यिक दुसऱ्याला म्हणाले, 'तुम्ही स्वतःला कोण समजता?' दुसरे पहिल्याला विचारते झाले, 'तुम्ही तरी कोण आहात?' चांगलेच भांडण जुंपले.

त्याच वेळी मुख्य मंत्र्यांनी पहिला निष्कर्ष काढला : स्वातंत्र्याच्या रौप्य-महोत्सव प्रसंगी साहित्यिक आपसात उत्तमपैकी भांडणे करू शकतील.

मग एक कवी आपली कल्पना सांगू लागले. ते म्हणाले, 'मला अजून सरकारने कसलीच मदत दिलेली नाही. इतर सरकारांनी दिली. पण या सरकारने नाही. ही रुखरुख माझ्या मनात अजून आहे. आत्ताच एका साहित्यिकाने सांगितले की स्वातंत्र्य लढा जेथे झाला तेथे जाण्यासाठी साहित्यिकांना सरकारने आर्थिक मदत द्यावी. माझा तिला विरोध आहे. त्यांना मुळीच मदत देऊ नये.'

कविराजांचे मत आगदी स्पष्ट आणि स्वच्छ होते. मला मदत द्यावी, इतरांना देऊ नये म्हणजे स्वातंत्र्याचा रौप्य-महोत्सव बेस्टपैकी साजरा होईल हे त्यांनी आवेशपूर्ण भाषणाने सांगितले. मुख्य मंत्र्यांनी दुसरा निष्कर्ष काढला : रौत्य महोत्सवाचा आणि साहित्यिकांना रौप्य मुद्रिका देण्याचा निकटचा संबंध आहे.

एक प्राध्यापक म्हणाले, 'आज खेड्यातील जनता आणि शहरी लेखक यांच्यात प्रचंड दरी आहे. ती कशी बुजवता येईल? तर आपल्या भागात निघणाऱ्या एका नियतकालिकास सरकारने आर्थिक मदत दिली तर ही दरी भरून निघेल.' इतकी प्रचंड दरी इतक्या सहजतेने भरून निघेल याची उपस्थितांना कल्पना नव्हती. मुख्य मंत्र्यांनी तिसरा निष्कर्ष काढला. कोणतीही दरी आर्थिक साहाय्याने भरू शकते.

चर्चेला काही साहित्यिका उपस्थित होत्या. पण त्या क्वचितच भाग घेत होत्या. बहुतेकींच्या चेहऱ्यावर मुख्यमंत्र्यांचे आमंत्रण आले एवढ्याचेच समाधान झळकत होते. आपल्या उपस्थितीचा पुरावा म्हणून हजेरीपत्रकावर सह्या केल्यावर आपले काम झाले म्हणून काही साहित्यिका निघूनही गेल्या.

इकडे एक कवी बोलत होते. त्यांनी चालू महिन्यात एका मासिकात आलेली आपली कविता म्हटली. काही वर्षांपूर्वीची कविताही त्यांनी म्हटली. एरवी रोख रक्कम पदरात पडल्यावाचून काव्यवाचन न करणारे हे कवी आता मोफत काव्यगायन का करीत आहेत याचा उलगडा होईना. पण थोड्याच वेळाने समिती वगैरे नेमली जाणार आहे अशी कुणकुण लागल्यावर थोडा प्रकाश पडला.

एका साहित्यिकाने सूचना केली, की महाराष्ट्रातल्या लेखकांनी विदर्भातली पिके पाहण्यास यावे म्हणजे त्यांना हरित क्रांती समजेल. का बुवा? महाराष्ट्रात पिके नाहीत का? एका लेखकाने शेजाऱ्याला हळू आवाजात विचारले. शेजारी कुजबुजला, 'गप बसा हो. विदर्भातली पिके पाहण्यासाठी प्रवासभत्ता तरी मिळेल.'

मुख्यमंत्र्यांनी मनाशी चौथा निष्कर्ष काढला. स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सवासाठी साहित्यिक प्रवासभत्ता घेऊ शकतील.

कोणीतरी सांगितले, की आपण इथे बिस्किटे खाऊन चर्चा करतो हे काही बरे नाही. ते तर खरेच. कारण बिस्किटे म्हणजे ब्रिटिशांची आठवण. ती साम्राज्यवादी बिस्किटे अशा मंगलप्रसंगी तरी खाऊ नयेत. पण आता कोणाचा काही इलाज नव्हता. कारण मघाशीच सर्वांनी आपल्या समोरच्या बिस्किटांच्या बशा रिकाम्या केल्या होत्या. साहेबांच्या चिटणीसांना ही सूचना मात्र एकदम पसंत पडली. पुढच्या मीटिंगचा खर्च कमी झाला. बिस्किटे न खाऊन स्वातंत्र्याचा रौप्यमहोत्सव साजरा करणे हाही एक मार्ग आहेच.

इतक्यात कोणीतरी म्हणाले, 'पहिल्या दर्जाचे लेखक कोणत्याही सवलती घेत नाहीत. हेमिंग्वेनंच चक्क तसा आदेश दिला आहे.'

आता आली का पंचाईत ? आपण पहिल्या दर्जाचे लेखक आहोत ही जमलेल्या प्रत्येकाचीच खात्री होती. पण मराठी लेखकांची बिचाऱ्या हेमिंग्वेला काय कल्पना? त्याने सर्वांना खोड्यात टाकले. 'बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर' अशीच ही शृंगापत्ती होती. अखेर मराठी लेखकांनी ठरवले, की आपल्याला दुय्यम दर्जाचे म्हटले तरी चालेल; पण सरकारी भत्ते, मोबदला वगैरे सवलती पाहिजेत बुवा. एकंदरीत दर्जाचा हा वाद खूपच रंगला. आपले वाक्य उतरून घेऊन पुढे कोणीतरी मराठी साहित्यिक भलता पेचप्रसंग निर्माण करणार हे हेमिंग्वेला आगाऊच कळले असावे. उगीच नाही त्याने आत्महत्या केली.

कुणीतरी सूचना केली, की या समयी स्वातंत्र्य-भावना प्रेरित करणाऱ्या कवितांचे संग्रह आणि ध्वनिमुद्रिका यांचे प्रकाशन सरकारने करावे. ही सूचना मान्य झाली. त्याबरोबर हजर असलेल्या तीन-चार कवींखेरीज इतर साहित्यिकांना कसेसेच वाटले. ते मनातल्या मनात म्हणाले, या कवींनी आपली सोय करून घेतली; पण आमचे काय ?

आता वेळ संपत आली होती. कोठल्याही सरकारी सभेचे भरत वाक्य म्हणजे समिती नेमणे. तशी समिती नेमली गेली—म्हणजे आधीच नेमली गेली होती, तीत आणखी काही नावे घातली गेली. समिती नेमली गेल्यावर सर्वांना बरे वाटले. कारण समितीत असणाऱ्यांना पुन्हा बोलावणे येईपर्यंत काय करायचे याची चिंता मिटली. समितीत नसणाऱ्यांना हायसे वाटले, की आता आपल्यावर काहीच करण्याची जबाबदारी नाही.

मुख्यमंत्र्यांनी अखेरचा निष्कर्ष काढला. रौप्यमहोत्सवासाठी मराठी साहित्यिक सरकारी समितीत जाऊ शकतील.

□ □ □

१२ ऑगस्ट १९७२

# पाच भूमिगत आठवणी

**▪ नानासाहेब गाडगीळ ▪**

## पंडितजी सातवळेकर व अच्युतराव

१९४२ चा चलेजावचा लढा ऐन जोरात चालू होता. जिकडे तिकडे धरपकड चालू होती. भूमिगत असलेल्या लोकांच्या हालचालींना जोर आलेला होता. सारखी धामधूम चालू होती. अच्युतरावांना इकडून तिकडून सारखे हालवावे लागत होते. कामाचा व्याप व योजना सारख्या वाढत होत्या. अनेकांच्या गाठी-भेटी घेऊन त्यांना ते पुढच्या योजनांचे आराखडे समजाऊन सांगत होते. अनेक ठिकाणाहून आलेल्या विविध बातम्यांवर चर्चा चालू असायची. अशातच अच्युत-रावांचा अनेक विषयावर स्वस्थ मनाने अभ्यास चालू असायचा. कारण त्यांना पातं-जल योग शास्त्रामधील काही विषयाबाबत पंडीतजी सातवळेकर यांची गाठ घेण्याची जरूरी उत्पन्न झाली. झाले, मग त्या दृष्टीने चाके फिरू लागली. पंडितजींच्या भेटीचा दिवस व वेळ ठरविण्यात आला. पंडितजी सातवळेकर त्यावेळी मुंबईस ऑपेरा हाऊस जवळ कच्छ टेरेसच्या अगदी वरच्या माळयावर कुणाकडे तरी येऊन उतरले होते. त्या ठिकाणाहून त्यांना घेऊन जाऊन अच्युतरावांची गाठ घालून देण्याचे काम माझेकडे होते. ताडदेव ब्रिजशाशी एक भली मोठी शाळा होती. शाळेपुढे एक कमान होती. त्यातून आत गेल्यावर डावीकडील इमारतीत तिसऱ्या मजल्यावरील एका क्लासरुममध्ये अच्युतराव येऊन वाट पहात होते. त्यांचेकडे मी पंडितजींना नेऊन सोडले. थोड्यावेळातच दोघांमध्ये चर्चा सुरू झाली. मी व विद्यालयाचे काही विद्यार्थी बाहेरच घुटमळत होतो. सर्वांना असे वाटायचे की, 'यांचे संभाषण केव्हा एकदा संपेल व दोघेही आपआपल्या ठिकाणी सुखरूपपणे



सारा महाराष्ट्र यांना ओळखतो
गाडगीळ सराफ म्हणून.
पण नानासाहेबांच्या आयुष्यात
असेही दिवस येऊन गेले
याची फार थोड्यांना कल्पना आहे.

केव्हा एकदा परत जातील.' आमच्या छातीचे ठोके वाढत होते. तर आत दोघांच्या संभाषणाला अगदी जोर आला होता. दोघेही शांतपणे आपले म्हणणे एकमेकांना समजाऊन देत होते. तसे पाहिले तर दोन्हेही स्थितप्रज्ञच. तास दीडतासाने त्यांचे बोलणे संपले. बाहेर रामामहाराज पंडित आपली अॅडलर गाडी स्टार्ट करून तयार होतेच. पंडितजींना त्यांचे घरी पोचते करून मी दुसऱ्या कामास गेलो. ◻

# हरिजन

गोवालिया टँकवरील अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अधिवेशन एखाद्या जत्रे-प्रमाणे फुटले. आणि जो तो करेंगे या मरेंगे हा दिव्य संदेश घेऊन स्वराज्य साधनेकरिता आपापल्या कल्पनेप्रमाणे कार्य करण्यास प्रवृत्त झाला. काँग्रेस श्रेष्ठींना निरनिराळ्या ठिकाणी पकडण्यात आले व निरनिराळ्या तुरुंगांतून त्यांची रवानगी होऊ लागली. त्यामुळे जनता फारच प्रक्षुब्ध झाली. हे असे घडणार याची थोडीशी कल्पना काही विचारवंत काँग्रेसजनांना होती. ते व काँग्रेस समाजवादी वगैरे काँग्रेसमधील तरुण गट भूमिगत होऊन संघटना करू लागले. पुढील कार्यक्रम आखून ते पार पाडण्याची तयारी सुरू झाली. देशभर जिकडे तिकडे असंतोषाचा डोंब उसळला होता. व स्वराज्याकरिता काहीतरी आत्मीयतेने केले पाहिजे असे सर्वांना वाटू लागले होते. लगेच जो कार्यक्रम पुढारी लोक जनतेस देऊ लागले तो कार्यक्रम जनता मनोभावाने, स्वार्थत्यागाने, व कशाची तमा न

# बाल संगोपन (खेड्यातील)

## डेन-टॉनिक आणि कॅल्सि-टोन

**डेन-टॉनिक**
(टीथिंग पिल्स)

लहान मुलांचे दांत
सुखाने उगवण्यास मदत होते.
आईस काळजी रहात नाही.

**१५० गोळ्या**
**कि. २ रुपये**

**कॅल्सि-टोन**
(टॉनिक पिल्स)

लहान मुलांचे वाढीस
उपयोगी. मूल गुटगुटीत व
निरोगी रहाते.

**१५० गोळ्या**
**कि. २ रुपये**

६ व्या महिन्यापासून वरील दोन्ही औषधे प्रत्येकी तीन तीन गोळ्या रोज सकाळ, दुपार, संध्याकाळ पाण्याबरोबर द्याव्यात.

सर्वत्र मिळतात.

## मोफत

महाराष्ट्र आणि गुजराथमधील ५०० च्या खालील वस्तीतील प्रत्येक गांवातील ६ महिन्याच्या खालील प्रत्येक मुलामुलीस वरील दोन्ही औषधे विनामूल्य द्यावयाची आहेत. तरी गावच्या सरपंचातर्फे कळवावे. म्हणजे विनामूल्य पाठविण्याची व्यवस्था करू. प्रत्येक वेळी सहा नावे तरी असावीत.

## होमिओ लॅबोरेटरीज

१७८ राजा राममोहन रॉय मार्ग,
गिरगांव, मुंबई ४.



बिनबोभाट काम
उरकले जाई.

बाळगता पार पाडू लागली. अशावेळी देशाचे मोठमोठे पुढारी तुरुंगात अडकून पडल्याने त्यांचे विचार लोकांना समजेनासे झाले. त्यातून काही दिवसातच महात्माजींचा हरिजनही बंद पडला. तेव्हा आम्हास कळले की, तो चालविण्याची जबाबदारी घेतलेल्या महादेवभाई व किशोरलाल मश्रूवाला वगैरेंनी पुढील बरेच अंकांना पुरेल इतके लिखाण व अग्रलेख लिहून ठेवले आहेत. पण ते छापण्याची व्यवस्था होऊ शकत नाही. लगेच आम्ही ते लेख गोळा केले. त्यांचा पहिला कागदाचा साठा होता तो आणला. मोठा हरिजन हा टाईप आणला. व पुढील अंक सांगलीस काढू लागलो. सांगलीस पाण्याच्या टाकीजवळ रतनलालजी शहा यांचा रत्नाकर नावाचा प्रेस होता. तिथे तो छापून, घडचा घालून सर्व ठिकाणी पाठविण्याची व्यवस्था केली. बहुतेक ठिकाणचे कार्यकर्ते येऊन अंकांची बंडले घेऊन जात असत. आपापल्या गावी वाटत असत. त्यात आज आठवतात ती नावे मसूरचे गरुड, बेळगावचे पुंडलिकजी कातगडे, समर्थ खादी भांडारचे नाना जोशी, नागोपंत चितळे, जनुभाऊ सहस्रबुद्धे, कै. गुरु केळकर, कै. पत्रावळे, नामु कऱ्हाडकर, व इचलकरंजीचे आर. के. पाटील वगैरे मंडळी असत. तिथून ते पुन्हा दुसरीकडे पाठवून वाटण्याची व्यवस्था करीत असत. प्रेसमधील कामगारांना त्यांना रोजचे काम झाल्यावर ठेऊन घेण्यात येई. व त्यांचेकडून ती छपाई बिनबोभाट करून घेतली जात असे. त्याकरिता त्यांना जादा मेहनताना देऊ केला तरी ते घेत नसत. त्यांच्या कार्याचे मोल फार मोठे आहे.

इतके महत्त्वाचे साप्ताहिक आणि इतक्या अवघड परिस्थितीत चालविणे, ही केवढी जबाबदारी होती. पण ती पत्करून पार पाडण्यास त्यावेळी काहीच वाटले नाही. त्यावेळी प्रत्यही येणाऱ्या संकटावर मात करणे व हरिजन चालू ठेवणे हे केवळ सांगली संस्थान होते म्हणूनच आम्हाला शक्य झाले. कागद संपला की

धावाधाव करून तो कुठूनही आणावा लागे. त्यास पडेल ती किंमत द्यावी लागे. त्याची खर्चाची तरतूद करणे हे ऐन वेळी येऊन पडणारे एक काम इतर कामाबरोबर असे. खरा अवघड प्रसंग आला तो आधी लिहुन ठेवलेले लिखाण संपल्यानंतर काय छापायचे हा. कारण आयुष्यात कधी वर्तमानपत्र वाचण्यापलिकडे ती चालविण्याची जबाबदारी पत्करलेली नव्हती. पण आता तीही पार पाडावी लागत होती. कार्य नेटाने चालू ठेवण्याचे मनापासून ठरविले की, कुणी ना कुणी भेटतो, हे खरे. आम्हाला सिटी हायस्कूलमध्ये असलेले इंग्रजीचे मास्तर कै. जगन्नाथराव पाटणकर याजकडून आम्ही मजकूर लिहून घेत असू. आणि चळवळीच्या मिळतील त्या बातम्या त्यात देऊन चळवळ जोरात चालावी म्हणून प्रयत्न करीत असू. पुढे पुढे मजकूर कमी पडू लागला. तेव्हा आणखी एक नवीनच कल्पना सुचली. सुभाष चंद्र बोस यांचे बर्लीन व टोकियो रेडिओवरून होणारे भाषण ऐकून, ते संकलीत करून हरिजनमध्ये छापत असू. लोकांना ते फार आवडे. पुढे ब्रिटिश हद्दीतून हे अंक कुठून निघतात याची जोरदार चौकशी सुरू झाली व हे अंक सांगलीस रत्नाकर प्रेसमध्ये छापले जातात असे कळल्यावरून तो छापखाना जप्त करण्यात आला. त्यामुळे छापलेला हरिजन बंद झाला. पण पुढे सांगली जवळच्या हरिपूर गावी सायक्लोस्टाईलवर हरिजनचे अंक बुलेटीनच्या स्वरूपात काढून सगळीकडे पाठविण्याची व्यवस्था पहिल्याप्रमाणेच केली.

कालांतराने चळवळ थंडावत गेली. पुढे काही दिवसांनी महात्माजींची व काही पुढाऱ्यांची तुरुंगातून सुटका झाली. ही हरिजनची कहाणी महात्माजींच्या कानावर गेली. तेव्हा ते उद्गारले की, 'यह बडी ताज्जुबकी बात है। हम सब लोक जेलखानेमे होते हुए भी हरिजन छपाई जाता था। यह कौन चलाता था? हम उसे मिलना चाहते है' असे विचारले गेल्यावर मी तो चालवीत होतो असे त्यांना कळले. तेव्हा ते पाचगणीस होते. तिथे त्यांनी मला भेटीस बोलावले. त्यावेळी मी मुंबईस होतो. तिथून पाचगणीस त्यांचे भेटीस जाण्याकरिता निघालो. बोरीबंदर स्टेशनवर मेलला बसून वाठार स्टेशनवर उतरून पाचगणीस जाण्याचे ठरविले. पण जे गृहस्थ मला नेण्याकरिता आले होते ते सांगू लागले की, 'महात्माजींची गाठ पडताच तुम्ही त्यांचेपुढे प्रथम आपले फार चुकले म्हणून स्वतःच दोन तोंडात मारून घेतल्या पाहिजेत. म्हणजे पुढचे सर्व ठीक होईल.' त्यावर मी म्हटले, 'बंद पडलेला हरिजन होईल तितके करून ऐन मोक्याचे वेळी मी चालू ठेवण्याचा प्रयत्न केला. ह्यात मला माझे काहीही चुकले आहे असे वाटत नाही. तर मी तसे कसे म्हणू?' तर ते गृहस्थ म्हणाले, 'तसा तिथला रिवाज आहे.' हे ऐकताच मी भेटीस जाण्याचे रहीत केले व सरळ सांगलीस गेलो. ◻

# कोल्हापूर बाँब प्रकरण

दुपारचे जेवण करून मी हात धुत होतो. इतक्यात एकचा ठोका पडला. तोच घराच्या मागील दारात कुणीतरी डोकावताना पाहिले. कल्पना आलीच की काही तरी भानगड असावी म्हणून. तसाच पुढे दारात गेलो तो मला बाहेर येण्या-बद्दल खुणावण्यात आले. माझे बाहेर रस्त्यावर लक्ष गेले. रस्त्यावर एक मोटार-गाडी उभी होती. तिथे जाऊन पाहिले तो एक रक्तबंबाळ मानवी गोळा कापसात व पांघरुणात गुंडाळलेला मला दाखविण्यात आला. तो पहाताच मला चक्कर आल्या-सारखे झाले. तसा अनुभव कधीच नव्हता. पण मनाचा धडा करून उभा रहाण्याचा प्रयत्न केला. क्षणाचाही विलंब न करता तो मानवी गोळा ताब्यात घ्यावा म्हणून मला विनविण्यात आले. मोटारीतून आलेली मंडळी घाबऱ्या घुबऱ्या इकडे तिकडे पहात होती. थोडा उशीर होईल तर घात होईल, पोलीस पाठलाग करीत आहेत, त्यांचे हाती सर्वच मंडळी सापडू असे सांगत होती. मी थोडक्यात चौकशी केली तर समजले की, १९३२ साली माझेबरोबर येरवडा जेलमध्ये १२ नंबर बरॅक मध्ये पार्टे नावाचा मुलगा होता. तो कोल्हापुरास बाँब तयार करीत असताना बाँब फुटून त्यात जखमी झाला. पोलिसांचा पाठलाग चुकवून, शेतात गाडी घालून, त्या मुलाचे सांगण्याप्रमाणे तुमचेकडे त्यास आणला आहे. लगेच मी मनाशी निश्चय केला की याची कुठेतरी व्यवस्था केली पाहिजे. म्हणून आलेल्या मंडळींपैकी दोघांना आठ दिवस त्याचे सेवा सुश्रुशेस आमचे इतर मंडळींबरोबर ठेवण्याचे ठरविले. मी मोटार तशीच माझा एक मनुष्य बरोबर देऊन I. C. S. द्रवीड यांचे बंगल्यात द्रवीड बंधू रहात होते, त्यांचेकडे पाठविली. आलेले इसमास तेथे उतरवून घेऊन जपण्यास सांगितले. मी डॉक्टरना घेऊन तिकडे येतो म्हणून निरोप दिला. लगेच मी कपडे करून कै. आप्पासाहेब सांभारे वैद्य यांना घेऊन द्रविडांचे बंगल्यावर गेलो. तिथे सर्व हकिगत ऐकली ती अशी :

कोल्हापुरास एका जुन्या वाड्यात सदर पार्टे नावाचा मुलगा बाँब तयार करण्याच्या प्रयत्नात असता त्याचा एकाएकी स्फोट झाला व काचेचे आणि पत्र्याचे लहान मोठे तुकडे त्याचे अंगात घुसून तो रक्तबंबाळ झाला. आणि बेशुद्ध होऊन तिथेच पडला. आवाजामुळे आसपासचे त्याचे मित्रमंडळ तिथे जमले. त्यांना ते दृश्य पाहून काय करावे ते सुचेना. त्यांनी त्या मुलास तसेच उचलून, त्याच घरात असलेल्या वरच्या माळ्यावर ठेवले. इतक्यात पोलिसांची धाड तिथे आली. पोलिसांनी इकडे तिकडे सगळीकडे पाहिले. पण सुदैवाने त्यांचे लक्ष माळ्यावर गेले नाही. खाली पोलिसांची चौकशी व शोधाशोध चालू असतानाच पार्टेला शुद्ध आली. बुटांचे आवाज व पोलिसांचे बोलण्याचे आवाज त्याच्या कानी पडले. काहीही



**सांभारे वैद्यांच्या औषधाने चमत्कार केला.**

आवाज अगर हालचाल न करता तो हे सर्व कान देऊन ऐकत होता. काही वेळाने निराश होऊन पोलीस परत गेले. जाताना त्यांनी पुराव्याकरिता तिथे पडलेले रसायन, भांडी व तुकडे वगैरे नेले. थोड्या वेळाने पार्टेचे एक स्नेही कुणाची तरी एक खाजगी मोटार घेऊन तिथे आले. त्यांनी तो लोळागोळा मोटारीत घातला. आता ह्याला कुठेतरी नेऊन ठेवले पाहिजे अशा विवंचनेत ते होते व आपल्यापरी कुणाची तरी नांवे घेत होते. पण पार्टेने, कोल्हापुरात आपल्याला ठेवणे स्वत:च्या व जिथे कुठे ठेवले जाईल त्यालाही ते धोक्याचे होईल. त्यापेक्षा आपल्याला सांगलीस लक्ष्मणराव गाडगीळ यांचेकडे नेऊन पोचते करा म्हणजे कुणालाच काळजीचे कारण नाही, म्हणून सांगितले. त्याच्या सांगण्याप्रमाणे त्या मंडळींनी पोलिसांचा डोळा चुकवीत शेतातून व आडरानातून मोटार दौडत आमच्या घरी दारात आणून उभी केली.

वैद्य सांभारे यांना त्याच्याकडे नेल्यावर त्यांनीही त्याची ही अवस्था पाहून दु:ख केले. पण धीर सोडला नाही व ह्या पेशंटला बरे करण्याचा जणू विडाच उचलला. लगेच ते कामाला लागले. सवाणा आणून त्याच्या शरिरातील काचेचे व पत्र्याचे तुकडे काढण्यास त्यांनी सुरवात केली. इतक्यात डॉ. देशपांडे यांनाही बोलावून आणले. त्यांनी ह्या कामी मदत केली. तेही डोळ्यांतील, तोंडावरील, कपाळावरील, नाकावरील तुकडे हत्याराने काढू लागले. लगेच सांभारे वैद्य घरी गेले. तिथून रानात जाऊन त्यांनी काही औषधी पाला गोळा करून आणला व इतर काही औषधी घालून तो पाट्यावर वाटला आणि एका बरणीत घालून ते थोड्याच वेळात ती बरणी घेऊन आले. त्यात साठलेला हिरवागार तवंग ते जखमांवर लावू लागताच त्याला थंडगार वाटू लागले. १५-२० मिनिटांनी पुन्हा तो तवंग लावा-

यचा. तवंग लावताच फार थंडगार वाटत असे. एकसारखे अहोरात्र १५-२० मिनिटांनी ७ दिवस जखमावर तो लेप लावावा लागे. रोज सांभारे वैद्य ते नवे वाटलेले मिश्रण तयार करून आणून देत. केव्हा केव्हा सुश्रुशेचे काम सोपविलेला नामू कऱ्हाडकर ते मिश्रण त्यांचेकडून आणित असे. ४।५ मंडळी नेहमी त्याचे खाणे, पिणे व औषधपाणी पहात असत. हे काम चालू असताच अशी वार्ता आली की, कोल्हापूराहून सी. आय. डी. आलेले आहेत. व सांगलीस हा आरोपी असल्याचे त्यांना माहीत झाल्याने ते त्याचे शोधात आहेत. अशा परिस्थितीत १।२ दिवसांनी आम्हाला त्यास निरनिराळ्या जागी हलवावे लागे. असेच एक दिवस त्यास आमच्या सराफ कट्टयाजवळील जैन वस्तीसमोर असलेल्या दत्तोबा ओतारी यांचे घरांतील अडगळीच्या माळ्यावर ठेवले असताना समोरच असलेल्या वस्तीमधील कुणाच्यातरी ही गोष्ट ध्यानी आली. ती अशा कारणाने की, सदर माळ्यावर त्याने गेल्या ५।१० वर्षांत कधीही दिवा लागलेला पाहिला नव्हता. म्हणून त्याची जिज्ञासा जागी झाली. एक दिवस तो दत्तोबा ओतारी यांचेकडे येऊन सांगू लागला की, 'तुमच्या घरच्या माळ्यावर भूत असावे असे वाटते. कारण इतके दिवसात मी कधीही तेथे प्रकाश पाहिला नाही. पण अलिकडे तिथे प्रकाश दिसतो. तुमच्या घरातही कोणी नवीन माणसे आलेली दिसत नाहीत. आहेत तीच माणसे आहेत. तरी प्रकाश कसा दिसतो ? तरी तिकडे लक्ष द्यावे.' ओतारीनी वर करणी काहीतरी सांगून वेळ निभावली व येऊन सांगू लागले की, 'आता त्यास तिथे ठेवणे धोक्याचे आहे. कारण वस्तीत बरीच मंडळी येतात. त्या गृहस्थाने जर इतर मंडळीस सांगण्यास सुरवात केली तर काही तरी घोटाळा होईल.' त्यांचे म्हणणे रास्त होते. त्याला पुन्हा दुसरीकडे हलवणे भाग पडले. त्याचे औषध, पाणी, सेवा, चाकरी सर्व व्यवस्थीत चालू होती. मला मध्यंतरी अच्युतरावांचे भेटीकरिता, पुढील कार्यक्रमाचे आखणीचे दृष्टीने जाणे जरूर होते. म्हणून मी चार दिवस मुंबईस गेलो होतो. परत येऊन एक दिवस मी दुकानात सकाळी १० वाजता गादीवर वसलो असताना पेशन्ट एकदम माझेपुढे येऊन उभा राहिला. मला म्हणू लागला, 'मला खर्चापुरते पैसे द्या मी आता मुंबईस माझे नातलग आहेत, त्यांचेकडे जाऊन काही दिवस रहातो.' असे म्हणत तो माझे पायावर डोके ठेऊ लागला. त्यास उठवून मी म्हटले, 'अरे तू आज दाढी का केलीस? एखादेवेळी हत्यार लागून सेप्टीक झाले असते. आता आणखी ४।६ दिवस राहून मग जा.' तेव्हा तो जातो म्हणून आग्रहाने परवानगी मागू लागला. त्याची प्रकृती व चेहरा पहिल्यापेक्षा सतेज व उजळ दिसत होता. अंगावर कुठेही तिळाएवढीसुद्धा खूण राहिली नव्हती. त्या औषधाने एवढा चमत्कार घडवून आणला होता. मी सारखा सांभारे वैद्यांच्या मागे लागलो होतो की, तुम्ही त्या औषधाचे मिलिटरीमध्ये प्रयोग करून दाखवा व पेटन्ट घ्या. तर त्यांचे कडून ते काही झाले नाही. हो हो म्हणत


एक दिवस ते हा लोक सोडून निघून गेले. मी पार्टेला खर्चास पैसे दिले व तो मुंबईस निघून गेला.

पुढे लढा संपल्यानंतर एक दिवस मी दादरला खादी भांडारात खादी घ्यावयास गेलो होतो. तिथून मी बाहेर पडतो तो अचानक ती स्वारी दत्त म्हणून पुढ्यात उभी. तो मला काही केल्या सोडेना. समोरच असलेल्या कापड व टेलरींगच्या दुकानात त्याने मला नेले. क्षणातच पाच पन्नास मंडळी जमली. एखाद्या छोटया सभेचा थाटच त्याने तेथे आणला माझी ओळख करून देताना एकच वाक्य त्याने उच्चारले, 'मी आज जो जिवंत दिसतो आहे तो केवळ त्यांचेमुळेच. माझे प्राण ह्यांनी वाचवले.' हे सांगताना त्याचे डोळे कृतज्ञतेने भरून आले होते. ◻

---

# वर्मा-कॅश

दुसऱ्या जागतिक लढाईच्या ज्वाळा एक एक देश भस्मसात करीत चालल्या होत्या. पूर्वेकडून जपान एक एक देश पादाक्रांत करीत पुढे पुढे येत होता. बर्माचे (ब्रह्मदेशाचे) स्वतंत्र सरकार कोल्हापूरच्या शालिनी पॅलेसमध्ये आपला परिवार घेऊन आश्रयास आले होते. कोल्हापुरात त्यांची हालचाल व वर्दळ वाढत होती. युद्धाच्या महागाईने बेजार झालेल्या इथल्या जनतेच्या उरावर हे व पोलंडचे परकीय लोक इथे आश्रयार्थ काय म्हणून ? त्यांचे मुळे महागाई दिवसेंदिवस आणखी वाढत चालली होती. परकियांची स्वतंत्र सरकारे हिंदुस्थानात व हिंदुस्थान मात्र परतत्र का ? हे युद्ध कुणाकरिता लढले जात आहे ? त्याच्याशी आपला काय संबंध आहे ? इथल्या लोकांना पारतंत्र्यात खितपत ठेऊन जगात स्वातंत्र्याचा डांगोरा पिटणाऱ्या सरकारला इथली साधन सामुग्री त्या करिता राबविण्याचा काय अधिकार ? इथल्या शिपायांचे रक्त त्याकरिता काय म्हणून सांडावयाचे ? त्यांचे बलिदान वृथा का घालवावे ? अशा विचारांनी इथली जनता ब्रिटिश सरकारवर चिडली होती. त्यातच इथे ठाण मांडून राहिलेल्या परकिय देशांच्या लोकांचे मिजासखोर वागणे व चाळे नजरेस आले व एक दिवस बर्मी सरकारचा खजिना लुटण्याचे व तो स्वातंत्र्य लढ्याच्या चळवळीच्या कामी आणण्याचे नेत्यांनी ठरविले. पुष्कळ दिवस बेत होत होते. पहाणी व योजना आखल्या जात होत्या. कोणत्या दिवशी खजिना बँकेतून नेला जातो, तो कसा जातो, बरोबर किती माणसे असतात, तो हस्तगत करावयाला काय काय साधन सामग्री लागेल, किती माणसे लागतील, याचा अंदाज घेतला जात होता. त्यावर चर्चा होत होती. अशाप्रकारे सर्व तऱ्हेची पाहणी व आखणी करून एक योजना तयार झाली. निवडक ५-५



धन्य त्या तरुणांची

तरुण त्याकरिता निवडले गेले. त्यांनी कसे जायचे, कुठे खजिना गाठायचा, तो कसा हस्तगत करायचा, हातोहात एकाने दुसऱ्यास, दुसऱ्याने तिसऱ्यास तो कसा द्यावयाचा हे सर्व ठरले. कोल्हापुरच्या बाजारचा दिवस निवडला होता. गर्दीचा फायदा घेऊन तरुणांनी कसे घुसायचे, परंतु पंचगंगेच्या काठी मुळीच जावयाचे नाही असे त्यांना निक्षून सांगण्यात आले. कारण नुकतेच पंचगंगेस पाणी येऊन गेले होते. नदीच्या काठावर दोन्ही बाजूंनी चिखल झाला होता. तिकडचा मार्ग पत्करला तर गाळात रुतून बसण्याची शक्यता आहे. पाठलाग झाल्यास अनायासे पोलिसांचे हाती सापडण्याची शक्यता आहे याची त्यांना योग्य ती सूचना दिलेली होती. योजनेतील सूचनेप्रमाणे सर्वांच्याकडून यशस्वी कामगिरी होऊनसुद्धा जिकडे जायला नको म्हणून ताकीद दिली होती तिकडेच गांगरून २–३ तरुण गेले. त्यात यशवंत कुलकर्णी......वगैरे होते. खजिना व्यवस्थित हाती आला पण म्होरके हाती सापडले. पुढे तो खजिना बेंगलोरला पाठवून बदलून आणला. पकडलेल्या लोकांना फार त्रास होऊ लागला. त्यांच्या छळास काही सीमा राहिली नाही. मारपीट तर रोजच चालू होती, पण चाप लावणे, मोळे मारणे वगैरे सारखी पाशवी कृत्येही पोलिसांकडून सारखी चालू होती. परंतु एवढे हाल सोसून सुद्धा त्या धाडसी तरुणांनी खजिन्याबद्दल एक चकार शब्दही तोंडातून काढला नाही. धन्य त्या तरुणांची !

एवढ्या मोठ्या कामगिरीवर जे लोक हाती लागले त्यांनाच घडलेल्या सर्व गुन्ह्याबद्दल जबाबदार धरून त्यांच्यावर आरोप ठेवून सर्व निकाल लागत होते. अशा तऱ्हेने यशवंताला जवळ जवळ २० वर्षांची सजा भोगण्यास पात्र करून त्याचे हाल चालविले होते. एक दिवस शिरोळच्या जेलमधून चिठ्ठी आली की, माझ्याने आता सोसवत नाही. मला विषाची पुडी पाठवून द्या. ती चिठ्ठी पाहून आमच्या काळजात चर्र झाले. देशाकरिता एवढे हाल सोसणाऱ्या व कुठल्याही कामी

मृत्यूसन्मुख उभा राहून वाटेल ते काम धडाडीने करणाऱ्या तरुणास वाचविलेच पाहिजे असा निर्धार केला व त्या कामास लागलो. प्रथम जेलर इंगळे यांची गाठ घेतली. त्यांच्यात सहानुभूती निर्माण केली. जेल डॉक्टर पारसनीस होते. त्यांचीही गाठ घेऊन त्यांची सहानुभूती पैदा केली. त्यांचे माहितीचे किंवा नात्याचे डॉ. रेगे म्हणून मुंबईस होते. त्यांना ही सर्व हकिगत निवेदन करून त्यांचेकरवी पारसनिसांना विश्वासात घेतले. नंतर असा बनाव केला की, यशवंत आजारी असून त्यास टी. बी. ची लक्षणे दिसतात, तेव्हा त्यास इथे ठेवणे धोक्याचे आहे. सांगलीचे आमचे फॅमिली डॉक्टर जोशी यांच्याकडून तशी शंका प्रदर्शित करविली. आता त्या दृष्टीने कागद रंगू लागले. कर्म धर्म संयोगाने माझे एक स्नेही कर्नल भय्या अभ्यंकर हे एजंट टू दी गव्हर्नर जनरल (A. G. G.) यांना फूड एडव्हायझर म्हणून आलेले होते. त्यांची गाठ वरचेवर पडायची. त्या अभ्यंकरना मी A.G.G. शी जास्त घसट वाढविण्यास सांगितले. टेनिस क्लबला वगैरे त्यांचेकडे जाण्याची संधी जितकी मिळेल तितकी घेण्याच्या सूचना दिल्या. त्याप्रमाणे अभ्यंकरही आपल्याकडून प्रयत्न करीत होते. वेळ प्रसंग पाहून निसटता का होईना विषय काढीत

---

## सप्रेम नमस्कार

मला मी हातकणंगल्यास असताना भेटावयास येणार होतास परंतु काही कामामुळे रहित झाल्याचे कळले. काही हरकत नाही. सवडीनुसार केव्हातरी भेटावयास आलास तरी चालेल, पण मला तुला एकच हक्काने विनंती करावीशी वाटते ती म्हणजे वाटेल तेवढ्या कामातून सवड काढून एक तरी पत्र पाठवीत जा. कारण त्यामुळे मनाला आनंद वाटत असतो. त्यामुळे मनाला नव चैतन्य मिळू शकते. तसेच तू मला अभ्यासाकरिता योग्य ती मदत करण्याचे राममार्फत आश्वासन दिल्याचे ऐकून निराश झालेल्या मनास आनंद झाला व मी जरा थोडाफार अभ्यासाकडे वळत आहे. अर्थात मला आजपर्यंत काही हक्कही नव्हते म्हणा. आता ते मिळाले आहेत.

मी अभ्यास करत असताना पुस्तकांचे बाबतीत, लिखाणाचे बाबतीत हे अधिकारी खूपच त्रास देणार. आज माझे डोळे तपासले तेव्हा त्याला–१·५० चा चष्मा लागत आहे. तरी तेवढा चष्मा शक्य तो लवकर घेऊन पाठवून देणे. वाट पहात आहे. साइज वगैरे रामच्या पत्रातून कळविला आहेच. हल्ली माझी प्रकृती ठीक आहे. मला पुढील पुस्तकांची गरज आहे. (१) जगाचा इतिहास (२) सत्त्याग्रही महाराष्ट्र (३) विवेकानंदांचे समग्र ग्रंथ भाग १-१२ (४) लो. टिळक चरित्र भाग १–३. (५) दादाभाई नौरोजी (६) रामकृष्ण परमहंस चरित्र (७) राजकारणाचे स्वरूप (जावडेकर) आणखी तुझ्याजवळ जी जी

होते. त्याच सुमारास कै. बाळासाहेब खेर वगैरे मंडळी तुरुंगातून सुटून आपले व्यवसाय पाहू लागली होती. काही दिवसांनी इलेक्शन्स होणार असा रंग दिसू लागला होता. तेव्हा माझ्या मनात एक कल्पना आली की, इलेक्शनमध्ये कांग्रेस पुन्हा मताधिक्यात येणार व बाळासाहेब हे नक्की मुख्यमंत्री होणार. तेव्हा बाळासाहेबांची भेट घेऊन, सर्व हकिगत व केलेले प्रयत्न त्यांना सांगून त्यांचे एक पत्र जर A. G. G. यास देता आले तर पहावे. मणिलाल खेर आणि कंपनीत मुंबईस त्यांचे चेंबरमध्ये एक दिवस दुपारी ३ वाजता गेलो. त्यांना सर्व इत्थंभूत हकिगत सांगितली. व ह्यावर A.G.G.ला सहानुभूतीने विचार करण्यास सांगण्याबद्दलचे एक पत्र त्याला पाठविण्याबद्दल सांगितले. तेव्हा ते एकदम खवळून उठले व म्हणाले. 'तुम्हाला अशी चळवळ कुणी करायला सांगितली ? चळवळीची सर्व दिशा तुम्ही लोकांनी बदलून टाकली आहे. आणि आता पुन्हा आम्हांला विचारता ? असे ते पुष्कळ बोलत होते. त्यांचे बोलणे शांतपणे ऐकून घेतल्यावर त्यांना एकाच वाक्यात सांगितले, 'आपला लढा अजून काही संपूर्ण यशस्वी झालेला नाही. आणखी किती लढे आपणांस लढावे लागतील ते काही सांगता येणार नाही. अशी शीर तळहातावर घेऊन लढणारी

---

मला वाचण्याजोगी पुस्तके असतील (हिंदी, मराठी, इंग्रजी) ती ती हप्त्या हप्त्याने पाठवून देत जा. दर वेळी १०–१२ पुस्तके पाठवत जा. कारण कोणत्याही गोष्टीचा अभ्यास करण्याची हीच वेळ आहे. हा वेळ असा निष्कारण घालवणे ठीक नाही. बरं असो.

खोत, पी. बी. पाटील कं. ठीक आहे. तसेच श्री. मेघजी भाई, डॉ. देशपांडे, बंकटलाल यांना त्यांचा व माझा स. न. सांगणे. हातकणंगल्यास असताना आम्ही सर्वांनी मिळून तुझा सल्ला विचारला व त्याचे योग्य ते उत्तर रामकडून मिळाले. बरं असो.

आता आम्ही केलेले गुन्हे गांधीवादाप्रते कबूल करावे की, ते नाकबूल करून त्याबद्दल वकील देऊन काम चालवावे याबद्दल सल्ला पाहिजे आहे. मला आजपर्यंत ११॥ वर्षे शिक्षा झाल्याचे कळले असेलच. अद्याप मोठ्या अशा तीन केसीस आहेत. तरी योग्य तो सल्लाच द्यावा. मी जेलला अगर शिक्षेस मुळीच भीत नाही. अर्थात हे सांगणे जरूर नाहीच. दाजी, भाऊराव, आण्णासो. यांना माझा नमस्ते कळवणे. पत्रोत्तरात या पत्राचा उल्लेख न करता खुलासा करणे. क. लो. अ. हि. वि. तुझा

**यशवंत**

---

वर्मा केसच्या धरपकडीत वीस वर्षांची शिक्षा झालेले श्री. यशवंत कुलकर्णी यांनी जेलमधून श्री. नानासाहेबांना लिहिलेले पत्र.

---

माणसे जर आपण गमावून बसलो तर पुढे लढणार कोण ? व तुम्ही लढणार ते कुणाच्या जिवावर ? आणि यश तरी त्यास काय येणार ? अशा माणसांची आपल्या देशास फार मोठी गरज आहे. त्याला आपण वाचवलेच पाहिजे. तुम्ही मोठ्या लोकांनी लढ्याची पुढची आखणी व तयारी काहीच न करता एकदम लढा पुकारलात व तरुणांना वाऱ्यावर सोडून दिलेत. जो तो स्वतंत्र आहे व ज्याने त्याने आपल्या कुवतीप्रमाणे व अक्कल हुशारीने देश स्वतंत्र करण्याकरिता लढावे असे सांगून मोकळे झालात व जेलमध्ये जाऊन बसलात आणि आता कानावर हात ठेवता ह्याला काय म्हणावे ?' असा जेव्हा मी खडखडीत व स्पष्ट सवाल केला तेव्हा ते नरमले व थोड्या वेळाने म्हणाले, 'मी काही जास्त लिहू शकणार नाही. पण ह्युमॅनिटीच्या तत्त्वावर त्यांना लिहीन' एवढे त्यांचेकडून कबूल करून घेतले. व तसे पत्र त्यांचेकडून पाठवावयास लावले. माझ्या कल्पनेप्रमाणे त्या पत्राचा फारच चांगला उपयोग झाला. A. G. G. काही कमी धूर्त नव्हता. पुढे कॉंग्रेस सत्तेवर येणार व बाळासाहेब हे नक्की मुख्यमंत्री होणार ते त्यानेही हेरले असावे. त्यांचेकडून बाळासाहेबांना पोच व उत्तर गेले. त्यात त्यांनी केलेल्या सूचनेबद्दल त्यांचे आभार मानले होते व आपण सहानुभूतीने चौकशी करीत असल्याबद्दल लिहिले होते. पुढे काही दिवसांनी चौकश्या झाल्या व दोन्ही बाजूने होत असलेल्या पत्र व्यवहाराकडे लक्ष देता यशवंताची सुटका होणार याचा अंदाज आला. एक दिवशी अकस्मात यशवंत रात्री ११ वाजता माझ्या पुढ्यात दत्त म्हणून उभा. त्याला पाहताच कडकडून मिठी मारली व पाठीवर थाप मारून म्हणालो, 'हाच खरा बहाद्दर स्वातंत्र्य सैनिक.' □

# स्वराज्याचा दरवाजा बंद करू नका !

चळवळीचे वातावरण आता बरेच तापले होते. ज्याला त्याला स्वातंत्र्याची तहान लागली होती. प्रत्येकजण आपल्याकडून होईल तेवढी मदत त्या कामी करीत होता. ब्रिटीश हद्दीतील व कोल्हापूर वगैरे ठिकाणचे कार्यकर्ते सांगलीत आश्रयार्थ येऊन राहिले होते व तेथून आपल्या भागातील सूत्रे हलवीत होते. त्यांचेकडे दिवसा, रात्री-अपरात्री कार्यकर्त्यांचे मेळावे भरत, गुप्त खलबते होत व पुढील कार्यक्रमांची आखणी होई. त्याप्रमाणे कार्यक्रम पार पाडण्यासाठी ते रवाना होत. त्यातल्या त्यात रत्नाप्पा कुंभारांचा खाक्या काही वेगळाच असे. त्यांचेकडे एकवेळी ५०/७५ लोकही जमत असत. त्यांना ठेऊन घेतलेली माणसे त्यांच्या अशा वागण्याने धास्ती खात व आपल्या पाहुण्यांची सोयच कुठे दुसरीकडे पहा असे

आम्हांस कळवीत. मग त्यांची सोय अन्य ठिकाणी करावी लागे. तिथेही पुन्हा तोच अनुभव येई. असे एकसारखे ४ महिने चालू होते. हे महाराज दिवसा उजेडी ५/६ माणसे मागेपुढे घेऊन कोल्हापुरी पैलवानासारखे इकडून तिकडे व तिकडून इकडे हिंडण्यासही मागे पुढे पहात नसत. त्यामुळे सरकारच्या डोळयावर ही गोष्ट येऊ लागली होती. विशेषतः कोल्हापूरच्या रेसीडेन्टचा एकसारखा ससेमिरा सांगली संस्थानच्या पोलिटिकल डिपार्टमेंटच्यामागे लागलेला असे की, 'सांगलीस रत्नाप्पा कुंभार वगैरेसारखे भूमीगत कार्यकर्ते आश्रय घेतात व तिथून चळवळीची सूत्रे चालवितात, हे ठीक नाही. आपण त्यांचा ताबडतोब बंदोबस्त केला पाहिजे. शिवाय इतर ठिकाणच्या भूमीगत कार्यकर्त्यांना सांगलीहून भाकऱ्या पुरविल्या जातात. ते काम गांवभाग व कुंभारखिंडीतल्या बायका करतात.' हे चळवळीचे लोण इतक्या खोलवर गेले होते की, असेच एक खरमरीत पत्र पोलिटिकल एजंटकडून खास राजेसाहेबांना गेले. त्यांनी दिवाण व डि. एस. पी. ना बोलावून घेतले. त्यांचेशी घाटाघाटी केल्या. थोडया वेळाने खऱ्या-खोटयाची शहानिशा करण्याकरिता मला बोलावले व माझ्या पुढयात ते पत्र टाकून म्हणाले, 'काय हकिगत आहे?' मी सांगून टाकले की, सर्व गोष्टी खऱ्या आहेत. आता आम्ही पाहुणे मंडळींना दुसरीकडे जावयास सांगतो. आपल्या सौजन्याचा व सहानुभूतीचा जास्त फायदा घेणे बरे नाही. झाले इतके फार झाले. तेव्हा राजेसाहेब एक दोन मिनिटे अगदी स्तब्ध झाले. आम्ही तिघेही ते आता काय बोलतात इकडे लक्ष देऊन गप्प होतो. इतक्यात ते माझ्याकडे पाहून म्हणाले, लक्ष्मणराव, थांबा. तसं करू नका. अशा चळवळीने स्वराज्य मिळेल असे काही मला वाटत नाही. पण न जाणो खरोखर यामुळे स्वराज्य येणारच असेल तर आपल्या हातांनी दरवाजा बंद करायला नको. नंतर डि. एस. पी. व कारभारी यांना म्हणाले की, तुम्ही आपणहून त्यांना हात लावू नका. अगदी तुमचा नाईलाजच झाला आणि तिकडून पार्टी आली तर तुमचा काही इलाज नाही. इतकी त्यांची सहानुभूती होती. कुणाला माहीत नाही अशा स्वार्थत्यागाची तयारी त्यांच्या मनाची झालेली होती. त्यांच्या परिस्थितीत आपण आहो असा क्षणभर विचार करून पहावा म्हणजे समजेल की ही काही सामान्य बाब नव्हे. कुणाही श्रेष्ठ देशभक्तापेक्षा त्यांची देशभक्ती काही कमी नव्हती. इकडे संस्थानचा कारभार चालवायचा व चळवळीस सहानुभूती दाखवून आपल्या संस्थानचा उपयोग करू द्यावयाचा व दुसरीकडे ब्रिटिश राजवटीच्या दडपणास तोंड द्यावयाचे. चळवळीसंबंधी आमची बोलणी होत. त्यांना मोडतोडीच्या प्रकाराबद्दल बरे वाटत नसे. मात्र आता ही ब्रिटीश राजवट जाऊन स्वराज्य यायला हवे असे वाटत असे. त्याकरिता स्वार्थत्यागाची नितांत आवश्यकता सर्व थरात असायला हवी असे ते म्हणत. हे उद्‌गार त्यांची स्वतःची तशी तयारी असल्याचेच निदर्शक नव्हे का?

□ □ □

# बॅटल ऑफ आराकान

**लेफ्टनंट जनरल थोरात यांच्या आयुष्यातील एक रोमहर्षक प्रसंग**

**■ कर्नल आ. भा. जाधव ■**

२८ जानेवारी १९४५ ची रात्र. ब्रह्मदेशातल्या आराकानमध्ये अकयाबजवळ मायबॉनच्या समुद्रकिनाऱ्यावर सेकंड पंजाब बटालियनचे सुमारे एक हजार जवान लष्करी गणवेषावर फिल्डसर्व्हिस मार्चींग ऑर्डर चढवून निश्चल बसले होते. आवाज येत होता तो फक्त किनाऱ्यावर येऊन आपटणाऱ्या लाटांचा आणि दूर कुठंतरी अधून मधून उडवलेल्या तोफांच्या गोळ्यांचा.

डोक्यावर स्टील हेलमेट चढवत पलटणचे कमांडींग ऑफिसर लेफ्टनंट कर्नल एस. पी. पी. थोरात खंदकातून बाहेर पडले व जमिनीवर दाब देणारी धीमी पावले टाकत जवानांच्या दरबारकडे आले. ते जवळ येताच पलटणचे सेकंड-इन-कमांड सावधान होत बोलले–' पंजाबी ऽऽज अॅटेन् ऽऽशन्. '

या हुकूमाबरोबर माना ताठ करून सारे सरसावून बसले.

' सीट अॅट ईझ '–थोरात म्हणाले.

दोन्ही पायावर शरीराचा भार टाकून, खांद्यावरून कमरेवर बांधलेल्या बेल्ट-कडे जाणाऱ्या वेब इक्वीपमेंटच्या पट्ट्यात अंगठे अडकवत नजरेच्या झोतात जवानांना समा ून घेत ते म्हणाले, ' मेरे बहादूर जवानो आजका मुकाबला सख्त है. लेकिन तुम जैसे वीरोंके लिये मुष्कील नहीं. आजके लढाईमें फते पानेपर दुष्मनकी ताकद बहोत कम हो जायेगी. यह तुम्हारी पलटनकी, गांवकी और देशकी इझ्झत का सवाल है. पसीना और खून बहाके जान लगाकर मेलरोज



टेकडीपर हमला करना होगा. उसपर कब्जा करना होगा. और वहाँ दटकर रहना होगा. कुछभी कीमत क्यों न देनी पडे. विश यू बेस्ट ऑफ लक. '–

एवढं बोलून ते परत गेले. खंदकाजवळ असलेल्या एका नारळाच्या झाडाला टेकून त्यांनी स्टील हेलमेट काढली. पश्चिमेकडून येणारं समुद्राचं गार वारं अंगावर घेत त्यांनी सिगरेट शिलगावली नि मनसोक्त झुरका घेतला. सागराच्या पृष्ठावर चमकणाऱ्या चंद्रबिंबाकडे ते काहीक्षण पाहात राहिले नि स्वतःशीच किंचित हसले. त्यांचा बॅटमन नंदलाल जमिनीवर पडलेली हेलमेट उचलून त्यांच्या खांद्यावरून इक्वीपमेंट उतरवत म्हणाला,

' साऽऽब, के होगया ?'

यावर खळखळून हसत थोरात म्हणाले–

" नंदू, तुम्हे मालूम नही, लेकिन आजसे ठीक ९ साल पहले इस समय हम अमृतसर स्टेशनपर शादीके लिये उतरे थे, और तकरीबन एक हजार बराती हमे लेने आये थे, उस समय हम सरपे रेशमी साफा पेन रहे थे । आज तुमने हमारे सरपर लोहेका टोप चढा दिया, कल २९ जनवरीको हमारे शादीका सालगिरा है. ये तुम जैसे पलटनके हजार जवान बरातियोंके साथ कल हम मेलरोजकी शादीमें शरीक होंगे. '–

दुसऱ्या महायुद्धातील बर्मा फ्रंट वरच्या एका तुफान खेळल्या गेलेल्या लढाईचा किस्सा आहे हा.

१९४४ सालच्या अखेरी अखेरीस जपानी सेना मध्य ब्रह्मदेशातून दक्षिणेकडे

सरकू लागली. या फौजेला मागे निसटू न देता तिचा धुव्वा उडवावा अशी साऊथ ईस्ट एशियाचे सुप्रिम कमांडर अॅडमिरल लॉर्ड लुई माऊंटबॅटनची इच्छा होती. शत्रूच्या गोटात आत शिरून त्याचा मागे हटण्याचा रस्ता अडवून त्याला तेथेच झोडपण्यासाठी त्यांनी एक इंफंट्री ब्रिगेड ग्रूप पाठवायचे ठरवले. ही कामगिरी म्हणजे अंगावर ओढवून घेतलेली आत्मघातकी आपत्तीच होती. जपानी सेना या प्रदेशात मोठ्या संख्येने होती. जाणून बुजून वाघाच्या जबड्यात उडी घेणेच होते हे. ही जोखमीची कामगिरी पार पाडण्यासाठी चिवट, दिलेर आणि निधड्या छातीच्या जवानांची निवड करणं जरूर होते. माऊंट बॅटनचे चीफ ऑफ स्टाफ लेफ्टनंट जनरल ब्राऊनिंग यांनी ही कामगिरी आराकान फ्रंटवरील नं. २५ डिव्हिजन मधील भारतीय ब्रिग्रेडला देण्याची इच्छा सुप्रीम कमांडरजवळ प्रगट केली. त्या काळात संपूर्ण भारतीय ब्रिगेड की जिच्या तिन्ही पलटणींचे कमांडींग ऑफिसर्स भारतीयच होत, असे ही ब्रिगेड हे पहिलेच उदाहरण होते. त्यातील कुमाँन पलटणचे कमांडिग ऑफिसर थिमय्या होते. जे पुढे सरसेनापती झाले. बलुच पलटण कर्नल सेन कमांड करत होते. जे पुढे ईस्टर्न कमांडचे जी. ओ. सी. इन सी. झाले आणि पंजाब पलटणचे नेतृत्व थोरात करत होते.

याकाळात काही अमेरिकन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी हिंदी जवानांच्या कार्यक्षमते-बद्दल अनुदार उद्‌गार काढले होते आणि अमेरिकन वृत्तपत्रांतून त्याला प्रसिद्धी मिळाली होती. हिंदुस्तानी सैन्यावर पडलेल्या शितोड्यांना हिंदी सैन्यानेच धुवून काढलं पाहिजे हे लक्षात घेऊन माऊंट बॅटननी ब्राऊनिगच्या इच्छेला मान्यता दिली. ते म्हणाले––

––'ऑल राईट. गिव्ह धिस जॉब टू दि ऑल इंडियन ब्रिगेड. इफ एनी वन कॅन व्हिंडीकेट दि ऑनर ऑफ दि इंडियन आर्मी, आय हॅव फेथ दॅट दिज फायटर्स ऑफ दि फिफ्टी फर्स्ट ब्रिगेड विल. बट बाय गॉड. इट वोंट बी ईझी. एनी वे लेट देम हॅव ए बँग अॅट इट. '––

१९२५ साली इंग्लंडमधील सँढर्स्ट येथील रॉयल मिलीटरी कॉलेजमध्ये ब्राऊनिग अॅडजुटंट असताना थिमय्या व थोरात तेथे लष्करी शिक्षण घेत होते. या दोघा निधड्या छातीच्या हुशार अधिकाऱ्यांच्या कर्तृत्वाबद्दल ब्राऊनिगना खात्री होती.

या वेळी ही ब्रिगेड बुथीडांगची लढाई आटपून तिथेच विश्रांती घेत होती. परंतु सुप्रीम कमांडरचा हुकूम होताच तिन्ही पलटणींनी अकयाबची वाट धरली.

जपान्यांच्या लहान, लहान टोळ्या, चौक्या, कमांडो पार्ट्या, वगैरेंशी सामना करत मायो पर्वताच्या रांगातून मार्ग काढत या पलटणी २५ जानेवारीपर्यंत अक्याबला पोचल्या.

जलमार्गाने प्रवास करण्याची पडाव, तराफे मचवे, रेक्की बोटस वगैरे जी काही उपलब्ध साधने मिळाली त्यांच्या मदतीने अक्याब पासून सुमारे ६० मैल दूर

असलेल्या मायबॉन गावी हा कबिला पोचला. मायबॉन हा या सेनेचा फर्म बेस होता. मायबॉनपासून जवळच पूर्वेला आराकान योमा पर्वत रांगांची टोके पसरली होती. या परिसरातील कांगॉव गावच्या सभोवतालच्या पाच लहान मोठ्या टेकड्यांवर शत्रूने आपली बचाव फळी (डिफेंस) मोठ्या ताकदीने लावली होती.

२६ जानेवारीला रॉयल कमांडोच्या चारशे कडव्या सैनिकांनी मायबॉनच्या ईशान्येला असलेल्या हिल नं. १७० वर हल्ला चढवून ती हस्तगत केली.

२७ जानेवारीला कर्नल थिमय्यांच्या कुमानी पलटणीने मोठ्या हिरीरीने आणि जिद्दीने हिल नं. १७० च्या पूर्वेला असलेल्या डन (DUNN) टेकडीवर हल्ला चढवला. घनघोर युद्ध झाले. अपरंपार जीवीत हानी झाली. डोंगराळ भागातल्या छोटया बांधाच्या चिवट कुमॉन जवानांनी पराक्रमांची शर्थ केली. निकराचा हल्ला चढवून त्यांनी टेकडी काबीज केली. पण तात्पुरता पराभव पत्करलेल्या जपान्यांनी थोडयाच वेळाने तुफानी प्रतिहल्ला चढवून कुमॉनींना मागे हटवले. या रणकंदनात त्यांचे व जपान्यांचे अपरिमीत नुकसान झाले.

शौर्याची शर्थ करूनही भारतीय ब्रिगेडला पहिल्याच समरप्रसंगात चपराक बसली याचे जवानांना दुःख झाले. हिम्मत न हरता ब्रिगेड कमांडरनी बलुच पलटणीला २८ जानेवारीच्या पहाटे मायबॉनच्या उत्तरेस असलेल्या मेलरोज या लांब चिचोळया टेकडीवर हल्ला चढवण्याचा हुकूम दिला.

दक्षिण ब्रह्मदेशात जपान्यांचा माघारी जाण्याचा मार्ग या टेकडीवरून कैक मैलापर्यंत टिपता येत असून टेकडी हस्तगत झाल्यास शत्रूचे नुकसान प्रचंड प्रमाणात करता येणे शक्य होते. अशी ही डावपेचाच्या दृष्टीने महत्त्वाची असणारी टेकडी वाटेल ती किंमत देऊन घेणे जरूर होते.

कर्नल सेन यांच्या रागाने लाल बुंद झालेल्या कडव्या बलुचींनी दातओठ खाऊन मोठ्या निकराने पश्चिमेकडून हल्ला चढवला. बहाद्दर बलुचींनी आपल्या उद्दिष्टाचा अर्धा लचका तोडला. जपान्यांनी तोफांच्या, मशीनगन्सच्या आणि रायफलींच्या गोळ्यांच्या वर्षावात बलुचींना न्हाऊ घातले. शेकडयांनी जवान धारातिर्थी पडले. तशाच परिस्थितीत पथकाची पुनर्रचना करून सेननी हल्ला जारी ठेवण्याची तयारी केली. पण थोडे माघारी हटून दबा धरून बसलेल्या जपान्यांच्या बलाढ्य तुकडीने निकराचा हल्ला चढवून पलटणीला कापून काढले. घायाळ झालेल्या बलुचींना झालेल्या जखमा चाटत मागे यावे लागले. पहिल्या दोनच दिवसात ब्रिगेडला दोन प्रचंड पराभव पत्करावे लागले. जवानांची संख्या निम्म्याने घटली. हा सुरू केलेला डाव अर्ध्यातच सोडून पराभव पत्करणे नामुष्कीचे होते. माऊंट बॅटन व ब्राऊनिंगसह साऱ्या आराकान आघाडीवरील दोस्त सैन्याचे लक्ष या लढयाकडे लागले होते.

२८ तारखेला संध्याकाळी सात वाजता ब्रिगेड कमांडरनी कर्नल थोरातना आपल्या खंदकात पाचारण केले. थोरात येताच समोरच्मा टेबलावर पसरलेला नकाशा न्याहाळत असलेली आपली भेदक नजर त्यांनी उचलली आणि थोरातांच्या नजरेला भिडवली. ती तीक्ष्ण नजर आपले डोळे फोडून आरपार जात असल्याचा त्यांना भास झाला. मशिनगनमधून सुटणाऱ्या गोळ्यांसारखे काळजाला भिडणारे खणखणीत मोजकेच शब्द त्यांच्या तोंडातून बाहेर पडले.

— " शंकर, सी दॅट डॅम हिल. आय वॉंट इट बाय टुमॉरो मॉर्निंग. बोगी ट्राईड. ही डिड डॅम वेल बट कुडन्ट कॅप्चर दि होल. आय डू नॉट केअर व्हॉट यू डू अँड हौ यू डू इट, बट यू हॅव गॉट टू बी ऑन द टॉप ऑफ इट बाय टूमॉरो मॉर्निंग. आय विल गिव्ह यू व्हॉट एव्हर सप्पोर्ट यू वॉंट. बट इन रिटर्न आय वॉंट वन सिगरेट फ्रॉम यू विच आय विल स्मोक ऑन टॉप ऑफ द हिल. विश यू बेस्ट ऑफ लक. " —

बलूच पलटणचा हल्ला चालू असताना थोरात स्वस्थ बसले नव्हते. त्यांची नजर दुर्बिणीच्या सहाय्याने मेलरोज टेकडीचा सतत वेध घेत होती. जवळचे नकाशे, पेट्रोल रिपोर्टस आणि शत्रूच्या डिफेन्समधून मशीनगन्स, ब्रेनगन्स, रायफल्स, ग्रिनेडस मॉर्टर्स वगैरे हत्यारातून सुटणाऱ्या गोळ्यांचा मार हेरून त्याने बचावफळी कशी लावली आहे याचा अंदाज बांधला. कुमॉनी व बलुचींनी शत्रूवर समोरून (फ्रंटल) चाल केली होती. वळसा घालून त्याच्यावर पिछाडीकडून हल्ला चढवला तर विजय मिळण्याची शक्यता जास्त आहे असे थोरातांना वाटले पण या योजनेत एक वैगुण्य होते. हल्ला करण्यासाठी योजलेल्या आरंभ रेषेजवळ (स्टार्ट लाईन) पोचण्यापूर्वी सुमारे दोनशे यार्डांचे अंतर उघड्या प्रदेशांतून पार करावे लागत होते. आणि हा भाग शत्रूने स्वयंचलित हत्यारांनी टिपून ठेवला होता. यात थोडी बहुत मनुष्यहानी होण्याचा संभव होता. पण सर्वांगीण विचार करून हा धोका पत्करण्याचे त्यांनी ठरवले. टेकडीवर पिछाडीकडून हल्ला चढविण्याचे निश्चित केले. या हल्ल्यात आर्टीलरी, नेव्हल गन्स व रॉयल एअर फोर्सची बॉंबर विमाने सपोर्ट देणार होती.

रात्रीचे तीन वाजले होते. पंजाब पलटणच्या तळावर हालचाल चालू होती. कोणी हत्यारावरून शेवटचा सफाईचा हात मारत होता. कोणी इक्वीपमेंट चढवत होता. कोणी हॅंड ग्रिनेडस तपासून पहात होता. जमिनीत खड्डा खणून तयार केलेल्या रायफल कंपन्यांच्या लंगरांतून (पाकशाला) रोटचा आणि सुकी भाजी शिजवून तयार होती. जवान आपआपल्या रॅशन टीनांमध्ये खाना आणि वॉटर बॉटलात पाणी भरून घेत होते. ही सारी कामे बिनबोभाट, कसलाही आवाज न करता चालली होती. आवाज येत होता तो फक्त एका पाठोपाठ येऊन किनाऱ्यावर आदळणाऱ्या सागरी लाटांचा.



आपल्या सहकाऱ्यांसमवेत लेफ्ट. जनरल थोरात (खुर्चीवर उजवीकडून दुसरे)

नंदलाल एका हातात वॉटर बॉटल, चहाने भरलेला मग (दांडा असलेला एनॅमलचा पेला) व दुसऱ्या हातात रॅशन टीन घेऊन थोरातांच्या खंदकात शिरला. आत येताच —

"राम राम साब, शादी का सालगिरा मुबारक. भगवानसे प्रार्थना है के आपको और मेमसाबको लंबी उमर मिले और आप दोनो हमेशा सुखी रहे. पहले मूह मीठा करो" —म्हणत त्याने त्यांच्या हातावर खडीसाखरेचे दोन तुकडे ठेवले.

— "थँक यू नंदू. बहोत बहोत शुक्रीया. आज अपनी शादी तो मेलरोज टेकडीपर है. वहीं धूम धामसे मनायेंगे —क्यों —?"

असं हसत हसत म्हणत त्यांनी चहाचा मग तोंडाला लावला. यावर नंदलाल नुसता हसला, व रॅशन टीनचे झाकण उघडून त्याने खिशातून आणलेले दोन कच्चे कांदे, एक दोन हिरव्या मिरच्या व थोडे मीठ डब्यात टाकले व बंद करून हॅवरसॅकमध्ये ठेवला. इक्वीपमेंट चढवता चढवता थोरातांच्या मनात विचार आला — या माझ्या हजार जवानांपैकी कितीजण आज हे जेवण घेतील ? देव जाणे, पण मनात आलेले विचार झटकून ते म्हणाले—

"क्यों, बदखुरदार आजके दावतमें कौन कौनसी चीजे बनायी है ?"

स्टेन गनच्या मॅगझीनमध्ये काडतुसे सरकवत नंदलाल नुसता हसला. तयार होताच जवळ असलेली शिवाची छोटी मूर्ती उजव्या हातात घेऊन थोरातांनी मस्तकाला टेकवली व क्षणभर डोळे मिटून प्रार्थना केली.

चामड्याच्या ब्रीफ केसवर सेपीया रंगातला कॅप्टन डॉक्टर सौ. लीला थोरात यांचा लष्करी वर्दीतला फोटो होता. या वेळी त्याही भारतात फेरोझपूर येथील मिलीटरी हॉस्पीटलमध्ये जखमी जवानांची सेवा करत होत्या. त्या फोटोकडे पहात नंदराम म्हणाला "साऽऽब, आप झगडा करते है, मेमसाब मलमपट्टी लगाती है."

यावर मनसोक्त हसून ते म्हणाले–

'चल, निकलजा यहांसे, बदमाश.'

तो बाहेर जाताच फोटो हातात घेऊन ते पुटपुटले "मेनी मेनी हॅपी रिटर्नस ऑफ दि डे, लील–"

आणि तीरासारखे खंदका बाहेर पडले.

बेरीक ॲडमिनिस्ट्रेटीव्ह बॉक्समध्ये पलटण पुढे जाण्यासाठी खालील ऑर्डर ऑफ मार्चप्रमाणे सज्ज झाली.

'डी' रायफल कंपनी

कर्नल थोरातांचे बॅटल हेड क्वार्टर्स

(यामध्ये – इंटेलिजन्स ऑफीसर कॅप्टन तबी कुरेशी, २ वायरलेस ऑपरेटर सेटससह व नंदराम. त्यांच्याच मागे तोफखाना रेजिमेंटचा फॉरवर्ड ऑब्झर्वेशन ऑफिसर कॅ. बायरलेस पार्टीसह, 'सी' रायफल कंपनी, 'बी' रायफल कंपनी, बटालियन हेड क्वार्टर्स, थ्री इंच मॉर्टर प्लटून, 'ए' रायफल कंपनी.

## ॲडव्हान्स सुरू झाला

येथून पलटण प्रथम मेलरोज टेकडीच्या दक्षिणेला मुक्रर केलेल्या एफ. यू. पी त (फॉर्मिंग अप पोझीशन ॲडम. बॉक्सच्या दक्षिणेकडील चांग (नाला) पार करून जाणार होती. इषारा मिळताच ठीक चार वाजता ॲडवान्स सुरू झाला. चाँग पार करून पूर्वेच्या दिशेने पलटण काही अंतर चालून जाताच टपून बसलेल्या शत्रूने मशीनगन्स व ब्रेनगन्सच्या गोळ्यांचा वर्षाव करायला सुरुवात केली. या ठिकाणी स्मोक स्क्रीन लागेल याची आगाऊ कल्पना असल्यामुळे थोरातांची तातडतोब एफ. ओ. ओ. ला हुकूम सोडला.

"बिल, आय वॉंट स्मोक स्क्रीन बिटवीन

दॅट लाईन ऑफ ट्रीज ॲंड दि हिल. फॉर हेवन्स सेक, बी क्वीक"–


सुदैवाने वाऱ्याची दिशा अनुकूल असल्यामुळे शत्रूच्या फायर करणाऱ्या गन्स आणि आगे बढणाऱ्या पलटणीमध्ये काही क्षणातच धुराचा पडदा अलगद उलगडला गेला. याचा फायदा उठवून जवानांनी चटकन मोकळे मैदान पार केले व विशेष काही न घडता एफ यू. पी. त दाखल झाले.

थोरातांनी तयार केलेल्या वेळापत्रकानुसार हल्ला करणाऱ्या जवानांनी स्टार्ट लाईन पार करण्याची वेळ पहाटे ५ वाजून ५ मिनिटाने होती. त्यापूर्वी १० मिनिटे आर्टीलरी व नेव्हल गन्सनी टेकडीवर बंब्राडमेंट केले. या तोफांचा मारा संपताच विमानांचे डाईव्ह बॉम्बींग व स्ट्रॅफींग सुरू होणार होते. पण हवामान बिघडल्या-मुळे विमाने आली नाहीत. हातातून बाण तर सुटला होता. अॅडव्हान्स जारी होता. एअर सपोर्ट शिवायच पुढे जाण्याचा निर्णय थोरातांनी घेतला.

पलटणच्या 'सी' आणि 'डी' या कडव्या रायफल कंपन्यांनी हत्यारे सरसावून खुल्या टू अप फॉमेशेनमध्ये दमदार पावले टाकत चाल सुरू केली. प्रगती पहा-ण्याच्या व डावपेच करायला सोपे जाण्याच्या दृष्टीने थोरातांनी बॅटल हेडक्वार्टर्स या कंपन्यांच्या पाठीशीच ठेवले. उरलेल्या दोन रायफल कंपन्या एफ. यू. पी. त अडचणीच्या वेळी उपयोगी पडाव्यात म्हणून राखून ठेवल्या.

ही सेना थोडे अंतर पार करून जाते न जाते तोच जपान्यांनी या पथकावर एकदम तोफखाने व स्वयंचलीत हत्यारांच्या गोळयांचा वर्षाव सुरू केला. मिळेल तो आडोसा जवानांनी पकडला. कधी सरपटत तर कधी छोटचा छोटचा टप्प्यानी पळत ते टेकडीच्या पायथ्याशी पोचले. सेक्शन, प्लटून व कंपनी कमांडर्स त्यांच्या हालचालीवर नियंत्रण ठेवत होते.

या प्रदेशात जपान्यांनी शत्रूच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी व त्याला जवळ फिरकू न देण्याच्या दृष्टीने ठिकठिकाणी छोटचा आऊट पोस्टस व लिसनिंग पोस्टस लावल्या होत्या. स्टॅंडीग व फायटींग पेट्रोल्स दबाव धरून बसली होती. या साऱ्यांचा समाचार घेत, बरबाद करत पुढे जावे लागत होते. या चकमकीत व वरून येणाऱ्या बेसुमार गोळयांच्या वर्षावामुळे पलटणची जीवीत हानी बरीच होऊ लागली. पण जवानांचं रक्त तापलं होतं. न बिचकता त्यांनी अॅडव्हान्स चालू ठेवला. इतक्यात सुदैवाने रॉयल एअर फोर्सच्या विमानांनी गरुड झेपा घेऊन शत्रूच्या मोर्चावर बॉंब फेकायला सुरुवात केली. या संधीचा फायदा उठवून वाटेत येणाऱ्या झाडे, झुडपे, दगडधोंडे, खाचखळगे, ओढेनाले, वगैरेंच्या अडथळयांना व टेकडीवरून येणाऱ्या गोळयांना भीक न घालता ते टेकडी चढू लागले. हवाई जहाजांनी सुमारे वीस मिनिटे बॉंबींग केल्यावर ती निघून गेली. ताबडतोब शत्रूने मोर्चातून आपली मुंडकी बाहेर काढली नि व्यवस्थित नेम घेऊन या जवळ येणाऱ्या जवानांना नेमके टिपायला सुरुवात केली. टेकडीला जणू कडे घालून चढणाऱ्या बहादूर डोग्रा व शीख जवानांवर त्याने आता आग ओकायला सुरुवात केली. मॉर्टर्स, मशीनगन्स, ग्रिनेडस, वगैरे हत्यारांचा अक्षरश: वर्षाव सुरू झाला. सारे आस्मान प्रचंड आवाजाने, धुळीने नि धुराने भरून गेले. वरून येणाऱ्या गोळयांचे निशाण बनल्याने जवान धडाधड धारातीर्थी पडू लागले. कैक वीरगती पावले. कित्येक घायाळ, जखमी झाले. हल्ल्याची प्रगती थांबली. टेकडीचा माथा दृष्टी-




मेलरोज टेकडीच्या भोवतालचा प्रदेश

पथात हाकेच्या अंतरावर असूनही हल्ल्याचं पाऊल पुढे पडेना. प्राणाहून प्यारे असलेले जवान माशांसारखे पटापट धारातीर्थी पडताना पाहून थोरातांच्या काळजात कालवा कालव झाली. उद्दीष्ट डोळ्यासमोर दिसत असून पोचता येत नाही. दोनशे जीवांनी घटका दोन घटकात ही टेकडी पादाक्रांत करण्यासाठी रक्त सांडलं. ते पवित्र रक्त असंच फुकट जाणार का? क्षणभर त्यांचं हृदय स्तब्ध झालं. डोकं सुन्न झालं. आणि थोरातांच्या शरीरातून वीज सळसळली आपली जागा व सहकाऱ्यांना सोडून ते तीरासारखे सप सप पावले टाकत पुढे गेले. त्यांच्यांवर चौफेर शत्रूंच्या गोळ्यांचा मारा होत आहे याची त्यांना जाणीवच नव्हती. हात पसरून पुढे चलण्याचा इषारा देत ते मोठ्याने गर्जले–' रूक क्यों गये हो. आगे बढो. मैं तुम्हारे साथ '

या पुकाराबरोबर घायाळ झालेल्या, थकलेल्या, दमलेल्या, जखमी साऱ्या साऱ्या

जवानांच्या अंगातील रक्त सळसळून उठलं. दातओठ खात उठत, डोळ्यात पेटलेल्या अंगारानं टेकडीला जाळत संगिनी रोखून ते बहादूर, शूर भारतीय जवान अंगावर येणाऱ्या गोळ्या फुलांप्रमाणे झेलत मोठमोठ्याने "जय माताजी की जय"– "सत श्री अकाल"च्या गर्जना करत टेकडी चढून माथ्यावर पोचले. अंगात रणचंडीच संचारली होती जणू. प्लटून कमांडरच्या 'चाऽऽर्ज' पुकाराबरोबर ते दुष्मनावर तुटून पडले.

पण जपानीही काही कमजोर दिलाचा दुष्मन नव्हता. ते शूर सैनिकही तितक्याच हिरीरीने नि शर्थीने लढले. त्यांची शेकडो मुंडकी उडली तरी शरीरे हत्यारांनाच लटकली होती. टेकडीच्या माथ्यावर हजार-बाराशे जीव दुसऱ्याला नेस्तनाबूत करण्याची पराकाष्टा करत होते. विजयाचे पारडे कधी पंजव्यांकडे तर कधी जपान्यांकडे झुकत होते. ही रस्सीखेच बराच वेळ चालली. येणारा प्रत्येक क्षण मोलाचा होता. विजय मिळाला तर आत्ताच, नाहीतर केव्हाच नाही, असा विचार थोरातांच्या मनात आला आणि पुढे येऊन ते म्हणाले–

"मत रोको! मत रोको! जीत हमारी है. मेरे पीछे आव. चलो, बढो.'

जवान बेभान झाले. प्रचंड स्फुरण चढून सापडेल त्या मोर्चात त्यांनी चित्त्यासारख्या उड्या टाकल्या. शत्रूच्या शरीरात संगिनी खुपसून त्यांचे कोथळे बाहेर काढले. मोठं रणकंदन माजलं. जखमी जवानांचे चित्कार, आवेशाने लढणाऱ्या जवानांचे ललकार, हत्यारांचा किणकिणाट, फुटणाऱ्या ग्रिनेडांचा कडकडाट व ठिकठिकाणी लागलेल्या आगीतून निघणाऱ्या ज्वालांनी ही टेकडी जणू थयथय नाचत होती. जपान्यांनी टेकडी वाचवण्याची शिकस्त केली. पण भारतीय जवान त्यांना कणभर भारी पडले. लढत लढत त्यांनी मागे सरकायला सुरुवात केली. विजयाचं पारडं आपल्याकडे झुकू लागलेले स्पष्ट दिसताच शेवटचा निकराचा हल्ला चढवून जवानांनी शत्रूला हुसकावून लावले. त्यांनी फत्ते मिळवली. टेकडी काबीज होताच थोरात ओरडले–

–"शाबास मेरे जवानो. तुमने आज पलटनका नाम रोशन कर दिया. मेरे शादीके सालगिराहपर इतना बडा अनमोल तोफा कभी नही मिला था. ना कभी मिलेगा. मर कर अमर होनेवाले शहीद जवानोंको मेरा प्रणाम."–

थोरातांनी तबीला सक्सेस सिग्नल देण्याचा हुकूम केला. त्याने ताबडतोब व्हेरी लाईट पिस्तुलातून लाल, हिरवा, लाल अशा तीन गोळ्या मायबॉनच्या दिशेने हवेत उडवल्या. त्याचा सांकेतिक अर्थ होता–

–"पंजाब पलटणने मेलरोज टेकडी काबीज केली."–

गेल्या आठ–दहा तासांच्या सतत श्रमाने व झालेल्या प्रचंड नुकसानीने जवान अगदी थकून, पिचून गेले होते. रक्तात न्हालेल्या या सरणात वीरगती पावलेल्या

पृष्ठ ११८ वर



# मी नेताजींना बघितलंय

लेखक : नारायण सान्याल
अनुवाद : अशोक शहाणे

हो. मीपण त्यांना बघितलं होतं. बघितलं अगदी जवळनं. बरोबर राहून. दिवसामागनं दिवस.

कितीदातरी त्यांच्यासमोर जाऊन उभी राह्यलेय्. धाकटया बहिणीसारखी. पोटच्या पोरीसारखी. कधी सुसज्ज लष्करी गणवेशात. कधी चिखलानं बरबटलेल्या, धुळीनं माखलेल्या फाटक्यातुटक्या कपडयांनी अंग झाकून.

अन् एकदा—हो, एकदा राजराणीच्या वेशभूषेत. तो अगदी सरता, शेवटचा दिवस. त्या दिवशी माझ्या गळयात होता हिऱ्यांचा हार. अंगभर होते मोती. कानात कुंडलं. हातात बांगडया. त्या रत्नखचित. अन् डोक्यावर हिऱ्यामोत्यांनी मढवलेला राजमुकुट.

हजारो दिव्यांच्या उजेडात हजारो प्रेक्षकांचे समक्ष देशाच्या राजासमोर येऊन उभी राह्यले होते, राणीच्या वेशात.

मांडव – परतणीच्या वेळी लग्नघराच्या सबंध आनंदात सनईची करुण तान जशी मूर्तिमंत होऊन जाते, तसं त्या उत्सवात पण वेदनेची एक व्यंजना मूर्त झाली होती. सालंकृत कन्येला बाप जसं जवळ घेऊन तिच्या मस्तकाचं चुंबन घेतो, तसंच त्यांनी पण मला जवळ घेतलं होतं. अन् म्हणाले होते— माझा आशीर्वाद आहे. असंच राजराणीसारखच तूपण एकदिवस देशाकरता जीव ओवाळून टाक.

तो माझ्या आयुष्या-

# प्रत्यक्ष साक्षीदारांच्या जबान्या

## जबानी पहिली

तला दुर्लभ क्षण होता. आजदेखील डोळे मिटले, की सगळं डोळ्यांसमोर उभं राहातं––तो हजारो दिव्यांचा उजेड, हजारो प्रेक्षकांचा तो मुग्ध विस्मय अन् ते उंच-शुभ्र हिमालयासारखं एक व्यक्तित्व ?

त्यांचा तो आशीर्वाद आजपण फळलेला नाही माझ्या आयुष्यात. प्राण सोडायच्या क्षणी बोलता आलेलं नाही––" मेरा भारत नही दूँगी " म्हणून.

पण तरी काही मी विश्वास गमावलेला नाही. त्यांच्यावर विश्वास न ठेवणं जमण्याजोगं नाही. त्यांचा आशीर्वाद अजून फळलेला नाही हे खरं आहे. पण एक दिवस तो नक्कीच फळेल. खरा होईल.

पण ह्या तर सगळ्या शेवटच्या दिवसाच्या गोष्टी. त्यापेक्षा आधीच्या गोष्टीच आधी सांगते.

माझ्यासारख्या अजिबातच प्रसिद्ध नसलेल्या अनोळखी परदेशी मुलीची माहीतगारी तुम्हांला काय उपयोगी पडेल, कोणजाणे. पण हे सगळं ऐकायला तुम्हांला बरं वाटू दे नाहीतर न वाटू दे, सांगायला मला खूपच बरं वाटतंय्. म्हणूनच तर लिहीत चाललेय्.

मला माहीत आहे, हा 'परदेशी' शब्द तुम्हाला खटकत असेल कदाचित. तुम्ही म्हणाल, तुम्ही कसल्या परदेशी ! तुम्ही ब्रह्मदेशात स्थायिक झालेल्या, पण भारतीयच. उत्साहानं ओथंबलेली एकदोन विशेषणं पण लावून टाकाल तुम्ही बहुतेक. नाहीतरी आझाद हिंद सेनेच्या गोष्टी निघाल्या, की असली निवडक विशेषणं तुम्ही बोलून टाकताच की.

ते काही का असेना म्हणा; सांगायचा मुद्दा एवढाच, की आपण भारतीय आहोत का काय ह्याच्याबद्दल मला मात्र चांगलीच शंका आहे.

भारतवर्ष मी पाह्यलेलासुद्धा नाही. माझा जन्म झाला तो सिंगापुरात. आयुष्याची पहिली वीस वर्षपण तिथंच गेली. नंतर माझ्यासारख्या आणखी शेकडो मुलींच्यासारखी मीपण ब्रह्मदेशात आले. जॉर्जटाऊन, व्हिक्टोरिया पॉइंट, टॅव्हॉय-मौलमीनवरनं चक्क रंगूनला. तिथनं असंच एकदिवस सगळ्या टोळक्यासकट इरावती, टांगू, प्यिन्मनावरनं मंडालेच्या दिशेनं रवाना झालो. मनात होतं कालेवा, टामूवरनं इंफाळला जावं. अन् तिथनं तुमच्या देशात––कलकत्त्याला. दिल्लीलापण.

पण अखेरपर्यंत आमचं टोळकं सरहद्दीपर्यंतपण पोचलं नाही. पोचता आलं नाही. जिथनं आम्हांला परतावं लागलं, तिथनं भारताची सरहद्द अवघ्या बावीस मैलांवर होती; असं मला कुणीतरी सांगितलं. अन् आमच्या ज्या बटॅलियन्सनी भारताच्या भूमीत प्रवेश केला होता, त्यांच्या टोळक्यात तर मी नव्हते. त्यामुळं भारताच्या मातीत भारताच्या राष्ट्रध्वजाला अभिवादन करायचं माझं राहून गेलं. इतकं काही माझं नशीब जोरदार नव्हतं म्हणायचं.

आज मी चाळिशी ओलांडलेली आहे. पन्नाशीला आले की. माझं वय सत्ते-

चाळीस. चांगलीच प्रौढ झाले म्हंजे. केस पिकायला सुरुवात झालीय. डोळ्यांवर जाडजूड भिंगांचा चश्मा बसलाय. रंगूनच्या एका मुलींच्या शाळेत उर्दू शिकवते मी. तेव्हा मात्र मला उर्दू येत नव्हतं अजिबात. माझं स्वतःचं शिक्षण सगळं झालं. इंग्रजी मिशनरी शाळेत. हिंदुस्तानी शिकले ते फौजेत सामील झाल्यावर. अन् उर्दू शिकले ते फौज सोडून निघून आल्यावर मग. इंग्रजी नि हिंदुस्तानी शिकावं लागलं होतं पोटापाण्याकरता. अन् उर्दू मी शिकले. जगण्याकरता. जगून राहण्याकरता. अन् तरी उर्दूच आज माझ्या पोटापाण्याची शिदोरी आहे.—पण हे सगळं काय लावलंय् मी ? हे राहू दे. मी म्हणत काय होते—निव्वळ दोन भारतीय भाषा येतात एवढ्याच जोरावर मी भारतीय थोडीच बनते !

हो, पण माझे आईवडील मात्र दोघंही भारतीयच होते. त्यांचा जन्म भारतातलाच. तुम्ही ज्याला तामिळनाड म्हणता ना, त्या भागातला. कामाच्या निमित्ताने बाबा सिंगापूरला आले. लग्न झाल्यावर जवळजवळ लगेचच. अर्थात आईपण बरोबर होती. माझा जन्म व्हायच्या आधीचं हे सगळं.

सिंगापूरच्या प्रख्यात रॉबिन्सन्स डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये बाबा चीफ अकौंटंट होते. त्यांच्या कामात कुचराई नसायची. त्यामुळं वरचे गोरे साहेबलोक त्यांच्यावर खूष असायचे. रॉबिन्सन्समध्ये शेकडा ऐंशी लोक साहेबच—म्हंजे गोरे. सेल्समनदेखील. त्यांच्यात एकमात्र काला आदमी; म्हणजे माझे बाबा—ए. एम. व्ही. नायर. हंसांच्या कळपात कावळ्यासारखे. कामात चोख नि प्रामाणिक नसते, तर ते तिथं असे टिकून राहिले नसते.

अर्थात आम्ही काही साहेबपाड्यात राहात नव्हतो. जनरल हॉस्पिटलच्या आग्नेय दिशेला चायनाटाउनच्या एका टोकाला आमचं घर होतं. पहिल्यांदा आम्ही भाड्याच्या घरातच राहत होतो; ते वेगळे. हे घर बाबांनी विकत घेतलं, तेव्हा मी आठेक वर्षांची असेन.

पण आम्ही चायनाटाउनमध्ये राहत असलो म्हणून काय झालं, माझा शाळेतला काळ सगळा त्या टिपटॉप राफेल्स प्लेसच्या परिसरातच गेलाय. सगळ्याच शहरांच्यासारखा सिंगापुरातपण हा एक अभिजात इलाखा होता—राफेल्स प्लेस. म्हणजे साहेबपाडा. अन् त्याच्या चारीबाजूंना गोरगरिबांच्या झोपडपट्ट्या. चायनाटाउनमधेपण कायम गर्दी, गर्दी गर्दी. लोक फार दाटीवाटीनं राह्यचे. आमचं घर अगदी टोकाला. अन् तिथनं मी रोज बसनं शाळेला यायची. शहराच्या बिल्कुल मध्यभागी. बस शाळेचीच होती.

कोलियर कंपनीच्या कडेला प्रख्यात बॅटरी रोडवर लाल विटा रंगवलेलं कॉन्व्हेंट स्कूल म्हंजे माझी शाळा. धर्मानं मी ख्रिस्ती. त्यामुळं ख्रिस्ती लोकांच्याच शाळेत माझं नाव घातलं होतं. पण म्हणून साहेबलोकांची मुलं आमच्याच शाळेत यायची असं काही नाही. खरंतर साहेबलोकांपैकी एकपण मुलगा आमच्या शाळेत शिकायचा

नाही. सगळीच मुलं माझ्यासारखी—काळी, बदामी. म्हणजे अँग्लोइंडियन किंवा युरेशियन. ज्यांच्या धमन्यांत शुद्ध युरोपियन रक्त होतं, अशा मुलांच्याकरता खानदानी शाळांची स्वतंत्र सोय होती.

पण ते काही का असेना. जन्मापास्नंच सिंगापूर म्हणजेच आपला देश, असं मी मानत आले. मलायी मुलांमुलींच्यात मी मोकळेपणानं मिसळायचे. मलायी भाषेतच त्यांच्याशी बोलायचंचालायचे. घरात नि शेजारीपाजारी मात्र इंग्रजीतच बोलावंबिलावं लागायचं. मला मात्र आपण मलायी आहोत असंच वाटायचं.

भारतातनं एका साप्ताहिकाचा अंक यायचा बाबांच्या नावावर. दर बुधवारी. साप्तहिक मद्रासहून निघायचं. भारताशी आमचा एवढाच काय तो संबंध. अन् विचित्र लिपीत लिहिलेली पत्रं यायची देशातल्या नातलगांची कधी कधी. मला त्यातलं काना-मात्रा काहीच समजायचं नाही. पण ही पत्रं लिहिणारे लोक म्हणे माझी आँटी, ग्रॅनी, कझिन्स असं काहीतरी लागायचे. लागत असतील. पण आपणपण भारतीय आहोत ही गोष्ट काही मी स्वतःशी देखील कबूल केली नाही. तसंकाही माझ्या मनातच आलं नाही. काही कल्पनाच नव्हती आपण भारतीय आहोत अशी.

ते ध्यानात आलं ते भलतंच अचानक. मरण समोर उभं ठाकलेलं दिसत असताना !

१९४२ साल. ३१ जानेवारी. जवळ जवळ दोन महिने आधी—८ डिसेंबरला—कोटावारूमधे जपानी सैन्य उतरलं होतं. कोटावारू म्हंजे मलायाचं एक लहानसं बेट. सिंगापूरपास्नं अवघं चारेकशे मैल अंतरावर. सिंगापूरला कुणाचाच पहिल्यांदा ह्या बातमीवर विश्वास बसेना. ब्रिटिश सैन्याचा पराक्रम तर कधीच हार न खाणारा. त्यांच्याकडे दुर्लक्ष करून ह्या बुट्टया जपानी लोकांना मलायाच्या एका बेटावर उतरायचं धाडस करवेल—ह्याच्यावर कुणाचाच विश्वास बसेना. जिमखाना क्लबमध्ये, सी-व्ह्यू हॉटेलमधे, रॉबिन्सन्स डिपार्टमेंटल स्टोअरला लागून असलेल्या कँटीनमधे ही बातमी जेव्हा पोहचली, तेव्हा कुणालाच हसू आवरेना. सगळेच म्हणायला लागले—कुणी पसरवली रे बातमी ? जरा तपास करा बरं. प्रचंड प्रॅक्टिकल जोक आहे हं पण !

पण ती अफवा नव्हती. नंतर दोन दिवसांच्या आतच जास्तीच चमकवून सोडणारी बातमी आली. चिनी समुद्रातल्या दोन ब्रिटिश बॅटलशिप्स—प्रिन्स ऑफ वेल्स अन् रिपल्स—तर त्यांना म्हणे जलसमाधी मिळाली. कशी काय ? तर हेपण म्हणे त्या बुट्टया जपान्यांचंच काम. ' तरी कुणी ' विशेष मनावर घेतलं नाहीच. सगळेच म्हणायला लागले—हे निव्वळ योगायोगानं झालं हो. तशी दोन जहाजं बुडवली म्हणा, पण म्हणजे काही जपानी लोक जादूगार झाले का ? ब्रिटिशांची विरोधाची फळी फोडून सिंगापुरात पाऊल ठेवणं काही जपान्यांना शक्य व्हायचं

नाही कधी. पंचवीस वर्षे ब्रिटिश सेनापतींनी खपून-खपून सिंगापूरच्या संरक्षणाची दुर्भेद्य फळी तयार केलेली आहे. ती कसली फोडतात हे ! त्यांना म्हणावं, सिंगापूर दूर असा !

नंतर दोनपण महीने गेले नाहीत. वादळाच्या झपाट्यासारखं जपानी सैन्य तसा काही विरोध न होताच सिंगापूरच्या उत्तरेकडल्या वेशीवर येऊन धडकलं ! मलायाशी सिंगापूर शहराचा तसा सलग संबंध काहीच नाही. सिंगापूर म्हणजे एक बेट. त्याची सबंध उत्तरेची बाजू वेढून एक निरुंद कॉजवे होता. पण शत्रू त्याच्यावरून येईल अशी शंका होती म्हणून सुरुंग लावून तो उडवून टाकला होता. ३१ जानेवारीला. तोच दिवस — जेव्हा माझ्या ध्यानात आलं की, आपण भारतीय आहोत.

ह्याचदिवशी सिंगापूरच्या बंदरातनं शेवटचं जहाज रवाना झालं होतं. आम्हीदेखील त्याचदिवशी सिंगापूर सोडणार होतो. दोन दिवसांपासून सगळी बांधाबांध उरकून सकाळीसकाळीच आम्ही गोदीत हजर झालो. अन् मध्यरात्री परतलो. कोणत्याच जहाजात आम्हांला जागा मिळाली नाही. काम्हणून ? तर आमचा अपराध एकच — आम्ही भारतीय होतो. जहाजवाल्यांनी सांगितलं, की जहाजाकरतां नंबर लावलेत. पहिल्यांदा इंग्रज, फ्रेंच–अमेरिकन लोंक. त्यांना हलवून झाल्यावर मग मुलकी भारतीय लोकांचं बघू या.

पण ते बघायची फुरसत काही जपान्यांनी त्यांना दिली नाही. ३१ जानेवारीनंतर आणखी एकपण जहाज सुटलं नाही.

नंतर सातच दिवसांनी—म्हणजे फेब्रुवारीच्या ८ तारखेला जपानी बॉंबहल्ल्यात आमच्या घराची नावनिशाणीपण शिल्लक राहिली नाही. आई, बाबा, आमची आया अन् आमचं स्पॅनियल जातीचं कुत्रं. मी तेव्हा घरी नव्हते. त्यामुळं मी एकटीच तेवढी वाचले ह्या भयंकर दृश्याची साक्षीदार म्हणून. विमानहल्ला संपल्यासंपल्या धावतपळत घरी आले. आमचं दुमजली घर जियं होतं तिथं आता निव्वळ एक प्रचंड ढिगारा. आग अजून विझली नव्हती. ढिगारा धुमसत होता.

काय मुलखाची विसराळू आहे बघा मी. मी आपली स्वतःची कहाणी सुनवायला लागले की तुम्हांला. पण तुम्हांला काही माझी कहाणी नकोय. तुम्हांला त्यांची कहाणी ऐकायचीय्. तेव्हा माझ्या गोष्टी राहू देत. विषय निघाला नि मी वाहवत गेले. आपण भारतीय आहोत की नाही ह्याच्याबद्दल माझ्या मनात चांगलीच शंका होती — एवढंच मला म्हणायचं होतं. आयुष्याची पहिली वीस वर्षं तशीच गेली — आपण भारतीय आहोत हे मनातसुद्धा न येता. ह्या वीस वर्षांत पहिल्यांदाच ही गोष्ट ध्यानात आली — जेव्हा तामिळनाडच्या नायर-कुटुंबाला त्यादिवशी जहाजात जागा मिळाली नाही — आम्ही भारतीय होतो म्हणून !

जन्मानं मी भारतीय नसले, तरी आणखी एका निमित्तानं मला भारतीय बनता

आलं असतं. बायकांच्या आयुष्यात तीपण एक संधी येतच असते की. माझ्यापण आयुष्यात ती आली होती. आता आज इतकं वय झाल्यावर हे कबूल करायला कशाला लाजायला हवं, नाही का ? माझ्या आयुष्यात पहिल्यांदा ज्यानं रंगीबेरंगी स्वप्नं आणली, माझ्या कुमारीमनाला पहिल्यांदा ज्यानं स्पर्श केला, तो होता भारतीयच.

आता इथंही परत माझी चूकच होतेय् का काय कुणास ठाऊक ! हा स्वप्नं आणणारा काही आता नाही. अन् असता तरीदेखील तुम्ही ज्या बारकाईनं न्याय-निवाडा करत असता, त्या निवाड्यात तो काही भारतीय ठरलाच नसता बहुतेक ! कारण मी जर त्याच्याबरोबर संसार थाटलाच असता, घरदार केलंच असतं, तर मग तुमच्या पोथीबंद निवाड्यात आम्ही पाकिस्तानी ठरलो असतो. भारतीय नाही.




भारतीय
स्वातंत्र्य
चिराय
होवो !

बॉंबे डाईंगचे
एकमेव विक्रेते
पराग
कुंटे चौक, लक्ष्मीरोड पुणे-३०
डेक्कन जिमखाना पुणे-४

PADMA ADVTS-3

तेव्हा अर्थात् मी त्याला भारतीय म्हणूनच ओळखत होते. चूक काही माझी नाही. तो होता सिंधमधला. ह्या सिंधूवरनंच हिंदू शब्द आलेला आहे म्हणे. अन् मग सिंधुस्तानवरनं हिंदुस्थान. आम्ही त्या वेळी जे राष्ट्रगीत म्हणायचो त्यातपण वेगवेगळ्या प्रांतांची जी लांबलचक यादी होती, तिच्यात दुसराच शब्द होता — सिंधू. आता ह्या राष्ट्रगीताची पण फाळणी करून त्याचेपण तुम्ही मोडून दोन तुकडे केलेयत का नाही मला ठाऊक नाही !

तेव्हा जन्मानं काय अन् लग्नानं काय — कशानंच मी भारतीय नाही. तरी किती वेड्यासारख्या उत्साहानं तुमच्या मातृभूमीच्या स्वातंत्र्याच्या स्वप्नानं मी विभोर होऊन गेले होते तेव्हा. किती प्रचंड उत्साहानं धावत निघाले होते ह्या माहीत—नसलेल्या, बघितला—नसलेल्या, ओळख—नसलेल्या भारतवर्षाकडे. माझ्या आयुष्याचं एकमात्र ध्येय तेव्हा होतं —ही सुवर्णभूमी, ही भारतभूमी ! —मौलमीन रंगून-इंफाळवरनं ही जी वाट गेलेली आहे, दुर्भेद्य आराकानच्या अरण्यांतनं ह्या जंगलाच्या पलिकडे, ह्या निळयानिळया पर्वतांच्या रांगेच्या पलिकडे ते सुवर्णराज्य आहे — त्याचं नाव आहे भारतवर्ष ! आम्ही त्या भारततीर्थाचे यात्रेकरू ! इंडियन पिलग्रिम्स ! चाललेलो त्या ध्येयाच्या दिशेनं. तुम्हांला मान्य होणार नाही कदाचित्, पण ती दोन वर्षं मी निःसंशय भारतीय होते !

## ते एक वर्ष, नऊ महिने, सव्वीस दिवस

ते एक वर्ष, नऊ महिने, सव्वीस दिवस. त्याच्या आधी मी मलायी होते, ब्रह्मी होते. पण ह्या लांबलचक सत्तेचाळीस वर्षांच्या आयुष्यातले हे थोडके दिवस — विश्वास ठेवा. — मी मनाप्राणानं भारतीय होते. झांशीच्या राणीच्या तुकडीच्या जन्मापासून ते नेताजींच्याबद्दलची शेवटची बातमी मिळायच्या क्षणापर्यंत !

१९४३ सालच्या २२ ऑक्टोबरपासन १९४५ च्या १८ ऑगस्टपर्यंत. आज मी कुणी का असेना. पण माझ्या आत्मकथेच्या ह्या एवढ्या तुकड्यापुरतं तरी तुम्ही मला भारतीय मानलं नाहीत तर ही आत्मकथा म्हणजे निव्वळ वेडीचं बरळणच बनेल. एक प्रहसन.

तर कुठनं सुरुवात करू ? काय सांगू ? कितीतरी गोष्टी आज मनात गर्दी करतायत. कितीजणांच्या शौर्याच्या गोष्टी, गौरवाच्या गोष्टी, मृत्युंजयी आत्मार्पणाच्या गोष्टी. आठवतेय् — वेलादत्त, मिस भट्टाचार्य, माया गांगुली, रेवा सेन, शिप्रा सेन, चित्रा मुखर्जी — कितीतरी मुली. ह्या सगळ्या तुमच्याच देशातल्या. आम्ही त्यांना कलकत्तैया म्हणायचो. शिवाय इतर प्रांतातल्यापण — उर्मिला अय्यंगार, रुक्मिणी खांडेकर, सरस्वतीबाई अम्माजी.

अन् निव्वळ मुलीच तेवढ्या काय म्हणून ? जवान भावांच्या गोष्टीपण आठव-

ताहेत. त्या मराठी भावाचं नाव लक्षात नाही आता. रंगूनच्या मिआंग इस्पितळात ब्रिटिश बाँबहल्ल्यात तो मेला. मरणाच्या मांडीवर ढळून पडायच्या क्षणभरच आधी मला म्हणाला होता — आरतीताई मला नाही जमलं. पण स्वतंत्र भारत-वर्षात तुम्ही एकदिवस नक्कीच पोचाल.

आठवतेय कॅप्टन शरयूप्रसादची ती शेवटची विनंती — नेताजींची भेट झाली तर सांगा, गांधी ब्रिगेडच्या कॅप्टन शरयूप्रसादच्या छातीत गोळी घुसली म्हणून, पाठीत नाही.

अन् आठवतेय मौलमीन इस्पितळात मृत्यूच्या पंथाला लागलेल्या लेफ्टनंटची ती शेवटची किंकाळी. जनरल ए. सी. चतर्जींचा एडीसी — लेफ्टनंट नाझिर अहमद. आम्ही थट्टेनं त्याला छोटा लाट म्हणायचो. नेताजींचा जीव वाचवण्या-साठी —

पण नाही. तुम्ही काही ह्या लोकांच्या गोष्टी सांगायला मला बोलवलेलं नाही. तर मी फक्त त्यांचीच गोष्ट तेवढी सांगते. नाझिर अहमद तर शिवाय आज भारतीयपण नाही. त्याची गोष्ट राहू दे.

१९४५ सालच्या २३ एप्रिल पास्नं मी सुरुवात करते. कारण त्याच्या आधी त्यांच्या, इतकं घनिष्ठ, सान्निध्यात यायची संधी मला मिळाली नव्हती. ह्या २३ एप्रिलपास्नं ते मे पर्यंतच्या तेरा दिवसातला माझा मी अनुभव सांगते.

ह्या थोड्या काळात त्यांना खूप जवळनं बघायची दुर्लभ संधी माझ्या आयुष्यात आली होती. ही संधीपण अत्यंत दुर्दैवानं आलेली होती.

तुम्ही तर त्यांच्याच देशातली मंडळी. त्यांची फार घनिष्ठ ओळख तुम्हांला ! पण माफ करा, तुम्ही ज्यांना ओळखता ते देशगौरव सुभाषचंद्र बोस ! आझाद हिंद फौजेच्या सरसेनापती नेताजींना तुम्ही कधी बघितलं नाही, ओळखलं नाही. तुम्हांला त्यांची काही माहितीपण नाही. ती कल्पना करता येणंसुद्धा तुम्हांला शक्य नाही. त्याचमुळं इंग्रज सेनापतीची आंधळी नक्कल करून, कल्पना लढवून तुम्ही त्यांची चित्रं काढता — छातीवर ढीगभर मेडल्स लटकवलेली नि खांद्यावर जरीच्या झालरी सोडलेल्या — अन् कॅलेंडर करून घरात टांगून ठेवता.

पण आम्ही त्यांना ज्या वेशात पाह्यलंय् त्यात एकपण मेडल नव्हतं ! लाल-निळ्या फिती घालून सोंगासारखं सजत नव्हते ते ! अगदी साधासुधा पोशाख होता आमच्या सरसेनापतींचा. अन् डोक्यावरच्या टोपीला पाव इंच व्यासाची दोन लख्ख पितळी वटणं. वर पुऱ्या बाह्यांचा बुशकोट, खाली ब्रीचेस — म्हंजे तुमान अन् पायात गुडघ्यापर्यंत येणारे टॉपबूट.

काडीइतका भपका नव्हता त्या पोशाखात ! अगदी साधासुधा फौजी पोशाख ! ह्याच पोशाखात ते फील्ड मार्शल तेरागुची किंवा तोजोंना भेटायचे ! डॉक्टर बा मोंना भेटायचे ! अन् आमच्यापैकी कुणी प्रत्यक्ष बघितलं नसलं तरी अंदाज करता

येतोय — हिटलर-मुसोलिनी सारख्यांना पण भेटायचे ते ह्याच पोशाखात ! अर्ध्या जगाला आदरानं त्यांना मान्यता द्यावी लागली अन् बाकीचं अर्ध जग त्यांच्या भीतीनं थरथर कापायचं — ते काही त्यांच्या पोशाखाच्या भपक्यामुळं नाही, दुसऱ्याच कशामुळं.

पण हे तुमच्या डोक्यातच येत नाही. त्याच्यामुळं त्यांचा पुतळा बसवायचा झाला, की औट्रामची आंधळी नक्कल करण्याखेरीज आणखी कशाची कल्पनापण तुम्हांला करता येत नाही.

आम्ही त्या दिवसात त्यांना अगदी जवळनं बघितलं. पण कधी घोड्यावर बसलेले बघितले नाहीत ते ! त्यांना जीपमध्ये बघितलंय. वेपन कॅरियरमध्ये बघितलंय. प्लेनच्या कॉकपिटमध्ये. ट्रेनच्या डब्यात. गुडघाभर चिखलातनं पाय उचलत उचलत पुढं होताना बघितलंय. पण घोड्यावर बसून नेताजी तलवारीचे हात करतायत — छे ! हे काही डोक्यात येत नाही अजिबात.

पण तुमची तरी काय चुक म्हणा. शिवाजी नि राणा प्रतापची पोज सोडून शौर्याचं आणखी काही रूप तुमच्या मनातच येत नाही. पण त्यामुळंच औट्रामच्या घोड्याची शेपटी धरून तुम्हांला ओढूनताणून काहीबाहीच करावं लागतं ना !

पण मी काय सांगत होते ?

सन १९४५. तारीख २३ एप्रिल.

तेव्हा आम्ही रंगूनमध्ये होतो. आम्ही हरायला सुरुवात झाली होती. इंफाळ-कोहिमा-पालेल ह्या भागातले दिवस एव्हाना इतिहासजमा होऊन गेले होते. आठवड्याभरापास्नं जवळपास रोजच बातम्या येत होत्या — तोआंगू आघाडीवर जपानी नि आझादी सेनेचा विरोध हलके हलके मोडून पडतोय म्हणून. ब्रिटिश सैन्य लढाऊ गाड्या नि प्रचंड टँक्स घेऊन रंगूनच्या दिशेनं पुढं पुढं सरकत होतं. त्यांची शस्त्रसामग्री पुढारलेली. तिच्यासमोर जपानी सैन्याची कष्ट सोसायची कुवत अन् आझादी सैन्याच्या शौर्याचा टिकाव लागत नव्हता.

इंग्रजांनी लढाई जितली ती रणांगणावर नाही. रणांगणापास्नं शेकडो मैल लांब असलेल्या कारखान्यातनं त्यांनी लढाई जितली. आमच्याजवळ फक्त हातबाँब नि रायफल. शत्रू आमच्या माऱ्याच्या टप्प्यांत यायच्याआधीच दूरवरनं त्यांच्या लांब पल्ल्याच्या तोफा गरजून उठायच्या. हातघाईच्या संगिनींच्या लढाईतच आम्ही त्यांना परत परत हार खायला लावली होती.

पण आता ते येत होते रणगाडे घेऊन. वरती फिरत त्यांच्यावर छत्र धरून विमानांचे थवेच्या थवे. आमच्या संगिनींनी रणगाडे थोडेच थोपवले जातात ! अन् रणगाडा तर आमच्याकडे एकपण नव्हता. ब्रह्मदेशात जपानी विमानं जी काही होती, ती ते घेऊन गेले होते प्रशांत महासागरातल्या बेटांवर. नाहीतर खुद्द जपानच धोक्यात यायची भीती होती.

थोडक्यात काय तर, शत्रूकडे लढाईची साधनं चिक्कार होती, अन् त्यांची सामग्री आमच्यापेक्षा चांगल्या बनावटीची होती. निव्वळ देशप्रेमाच्या उत्साहानं आम्ही त्यांचा कसा काय मुकाबला करणार? त्यांच्या निव्वळ वजनानंच आमची सगळी धार बोथट होऊन गेली. रंगूनचा पाडाव पक्काच आहे. फक्त काही दिवसांची वाट आहे. —— हे एव्हाना नक्की झालं होतं.

आमच्या राणीवहिनीच्या जवळ जवळ तीनशे मुली तेव्हा रंगूनमध्ये होत्या. लेफ्टनंट कर्नल लक्ष्मी स्वामिनाथनना त्यांच्या सुरक्षिततेचा घोर लागून राहृला होता. त्या स्वतः मात्र बहुतेक त्या वेळी रंगूनमधे नव्हत्या.

आमच्या ह्या डिटॅचमेंटच्या कमांडर होत्या; लेफ्टनंट जानकी थीबर्स. जानकी-ताई किती बेचैन झाल्यायत हे मात्र त्यांच्या तोंडावरनं कळायला काही मार्ग नव्हता. मनात वादळ घोंघावत असलं, तरी जानकीताई त्यांतलं बाहेर काहीच दाखवायच्या नाहीत.

मी म्हंजे जानकीताईचा उजवा हात. त्यामुळं मला सगळं समजायचं. चांगलं कळत होतं, की ह्या अगदी बेचैन झालेल्या आहेत. रात्री त्यांना धड झोपपण येत नव्हती. स्वतःकरता म्हणून नाही. पण इतक्या मुलींची जबाबदारी त्यांच्या माथ्या-वर होती.

सी–फोर्थ रेजिमेंटच्या गोऱ्या हायलँडर्सना नि विशेषतः आफ्रिकन हबशी रेजि-मेंटच्या राक्षसासारख्या धुडांना दुसरं कुणी ओळखत नसलं, तरी जानकीताई चांगलंच ओळखून होत्या. स्त्री-संगापास्न वंचित असलेल्या ह्या नरपशूंना एकदा का रंगूनमध्ये पाऊल ठेवतां आलं, की सगळ्यात आधी आमच्याच तुकडीचा सत्यानास होणार होता. त्यांच्या यायच्या वाटेत कितीतरी ब्रह्मी गावं होती. तिथं-सुद्धा नाना वयाच्या बायका होत्याच. पण ब्रिटिश कमांडर डोळ्यात तेल घालून नजर ठेवून आहे तिकडे. आशियाई निगर बायकांची इज्जत लुटली गेली तर त्याला वाईट वाटेल असं नाही! निव्वळ लष्करी आवश्यकतेकरता त्याला ही खबरदारी बाळगावी लागतेय. स्त्री-संगाकरता वखवखलेल्या ह्या सैनिकांना ब्रह्मी बायकांच्यावर ही वखवख काढू दिली, तर गावातल्या रहिवाशांची सहानुभूती ते गमावून बसतील, अन् स्थानिक लोकांच्या सहकार्याऐवजी ह्या दुर्गम जंगलातनं एकपाऊलपण पुढं जाणं अशक्य आहे. सैन्याकरता दाणापाणी कुठनं मिळेल हे त्यांनाच ठाऊक, ह्या भयानक जंगलांतल्या वाटेच्या खाणाखुणा त्यांनाच ठाऊक अन् खळखळत्या डोंगराळ नद्या कशा पार करायच्या त्या युक्त्यापण त्यांनाच ठाऊक. त्यामुळं आपल्या सैनिकांना काबूत ठेवणं ब्रिटिश सेनापतींना नाइलाजानं का होईना भाग पडलेलं आहे.

हे भुकेलेले सैनिक जेव्हा रंगून शहरात प्रवेश करतील तेव्हा त्यांचा हा कृत्रिम संयमाचा बांध फुटून जाईल हे आम्हांला माहीत आहे. इथल्या राणीवाहिनीच्या

तीनशे मुली काही ब्रह्मी गावातल्या मुली नाहीत. त्यांच्या नजरेत तर आम्ही शत्रुपक्षाची मंडळी! आम्हांला पकडून त्यांच्या बराकीत घेऊन जाण्याबद्दल आंतरराष्ट्रीय फर्मान आहे! आम्ही सैनिक. त्यामुळं आम्हांला तर युद्धबंदी करतील. सैन्याच्या जरुरीप्रमाणं युद्धबंद्यांच्याकडनं नाना कामं करून घेतातच! त्यामुळं आम्हांला ट्रकमध्ये घालून ते छावणीत घेऊन गेले तर कुणाला हरकत घेता येणार नाही! मग काटेरी तारांच्या कुंपणाच्या आत त्यांनी आमच्याकडनं काय काय करून घेतलं, त्याची कोण चौकशी करायला जातंय!

आमच्या तुकडीच्या इनचार्ज लेफ्टनंट जानकी थीबर्सना मनोमन हे निष्ठुर सत्य कळून चुकलं होतं. पण तोंड उघडून तसं म्हणताना त्यांना कुणी बघितलं नाही कधीच. उलट आमच्या छावणीत ही गोष्ट निघाली, की लगेच त्या आम्हाला थांबवायच्या. म्हणायच्या, वेळेवर सगळी व्यवस्था होऊन जाईल.

आता व्यवस्था म्हणजे काय होऊ शकेल हे आमच्या अजिबातच ध्यानात येत नव्हतं. आझाद हिंद सेनेचे बरेचसे मुख्यमुख्य लोक त्या वेळी रंगूनमध्येच होते. लष्करी हेडक्वार्टर्सपण रंगून होतं. मेजर जनरल भोसले अन् जमन कियानी हेडक्वार्टर्समध्येच होते. हंगामी आझाद हिंद सरकारच्या प्रचारयंत्रणेची धुरा सांभाळणारे अय्यरपण रंगूनमध्येच होते. अन् सर्वांत महत्त्वाचं म्हणजे खुद्द नेताजीपण रंगूनमध्येच होते.

इंग्रजांचं सैन्य येऊन ठेपायच्या अगोदर ह्यांना शहर सोडून जायचं होतं. हेडक्वार्टर्स आणखी दक्षिणेला हलवायचं होतं. कदाचित मौलमीनला. किंवा बँकॉकला किंवा त्याच्याही पलीकडे — म्हणजे सिंगापूरला.

शिवाय आमचीपण काळजी असणारच.

आमची — म्हंजे झाशीच्या राणीच्या तुकडीची — मुख्य कचेरी होती एका शाळेच्या इमारतीत. शहर आता केव्हाही पडेल ह्या भीतीनं बहुतेक मुलकी मंडळी शहरांतनं उपनगरांत अन् खेड्यांत निघून गेली होती. एकसारख्या बाँबहल्ल्यांनी शहरांतल्या बहुतेक पक्क्या घरांची पडझड झाली होती. शाळा आधीपास्नं बंदच होती. त्यामुळं ह्या शाळेतच आमची मुख्य कचेरी आम्ही खोलली होती. शाळेच्या खेळाच्या पटांगणात आमची परेड चालायची. शाळेच्या तासाच्या घंटेवर आमचे पण तास मोजले जायचे. शाळेच्या तालमीत आमचा रसोडा होता. वेगवेगळ्या वर्गांत बाकं जोडून आमची झोपायची व्यवस्था झाली होती. कमांडंट थीबर्सनं हेडमास्तरांच्या खोलीत बस्तान बसवलं होतं.

आठवड्याभरापास्नं रोजच बातम्या येत होत्या, की ब्रिटिश सैन्य थोडं थोडं पुढं येतंय्. ब्रह्मदेशाच्या मध्यभागात मंडाले नि म्यिनगॉन शत्रूच्या हाती पडली होती. मैखिला-अमोथीन ओलांडून शत्रू च्यिनमानाकडे चाल करून येतोय्. तिथलं सुसज्ज जपानी ठाणंपण अठ्ठेचाळीस तासांपूर्वी पडलं होतं.

अखेरची बातमी आली होती ती अशी, की शत्रूचं सैन्य सित्तांग नदीच्या कडे-कडेनं टांगूच्या दिशेन येतंय्. म्हणजे टांगू पडल्याची बातमी आता कोणत्याही क्षणी येऊन थडकेल. टांगूपास्नं चालत रस्त्यानं रंगून निव्वळ अडीचशे मैलांवर. म्हंजे मधे अडथळे-बिडथळे न येता सुसज्ज सैन्याच्या हिशेबी अवघी दोन दिवसांची वाट!

ही झाली पार्श्वभूमी.

## आता परत २३ एप्रिलशी येऊ या

काल सबंध रात्रभर झोपच लागली नाही. नाना काळज्यांनी निरुंद बेंचवर कशीबशी कुशी बदलत रात्र काढली. शाळेच्या पितळी घंटेवर रात्रीची पहारेकरी मुलगी तासामागून तास मोजत होती. स्तब्ध रात्रीच्या निःस्तब्धतेवर उमटलेली ही खणखणीत खूण वारंवार जणू आम्हांला एकच आठवण करून देत होती-- रंगून पडायच्या मुहूर्ताचा अंतिम क्षण जवळ जवळ येतोय् ! आणखी जवळ !

एकवीस वर्षातले नाना अनुभव त्या जाग्या रात्री परत माझ्याकडे आले होते. सिंगापूरच्या शालेय जीवनातले स्वच्छंदी दिवस, दिव्यांनी झगमगणाऱ्या राफेल्स प्लेसमध्ये आईचं बोट धरून मार्केटिंग करणं, रॉबिन्सन्स स्टोअर्समध्ये ओळीनं मांडून ठेवलेल्या मेणाच्या विलायती बाहुल्यांचे इशारे! माझा शॅगी! तो छोटासा स्पॅनिअल! त्याचे कान कसे सारखे झुलत असायचे! काय मस्ती करायचा माझ्याशी ! काय आनंदात गेले ते सगळे दिवस !

युद्धाच्या बातम्या रेडिओवर ऐकायचो आपण. बीबीसी किंवा ऑल इंडिया रेडिओ. वर्तमानपत्रातपण युद्धाच्या गोष्टी वाचायचो. सिंगापूरमध्येच निघायचं दैनिक ट्रिब्यून. ते सिंगापूर पडलं. आयुष्य मुळापास्नं बदलून गेलं. एका क्षणात आईबाप--नसलेली अनाथ झाले मी.

मग जीवनाच्या गतीनं उल्केची गती घेतली. जे जपानी आमचे शत्रू होते, ते मित्र झाले. ज्या इंग्रजांना मित्र मानलं, ते आम्हांला सोडून पळाले. हळूहळू ते शत्रू बनले. हा बदल काही एका दिवसात झाला नाही. तो तिळतिळ होत होता.

पहिलं वर्षभर वाट फुटेल तशी जात राह्यले. भरकटत. मग एक दिवस सिंगापुरात आला समुद्रपारचा राजपुत्र. नवीन आशेची वाणी ऐकवली त्यानं वज्रासारखं गरजून. नव्यानं घडवलं आझाद हिंद सरकार, आझाद हिंद सेना. मग 'झांशीची राणी' नाव घेऊन एक तुकडी. अगदी सुरुवातीलाच मी नाव दाखल केलं होतं. मग तेव्हापास्नं वहात वहात आज येऊन पोचलेय् रंगूनच्या ह्या शाळेच्या इमारतीत. सैनिक म्हणून. सिंगापूरपास्नं रंगून म्हणजे काही थोडाथोडका रस्ता नाही. काही वाट काटली गाडीनं, काही स्टीमरनं, काही पायी.

पण झोप-उडालेल्या रात्रीच्या निःस्तब्धतेत भूतकाळच्या आठवणीच तेवढचा हातानं इशारा करत मला बोलवायच्या असं नाही. अजूनपर्यंत न आलेला भविष्य-काळपण इशारे करायचा. ह्या प्रचंड संकटांतनं काय आपल्याला बाहेर पडता येणाराय्? रंगून पडलं म्हणजे काही हे काळयुद्ध संपलं असं तर मुळीच नाही, ही लढाई चालूच आहे! ती चालूच राहील? बँकॉकहून! सिंगापूरहून! वेळ पडली तर टोकियोहूनपण! भारतवर्ष स्वतंत्र होईपर्यंत ती चालूच राहील!

पण ही झाली युद्धाची शेवटची परिणती. आपली शेवटची परिणती काय? आम्ही--म्हंजे स्त्रीसेनेचे हे तीनशे सैनिक--आम्ही काय रंगूनच्या लढाईतच नाहीसे होणार आहोत? तसा जर हुकूम झाला तर कुणाला त्याचं दुःख होणार नाहीये. आम्ही सगळ्याजणी उलट खूषच होऊन जाऊ. निदान अशा दृढ श्रद्धेनं मरता येईल, की ह्याच्यानंतरपण स्वातंत्र्याची लढाई चालूच राहणाराय! भारत-माता साखळदंडातनं सुटेपर्यंत! मातृभूमी स्वतंत्र होणारच! अन् तेही लवकरच! अशी माझी पक्की खात्री आहे. हे व्हायलाच हवं की. का म्हणून? — नेताजी म्हणालेयत ना!

हे सगळे विचार डोक्यात घोळत होते म्हणूनच झोप येत नव्हती. नंतर पहाटेच्या अंगाला केव्हातरी झोप लागून गेली. तेवढ्यात एक स्वप्न पडलं.

स्वप्नात माझं पूर्वीचं आयुष्य परत आलं नाही. पुढच्या भीतीचं पण त्यात काहीच नव्हतं. स्वप्नात पाह्यलं—आपलं लग्न चाललंय. दिव्यांचा झगझगाट असलेला लग्नसोहळा. पण चर्चबिर्च नाही. मांडव. नवरामुलगा येतोय् घोड्यावरनं. दूल्हा. डोक्याला फेटा, पायांत चढाव, अंगात रंगीत अंगरखा. नौबतखान्यात सनई वाजतेय्. मी आडनं सगळं बघतेय्. मी ओळखलं त्याला. --छोटा लाट तो—

एवढ्यात कुणीतरी धक्का मारला. अचानक झोप मोडली.

--ए आरती, ऊठ ना. रेव्हरी कधीची वाजतेय्.

इतका राग आला भाभीजींचा. काय अडलं होतं माझी झोप मोडायचं? पण झोपदेखील नाही, स्वप्न मधेच तुटलं म्हणून एकदम वैताग आला. झोपेत जे स्वप्न मी बघत होते, ते कधी प्रत्यक्षात उतरण्याइतकं भाग्य माझं नाहीच—तसा दिवस कधीच उगवणार नाही, हे मला ठाऊक आहे. म्हणून तर निव्वळ स्वप्नातच तो अनुभव घेत होते मी. ह्यात भाबीजींचं काय बिघडत होतं?

—चटदिशी तयार हो. नाहीतर परेडला जायला उशीर होईल.

परेड पहाटे साडेपाचला असायची. त्यामुळं रोज चार वाजताच बिगुल वाजायचा. बिगुलची पहिली ललकारी—रेव्हरी. अर्धवट झोपेत, अर्धवट जागेपणी हा लष्करी सूरच माझ्या मनात लग्नमंडपांतल्या सनईचं रूप घेऊन आला होता!

धडपडत उठून बसले. खरंच उशीर झालाय्. दुसऱ्या मुलींचे प्रार्तविधी वगैरे केव्हाच होऊन गेलेयत. कुणी कुणी तर लष्करी गणवेश अंगावर चढवायच्या बेतात.

घाईगर्दीनं अर्ध्या तासात मीपण स्वत:ची तयारी आटपली.

परेड उरकून परत स्वत:च्या बराकीत आले तर चिक्कार वेळ झाली होती. सगळीकडे लख्ख उजाडलं होतं.

शाळेच्या मोठ्या हॉलमध्ये आमच्या अठ्ठेचाळीसजणींचे बिस्तरे अंथरलेले असायचे. इकडे चोवीस, तिकडे चोवीस. अर्थात् परेडला जायच्या आधीच आपापला बिस्तरा गुंडाळून ठेवायला लागायचा. उशाशी घडी घातलेला बिस्तरा नि किट-बॅग. बेंचच्याखाली मग न् स्लीपर. परेड संपल्यावर जी-ती आपापल्या बराकीत जायची. लेफ्टनंट थीवर्स बघत फिरणार प्रत्येक बराक. मी त्यांचा उजवा हात. त्यामुळं मलापण जावं लागायचं त्यांच्याबरोबर. मुली आपापल्या बिस्तऱ्याशी उभ्या राह्यच्या अॅटेन्शनमध्ये. लष्करी टापटिपीत काही उणीव नाही ते बघून घ्यायच्या कमांडंट थीवर्स.

नेहमीप्रमाणं सगळं बघून झाल्यावर लेफ्टनंट थीवर्स आम्हांला सगळ्यांना उद्देशून म्हणाल्या—आज बारा वाजता सगळ्याजणी परेडग्राउंडवर जमतील. सबंध सेनेचे चीफ-ऑफ-स्टाफ आपली ही डिटॅच्ड तुकडी बघायला येणार आहेत. आपल्या नंतरच्या कार्यक्रमाबद्दल काही आदेशपण ते कदाचित देतील. केव्हाही एका तासाच्या नोटीशीवर रवाना व्हायची तयारी तुम्ही कायम ठेवा. आणि ह्या बराकीतल्या तिघीजणी पंधरा मिनिटांनी मला येऊन भेटतील—सब-ऑफिसर आरती नायर, लान्सनायक सुभद्रा जयस्वाल आणि कॅडेट नमिता सेनगुप्ता.

आम्हांला स्टॅंड-ईझी करून लेफ्टनंट थीवर्स निघून गेल्याबरोबर आम्ही एक-मेकींच्या तोंडाकडं बघायला लागलो. सगळ्याजणी कुतुहलानं आमच्याभोवती जमा झाल्या. आझाद हिंद सेनेचे चीफ-ऑफ-स्टाफ म्हजे मेजर-जनरल जे. के. भोसले. अधिकारानं नेताजींच्या खालोखाल. कारण नेताजी सरसेनापती. तर ते स्वत: तपासणीला येणार. म्हणजे नक्कीच काहीतरी महत्त्वाचा हुकूम असणार. आमचा पुढचा कार्यक्रम कदाचित पक्का झाला असेल.

दोनच शक्यता आम्हांला दिसत होत्या. एक तर आमच्यावर रंगून अडवून मरेपर्यंत लढायचा हुकूम बजावतील, किंवा मग सगळ्यांनाच ब्रह्मदेशच्या दक्षिण भागात हलायचा हुकूम होईल.

अन मागेच हटायचं असेल तर पायीपायी जाण्यावाचून गत्यंतरच नाही. रेल्वे-ट्रक वगैरे जी काही वाहनं आत्ता रंगूनमध्ये आहेत, ती सगळी जपानच्याच दिमतीला लागतायत—सैन्य हलवण्याकरता. महिनोन् महिने इतके दिवस सगळंच रंगूनमध्ये आणून ठेवलं होतं. रंगून म्हणजे जपानचं लढाई चालवण्याचं मुख्य ठाणं होतं. त्यामुळं आमच्याकरता काही वाहनाची सोय होण्याची शक्यता फार कमी होती. फार फार तर आय-एन-ए-च्या काही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्याकरता ट्रकची काही सोय करतील ते. शेकडो मुलींना हलवता येईल अशा वाहनांची सोय करणं त्यांना आत्ता अशक्यच आहे.

पायी पायी जायलापण आमची तशीकाही हरकत नाही. फक्त पायी जायचा रस्ता सुरुवातीला तरी सरळ शत्रुसैन्याच्या दिशेनंच जात होता. ही गोष्ट जराशी समजावून सांगायला पाह्यजे ना ? चक्क नकाशाच काढून दाखवता आलं असतं तर फार बरं झालं असतं. रंगूनहून विमान निघालं न् बँकॉककडे गेलं, तर त्याला सरळ आग्नेय दिशेनं जाता येतं. अन् रंगून शहराच्या दक्षिणेला अन् पूर्वेला--दोन्ही बाजूंना--समुद्र आहे--मर्तवान उपसागर. त्याच्यामुळं रंगूनहून चालत बँकॉकला जायचं तर पहिल्यांदा सरळ उत्तरेकडे तोंड करून जावं लागतं. रंगून-पेगू रस्ता पकडून. असं निदान पन्नास मैल उत्तरेकडे तोंड करून चालत राहिल्यावर मग वळायचं. जवळपास अबाउट-टर्न करायचं. तोंड आग्नेय दिशेकडे.

आता हे जे पहिले पन्नास मैल आम्हांला उलटीकडे जावं लागेल--तिकडनंच शत्रूचं सैन्य इकडे येतंय ! अन् आम्हांला तसंच जावं लागेल. काही इलाजच नाही दुसरा.

## शेवटची लढाई इथूनच लढू या

बातमी तर अशी आहे, की ब्रिटिशांची सी-फोर्थ डिव्हिजन आता रंगूनच्या उत्तरेला अडीचशे मैलांवर आहे. पायी हे पहिले पन्नास मैल काटायचे तर आम्हांला किमान दोन रात्री लागतील. कारण दिवसा तर काही चालत यायचं नाही.

त्यामुळं आणखीपण एक शक्यता आहे. म्हणजे धरा, आम्ही दोन रात्री चालून एके ठिकाणी पोचलो अन् नेमकं त्याचवेळी दोनदिवस दोनरात्री काटून ब्रिटिश सैन्यपण तिथं येऊन ठेपलं ! तर मग ? कारण गाड्याबिड्या असताना दोनेकशे मैल अंतर काटायला त्यांना ह्याच्यापेक्षा जास्ती वेळ लागायचं काही कारणच नाही.

तेव्हा आत्ता आम्ही ज्याला मागं हटणं म्हणतोय, ते प्रत्यक्षात शत्रूच्या व्यूहात आपण होऊन जाऊन सापडण्यासारखंपण होईल की ! सुरक्षित रंगूनमध्ये इंच इंच जमिनीकरता आम्हांला त्यांच्याशी लढता येईल. म्हंजे स्ट्रीट-फायटिंग करता येईल. स्टालिनग्राडसारखंच. रस्त्याच्या वळणा-वळणावर अडथळे उभे करता येतील. घराघरांत खिडकीतनं बंदुकीच्या नळचा तेवढ्या बाहेर काढून दबा धरून बसता येईल. मोलोटोव कॉकटेल फेकून अत्यंत पराक्रमी रणगाड्याला आग लावता येईल. पण मोकळ्या मैदानात रणगाडे अन् लष्करी गाड्यांच्या विरुद्ध असं उभं राहाणं मात्र शक्यच नाही.

लेफ्टनंट थीवर्स निघून गेल्यावर हीच सगळी चर्चा आमच्यात चालली होती. तर लान्सनायक सुभद्रा जयस्वाल म्हणाली--ते सगळं खरं ग. पण ही गोष्ट इतकी साधीसोपी आहे, की मेजर जनरल भोसले किंवा किनानींच्या डोक्यात ती आलीच नसेल असं कसं म्हणता येईल ?

नमितातार्इ जरा वैतागलीच. म्हणाली——ठीक आहे. पण आपल्याला जर रंगून सोडून मार्च करून निघून जायचा हुकूम दिला तरी आपली इच्छा काय आहे, ते आपण त्यांना सांगायलाच हवं. फौजी हुकूम आपल्याला मानावाच लागेल हे खरं, पण आपल्या मनात जी शंका आहे, आपल्याला जे वाटतंय तेपण आपण त्यांना सांगू या. मग जो काही हुकूम होईल तो आपण निमूटपणानं पाळू. माझं तरी मत असं आहे, की असं बावळटासारखं मृत्यूच्या मुखात चालत जाण्यापेक्षा आपण रंगूनमध्येच थांबू या. ह्या शाळेतच. इथनंच शेवटची लढाई लढू या. झाशीच्या राणीच्या तुकडीची एकपण मुलगी जिवंत असेपर्यंत ब्रिटिश सैन्यातला एकपण सैनिक ह्या शाळेच्या किल्ल्यात पाऊल ठेवू शकणार नाही ! काय अम्माजी, तुमचं काय म्हणणं आहे ?

सरस्वतीबाई गढवाल आमच्यात वयानं सगळ्यात मोठ्या. सगळ्याचजणी त्यांची फार इज्जत करायच्या. त्याच आमच्या सगळ्यांच्या अम्माजी. अन् फक्त वयानंच त्या मोठ्या होत्या असं नाही. एक अंगमेहनतीचं काम सोडलं तर बाकी सगळ्याच बाबतीत त्या आमच्यापेक्षा वरचढ होत्या. सैन्यात भरती व्हायच्या आधी त्या बँकॉकच्या एका मुलींच्या कॉलेजात प्रोफेसर होत्या. तत्त्वज्ञानाचा गाढा अभ्यास होता त्यांचा. चारपाच भाषा त्यांना यायच्या. मलायी, ब्रह्मी, इंग्रजी अन् हिंदुस्थानी तर झाल्याच, पण शिवाय फ्रेंच नि जर्मनपण यायचं. त्यांच्या अंगावर एकपण दागिना नव्हता. त्या विधवा होत्या. त्यांचा नवरा आझाद हिंद सेनेत वरिष्ठ अधिकारी होता. आमने सामने लढाईत तो पडला. सरस्वतीबाई अत्यंत निष्ठावंत न आस्तिक होत्या. त्यामुळं आम्हा सगळ्यांच्याच मनात त्यांच्याबद्दल निःसीम आदर होता.

तर अशा ह्या सरस्वतीबाई म्हणाल्या लेफ्टनंट थीबसनी——तुम्हा तिघांना बोलावलंय्. रंगून सोडायची गोष्ट त्यांनी काढलीच तर आपल्या डिटॅचमेंटचं हे मत तेवढं तुम्ही त्यांना सांगून टाका. म्हणावं, ह्या शाळेच्या इमारतीत जेवढ्या गोळ्या आहेत तेवढ्या सगळ्या शत्रुसैन्यावर झाडून संपत नाहीत तोपर्यंत हा किल्ला पडू देणार नाही !

मी म्हणाले——पण अम्माजी, सगळ्याच गोळ्या काही शत्रुसैन्यावर झाडल्या जायच्या नाहीत !

——ते का म्हणून ?——भिवया उंचावून प्रोफेसर सरस्वतीबाई गढवालनी माझ्याकडे पाह्यलं.

——तुम्ही विसरून गेलात वाटतं. आपल्या स्वतःच्या भांडारात तीनशे बुलेट्स आहेत. अन् आपण इथं तीनशेजणी आहोत. प्रत्यक्ष नेताजींचा हुकूमनामा आहे !

अम्माजी म्लान हसल्या. एक हात त्यांनी माझ्या डोक्यावर ठेवला. अस्फुट आवाजात म्हणाल्या —— हो, आठवलं ! प्रत्यक्ष नेताजींचा हुकूमनामा !

एकदम काय झालं कुणास ठाऊक. अठ्ठेचाळीस मुली पुतळ्यासारख्या निस्तब्ध उभ्या राह्यल्या पुरतं मिनिटभर! कुणाच्याच तोंडून काही शब्द बाहेर येईना.

आम्ही कशाबद्दल बोलत होतो, ते सगळ्यांना ठाऊक आहे. सगळ्यांनाच ती घटना आठवली! जवळ जवळ सहा महिन्यामागचा तो एक दिवस आमच्या डोळ्यां-समोर उभा राह्यला! आमच्या तुकडीतली एक मुलगी त्या दिवशी शहीद झाली होती! झाशीच्या राणीच्या तुकडीतली पहिलीच शहीद! काळजाच्या रक्तानं तिनं तीनशे बुलेट्सची किंमत चुकती करून टाकली होती! मी पाह्यलं, ऊर्मिलेचे दोन्ही डोळे भरून आले होते.

गेल्या वर्षीच्या ऑक्टोबर महिन्यातली गोष्ट. कोहिमा-इंफाळ कालादानमध्ये अजून इतिहास घडला नव्हता. आझाद हिंद सरकारच्या पहिल्या वार्षिक उत्सवा-निमित्त एक प्रचंड लष्करी मेळावा भरला होता रंगूनच्या सेंट्रल पार्कमध्ये. एवढं मोठ्ठं मैदान, पण कुठं तिळभर जागा मोकळी नव्हती त्यादिवशी. आझाद हिंद सेनेच्या जवळ जवळ तीन हजार सैनिकांनी त्या परेडमध्ये भाग घेतला होता. खेरीज जपानी सैनिक अन् बाकीचे नागरिक. झाशीच्या राणीच्या तुकडीत स्वयंसेविका तेव्हा हजाराच्या घरात होत्या. आणखी मलाया-सयाम-ब्रह्मदेशात स्थायिक झालेल्या हजारो भारतीय स्त्रियांनी स्वयंसेविका होण्याकरता नावं नोंदवली होती. पण त्यांना शिकवून तयार करण्याची वगैरे व्यवस्था पुरती नव्हती म्हणून त्यांना सामील करून घेता आलं नव्हतं.

आम्ही पाचेकशे मुली त्या परेडमध्ये होतो. दक्षिणेकडच्या भागात आम्ही सग-ळ्यांच्या पुढं होतो.

समोर प्रचंड पेंडॉल. पुरुषभर उंच. त्याच्यावर फडकतोय तिरंगी झेंडा. दक्षिण—समुद्रावरनं झंझावातासारखा वारा येतोय. नारळाच्या झाडांच्या रांगाच्या-रांगा वारंवार त्याला अभिवादन करताहेत मान खाली करून. वर आकाशात शरदाचे हलके कापसासारखे ढग. ह्या गडद निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर गर्वानं मान ताठ करून असलेल्या तिरंगी झेंड्याचा काय रुबाब होता!

व्यासपीठावर मुख्य-मुख्य जपानी जनरल्स बसलेले. किफानाचे प्रतिनिधी जनरल यामातोतो, इसोडा अन् कागावा. शिवाय ब्रह्मदेशाचे राष्ट्रपती बा. म, सी-इन-सी जनरल युंग-सांग अन् परराष्ट्रमंत्री थाकिनन्. खेरीज रंगून शहरातले अनेक खास पाहुणे, महापौर अन् आझाद हिंद सेनेचे सर्वोच्च अधिकारी. अन् सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रत्यक्ष नेताजी!

सुरुवातीलाच राष्ट्रीय गीत गायलं गेलं — शुभ सुख चैन की बरखा बरसे, भारत भाग है जागा—

विराट जनतेनं नम्र अभिवादन करून भारतीय मुक्तिसेनेच्या ह्या राष्ट्रीय गीता-बद्दल आदर दाखवला. आमच्यापैकी कित्येकांनी भारतवर्ष ह्या डोळ्यांनी बघितला

पण नव्हता. त्यांच्या मनाच्या डोळ्यांसमोर चित्र तरळलं -- सूरज बन कर जग पर चमके भारत नाम सुभागा--

## मी आज मागतोय तुमच्या काळजाचं रक्त !

मग नेताजी माइककडे आले. त्यांच्या आवाजात काय जादू आहे, ते त्यादिवशी मला कळलं ! लाखो लोक क्षणात त्यांना का म्हणून वश होतात, ते त्यादिवशी पहिल्यांदा मला कळलं. वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या देशात आपापल्या सैन्या-समोर कितीतरी सेनापतींनी भाषणं केली आहेत. सिकंदर, सीझर, हॅनिबाल, नेपोलियन. सगळ्यांनी नानापरीनं आश्वासनं दिली होती सैन्याला. तुम्ही माझ्या झेंड्याखाली या. मी तुमच्यानिशी जग जिंकून टाकतो. जिंकलेल्या राज्यांची सुवर्ण-भांडारं खुली करतो तुमच्यासाठी. पण अशी उलटी गोष्ट कोण कधी बोललं होतं ? कोणत्या काळात कोणत्या देशात सैन्याला उद्देशून असं काही बोलायची छाती कुणा सेनापतीला झालीय--

तुम्हांला मी कोणतंच आश्वासन देत नाही. तुमच्या न जन्मलेल्या मुलाबाळांनाच तेवढं मी आश्वासन देतोय. त्यांना मी स्वातंत्र्य मिळवून देईन. त्या बदल्यात तुमच्याकडनं मी आज मागतोय तुमच्या काळजाचं रक्त !

कुणाला असं म्हणता आलेलं आहे--

बंधूंनो आणि सैनिकांनो ! आपली युद्धनीती एकच --- दिल्ली चलो, चलो दिल्ली ! मुक्तिसंग्रामाचा हा समुद्र ओलांडून आमच्यापैकी कितीजण भारतवर्षात पोचतील, मला माहीत नाही. पण तुमचा -- माझा जीव गेला तरी सरतेशेवटी विजय आपलाच होणार हे ध्रुव सत्य आहे ! लढून लढून थकलं-भागलेलं आमचं उरलंसुरलं सैन्य ब्रिटिश साम्राज्याचं महास्मशान पार करून एकदिवस लौकरच दिल्लीच्या लालकिल्ल्यावर विजयाचा झेंडा फडकावेल.

कुणाला असं म्हणता आलंय--

फक्त एवढंच वचन देणं माझ्या हातात आहे, की सुखा-दुःखात, आनंदा-विषादात जय-पराजयात, कोणत्याही परिस्थितीत मी तुमच्या बरोबर राहीन ! भूक-तहान, शारीरिक कष्ट, सहन करता येणार नाही अशी एक मोहीम अन् हुतात्म्याचं महा-मरण याखेरीज आणखी काहीच देण्याजोगं तूर्त माझ्याजवळ नाही ! ह्या रण-धुमाळीतनं जगून-वाचून आमच्यापैकी कुणाकुणाला स्वतंत्र भारतवर्ष बघता येईल हे काही महत्त्वाचं नाही. महत्त्वाची गोष्ट ही आहे, ती ही, की शतकांपास्नं साखळदंडात जखडलेली भारतमाता स्वतंत्र होणारच ! आणि हे स्वातंत्र्य मिळवण्याकरता आम्ही हातचं काही न राखता शेवटचा रक्ताचा थेंबसुद्धा देऊन टाकू ! हे ईश्वरा, तू मला आशीर्वाद दे -- सदैव मान ताठ ठेवून मृत्यू पत्करणाऱ्या

शौर्यापास्नं णाम्ही कधीच वंचित व्हायला नको.

नेताजींचा उदात्त आवाज थांबला ! हजारो माणसं स्तब्ध. झपाटल्यासारखी त्यांच्या डोळ्यात पाणी. कुठं कसला आवाज नाही. अर्धे मिनिट गेलं अन सगळे जणू शुद्धीवर आले. सबंध मैदानानं एका आवाजात पुकारा केला — नेताजी झिंदाबाद ! आझाद हिंद झिंदाबाद ! जय हिंद !

आता मार्चपास्ट सुरू होईल. सैनिक मार्च करत नेताजींच्या समोर येऊन लष्करी अभिवादन करून जातील. ‘लेडीज फर्स्ट’ मुळं का काय कोण जाणे, पण झाशीच्या राणीच्या तुकडीच्या पाचशे मुली सगळ्यांच्या पुढं असणार होत्या.

लेफ्टनंट जानकी थीवर्सचा आवाज् आला— अ‍ॅटेन्शन !

क्षणात पाचशे सैनिका तयारीत उभ्या राहिल्या.

लष्करी हुकूम झाला — लष्करी अभिवादनाकरता व्यासपीठाच्या समोरनं मार्च करत जा.

उन्हानं तळपणाऱ्या गाढ निळ्या आकाशाखाली किती सुंदर कार्यक्रम चालला होता. रंगून शहरातल्या मुलंमुली, म्हातारेकोतारे, सगळे टोळक्याटोळक्यानं सणासुदीचे कपडे घालून इथं एकत्र जमले होते. मैदानाच्या बाहेर सूले फॉयरच्या शेजारी फुटाणे-खारेदाणे, फुगे नि आइस्क्रीम मिळतंय. जीव पणाला लावणाऱ्या एका लढाईत आपण आहोत असं वाटतच नव्हतं. मैदानाच्या बाहेर बरीच माणसं झाडावर चढून बसली आहेत आमचा मार्चपास्ट बघण्यासाठी. स्त्रियांचं सैन्य आतापर्यंत कधी बघितलं नव्हतं ब्रह्मी माणसांनी.

मान ताठ ठेवून रायफल डाव्या हातात घेऊन अन् उजव्या हातानं तिला नुस्ता स्पर्श करून आम्ही ‘आईज राइट’ केलं. ढुम् ढुम् ढुम् ढुम् — लष्करी ड्रम वाजायला लागला. नेताजी उभे होते; त्यांच्या खालच्या पायरीवर झाशीच्या राणीच्या तुकडीच्या प्रमुख डॉक्टर कॅप्टन लक्ष्मी स्वामीनाथन् उभ्या होत्या. मागच्या रांगेत मेजर जनरल भोसले, जमन कियानी, शहानवाजखान, चतर्जी वगैरे.

एकेका ओळीत आम्ही तिघी होतो. समोर लेफ्टनंट थीवर्सच्या हातात लष्करी पताका. मग बँड. बँडच्या मागं आम्ही.

मुंग्यासारखं आम्ही पहिलं पाऊल टाकलं नि लगोलग उन्हात तळपणाऱ्या त्या मैदानाचं आसमंत घुसळून टाकणारा एक तीव्र आर्त नाद ऐकू आला. जपानी सायरन ! विमानहल्ल्याचा इशारा !

मधमाश्यांच्या पोवळ्यावर दगड पडल्यासारखं झालं. मैदानाच्या एका टोकापास्नं दुसऱ्या टोकापर्यंत कुजबूज पसरल्यासारखी झाली. आरडाओरडा व्हायला लागला. नागरिकांचं मजा पाहणं सगळं एकदम उडून गेलं कुठल्याकुठं. बायकोचा हात धरून, पोराला कडेवर घेऊन जिवाच्या आकांतानं पळापळ सुरू झाली. फाटकापाशी प्रचंड गर्दी. रेटारेटी. देवाची दया झाली. गर्दीच्या रेट्यानं कुंपण

मोडून पडलं. पूर आडवणारा बांध फुटल्यागत झालं.

जवळच्याच जपानी विमानतळावरनं थव्यानं लष्करी विमानं वर गेली. परेड-ग्राउंडभोवती घिरट्या घालून उंच गेली निळ्या आकाशात. हलके हलके दिसेनाशी झाली पूर्वेच्या क्षितिजावर. शत्रूच्या विमानांचा मुकाबला करायला ती निघून गेली. मैदान सोडून जपानी सैनिक धावतायत शेल्टरकडे. सुरक्षित आश्रयआसरा शोधताहेत. जीव वाचवायची निकड सगळ्यांनाच. मला दिसलं, एक जपानी जनरल नेताजींच्या कानाशी तोंड नेऊन म्हणाला काहीतरी. नेताजी निर्विकार. दगडी पुतळ्यासारखे उभे आहेत अभिवादन घ्यायच्या लष्करी पवित्र्यात.

दुसऱ्याच क्षणी व्यासपीठ निम्मं रिकामं झालं. जपानी नि ब्रह्मी लष्करी अधिकारी जीव घेऊन पळताहेत शेल्टरकडे. आझाद हिंद सेनेचे लोकच तेवढे सगळं उभे आहेत स्तब्ध !

धोक्याची सूचना देणाऱ्या सायरनची तीक्ष्ण किंकाळी संपल्या संपल्या आमच्या बँडचा तालबद्ध आवाज परत ऐकू यायला लागला. इतकावेळ सायरनच्या आवाजात दबून गेला होता तो ! चोहोबाजूला धांदल, गडबड, पळापळ. इकडे फक्त आम्हीच तेवढ्या ओळीनं चाललेल्या एक-एक पाऊल टाकत — अन् तिकडे व्यासपीठावर दगडी पुतळ्यासारखे उभे आझाद हिंद सेनेचे अधिकारी अन् मध्ये नेताजी.

चारपाच मिनिटांच्या आत शत्रूच्या विमानांचा थवाच्याथवा आला. बॉंबर्स नि फायटर्स ! विमानं उत्तरेकडनं आली. पहिल्यांदा वाटलं, खूप उंचावर आहेत म्हणून. सूर्याला साक्ष राहाणाऱ्या घारींच्या थव्यासारखी. मग लगेच एका मागोमाग एक विजेच्या वेगानं झडप घातल्यासारखी सगळी खाली आली; रंगून शहराच्या दिशेनं. सेंट्रल पार्कवरली ती लोभसवाणी गर्दी अमेरिकन न् ब्रिटिश वैमानिकांच्या घारीसारख्या तीक्ष्ण नजरेतनं थोडीच सुटायला ! परत सगळे खाकी कपड्यात ! एकाच बॉंबनं एक आख्खी बटालियन खतम् करून टाकायची दुर्मिळ संधी धाडशी वैमानिकांना लालूच दाखवत होती ! इकडे जपानी पायलटांचं टोळकंपण मृत्यूची भीती तुच्छ लेखून त्यांच्या वाटेत आलेलं.

आकाशात एक अपूर्व विमानयुद्ध सुरु झालं. असं आधी कधी बघितलं नव्हतं. मशीनगनच्या गोळ्या सुटताहेत अंतराळात. अशा संकटाच्या वेळी शेल्टर घेणं हीच एक मात्र शहाणपणाची गोष्ट होती. अन् तरी नेताजी निश्चल उभे होते. त्यामुळं लेफ्टनंट थीवर्सनापण आम्हांला डिस्पर्स म्हणून हुकूम सोडता येत नव्हता. झाशीच्या राणीच्या तुकडीतल्या मुली ठाम पावलं टाकत शांतपणं मार्चपास्ट करत जाताहेत एकेक. एका ओळीमागनं दुसरी ओळ. जणू काहीच झालं नव्हतं. जणू बाहेरच्या जगाची ह्यांना काही शुद्धच नव्हती.

अचानक शत्रूचं एक फायटर विमान भलत्याच धाडसानं बाकीच्या विमानांपास्नं अलग होऊन परेड ग्राउंडच्या दिशेनं वेगानं आलं. पायलट सुइसाइड स्क्वाडपैकी

असल्यासारखं ते आलं. जमिनीपास्नं पन्नास फुटांवर आलं. सूले फॉयरच्या सोनेरी कळसावर आदळायला आलं होतं नि काय! प्रचंड वेगानं मशीनगन झाडत--झाडत ते आलं.

परेड--ग्राउंडच्या ईशान्य कोपऱ्यातली विमानविध्वंसी तोफ लागलीच रागानं गरजून उठली. तोपर्यंत शत्रूचं विमान इतकं खाली आलं होतं, की ह्या विमान-विध्वंसी तोफेला जमिनीला बिलकुल समांतर असेच गोळे सोडावे लागत होते.

त्यातलाच एक गोळा येऊन आमच्या तुकडीतल्या एका मुलीच्या डोक्याला लागला. डिरेक्ट हिट!

क्षणात तिचं मुंडकं धडापास्नं वेगळं झालं. अन् एवढंच नाही, तर तिच्या डोक्याची काही नामोनिशाणी धुंडाळूनपण मिळाली नाही. रक्तानं थबथबलेलं तिचं शरीर व्यासपीठाच्या समोर जमिनीवर कोलमडलं. ओंजळभर रक्ताचं अर्घ्य देऊन तिनं जणू नेताजींना शेवटचा प्रणाम केला!

पण आमची लाइन काही मोडली नाही. 'आईज राइट'चं 'आईज लेफ्ट' करून ओझरतंदेखील कुणी बघून घेतलं नाही, की व्यासपीठाच्याखाली छाटलेल्या बकऱ्यासारखं हे धड थरथर कापतंय ते कुणाचं आहे म्हणून! पावलांचा ताल चुकला नाही अजिबात! ड्रमचापण नाही! एकाच पवित्र्यात, एकाच तालात लष्करी अभिवादन करत आम्ही पुढं गेलो.

दोन स्वयंसेविका ते धड स्ट्रेचरवर घालून निघून गेल्या. कुणीच तिकडे मान वळवली नाही.

शत्रूच्या त्या विमानात सहा-सहा मशीनगन्स होत्या म्हणे. चांगलं भलंथोरलं फायटर विमान होतं ते. मशीनगन चालवायची संधी जर त्यांना मिळाली असती, तर नेताजींचं न् झाशीच्या राणीच्या तुकडीतल्या मुलींचं मरण अटळ होतं. त्यामुळं विमानविध्वंसी तोफेवरच्या सैनिकांना नाइलाजानंच असे जमिनीला सरपटत गोळे सोडावे लागले होते. त्याच्याचमुळं शत्रूच्या वैमानिकाला मशीनगनच्या घोड्याला हात लावायची पण संधी मिळाली नाही. उलट विमानविध्वंसी तोफेचा व्यूह मोडून स्वतःला वाचवायच्या प्रयत्नांतच दंग रहावं लागलं होतं त्याला. म्हणजे अप्रत्यक्ष-पणाने आमच्या तुकडीतल्या त्या मुलीनं आपला जीव वेचून आमचा न् नेताजींचा जीव वाचवला होता.

मला माहीत आहे--त्या मुलीचं नाव काय असा प्रश्न तुमच्या ओठावर आहे. पण खरंच सांगते, तिचं नाव मी विसरून गेलेय्. एका शतकाचा पाव हिस्सा गेला की दरम्यान! इरावती—चिंदुइनच्या पात्रातनं किती पाणी वाहून गेलं दरम्यान. त्यामुळं त्या मुलीचं नावपण आज गळून गेलेल्या पानापेक्षाही कमी मोलाचं. अन् तसं बघा, नाव लक्षात ठेवलं असतं तरी काय झालं असतं? झाशीच्या राणीच्या तुकडीतल्या त्या पहिल्या शहीद मुलीच्या नावानं तुम्ही तर काही एखादा शहीद—

मिनार उभारला नसतातच तुमच्या 'रक्तपाताविना स्वतंत्र' झालेल्या भारतवर्षात !

कार्यक्रम संपल्यावर निरोप आला--खुद्द सरसेनापतींनी बोलवणं पाठलंय् लेफ्टनंट थीवर्सना. मी त्यांचा उजवा हात. त्यामुळं मी बरोबर गेले होते. त्यामुळं त्या वेळी झालेलं बोलणं ऐकायचं दुर्मिळ भाग्य मला मिळालं होतं. नेताजींनी जो हुकूमनामा दिला होता तो स्वतःच्या कानांनी ऐकला होता मी. हीच माझी प्रत्यक्ष साक्षीदाराची जबानी !

परेड--ग्राउंड तेव्हा जवळजवळ निर्जन झालं होतं. फाटकासमोर दहाबारा गाड्यांचा कॉनव्हॉय. जीप्स नि वेपन कॅरियर्स. समोरच दुसऱ्या गाडीच्या बॉनेटवर सरसेनापतींची पताका. नेताजी, मेजर-जनरल कियानी, कर्नल हबिबुर रहमान नि चीफ--ऑफ--स्टाफ एकत्र उभे होते. आम्ही दोघीजणी त्यांच्यासमोर उभ्या राह्यलो. मानाचं लष्करी अभिवादन केलं.

नेताजींनी प्रश्न विचारले त्या मुलीबद्दल. नाव-गाव काय, कुठली, रंगूनमध्ये कुणी नातलग आहेत का नाही, वगैरे.

जवळच एक तरुण उभा होता. मुलकी कपड्यात. उभ्याउभ्याच एका नोटबुकात शॉर्टहँडमध्ये नोट्स घेत होता. नंतर कळलं, त्याचं नाव भास्करन्. केरळमधला. नेताजींचा स्टेनो.

नेताजींनी आदेश दिला--पुरत्या लष्करी इतमानानं त्या मुलीचं अंत्यकार्य करा. म्हणाले, आदल्या दिवशी सर्व तपशील मला कळवा; म्हणजे मी स्वतः हजर राहीन तेव्हा.

मग म्हणाले, आझाद हिंद सेनेची इंफाळवरची मोहीम सुरू झाली, की तुमच्या तुकडीला मेमिओला पाठवायचं मनात होतं आधी. म्हणत होतो, तिथल्या इस्पि-तळात तुम्ही सेवासुश्रुषा शिकून घ्याल. पण आजच्या ह्या घटनेनं मी माझं मत बदललं. दोन भागात विभागून टाकूया तुमची तुकडी. एका तुकडीचं काम इस्पितळात सेवासुश्रुषा करणं. अन् दुसऱ्या तुकडीचं काम प्रत्यक्ष लढाईत भाग घेणं. पण तसं असलं, तरी प्रत्येक राणीला रायफल चालवायला नि नर्सिंग करायला शिकून ठेवावे लागेल. कॅप्टन लक्ष्मी स्वामिनाथन्‌कडनं सगळा तपशील तुम्हांला कळेल. (लक्ष्मी स्वामिनाथन् नंतर लेफ्टनंट--कर्नल झाल्या.)

आम्ही दोघींनी एकदमच सॅल्यूट केला.

नेताजी जीपकडे परतत होते. एवढ्यात त्यांना काय वाटलं कुणास ठाऊक ते परत मागं फिरले. म्हणाले, आज तुम्हीं एवढी हिंमत दाखवलीत, ह्याचा मला अभिमान वाटतो ! ही तुमची हिंमत शेवटच्या दिवसापर्यंत अशीच राहील असा माझा विश्वास आहे.

आम्ही दोघी अॅटेन्शनच्या पवित्र्यात दगडी पुतळ्यांसारख्या निश्चल उभ्या राह्यलो.

मेजर--जनरल भोसल्यांनी झटकन् आपल्या हातातल्या घड्याळावर नजर

टाकली. त्यांना काहीतरी महत्त्वाचं काम होतं वाटतं. आपल्याला उशीर होतोय् असा त्याचा अर्थ.

पण ह्या त्यांच्या इशाऱ्याकडे नेताजींनी अजिबातच लक्ष दिलं नाही. उलट आणखी एक पाऊल पुढं येऊन ते म्हणाले--आत्ता भाषणात तर मी सांगूनच टाकलंय् की, आज मला तुम्हांला काहीही देता यायचं नाही. तहान--भूक न् मरण यांच्याखेरीज आणखी बक्षिस माझ्याजवळ नाही. पण आज तुम्ही एवढे मृत्युंजयी शौर्य दाखवलंत तर त्याचं बक्षिस म्हणून तुम्हांला खरंतर आत्तांच काहीतरी द्यायला हवं. नाही का ?

आम्ही दोघीजणी जणू ब्रॉझच्या दोन पुतळ्या होतो.

नेताजी परत आपल्या सहकाऱ्यांच्याकडे वळले—मेजर जनरल भोसले !

खट्दिशी बुटांचा आवाज झाला. आझाद हिंद सेनेचे चीफ-ऑफ-स्टाफ ॲटेन्शनच्या पवित्र्यात सरसेनापतींच्या हुकुमाच्या अपेक्षेनं उभे होते.

—मला स्वत:ला तिथं जिवंत पोचता येवो किंवा न येवो, पण जर कधी आझाद हिंद सेनेनं कलकत्त्यात प्रवेश केला, तर ही झाशीच्या राणीची तुकडीच सर्वांच्या पुढं असेल ! हा माझा आदेश आहे. ह्यात काही बदल होणार नाही. तुमच्या नोटबुकात लिहून ठेवा.

चीफ-ऑफ-स्टाफनं लष्करी अभिवादन केलं.

भास्करननं आपल्या नोटबुकात पेन्सिलीचे काही फराटे मारले.

खरंच सांगते, माझ्या सबंध शरीरातनं वीज खेळल्यासारखं झालं. कलकत्ता शहर मी पाह्यलेलं नव्हतं. नेताजी एकेकाळी कलकत्त्याचे महापौर होते असं ऐकलं होतं. कलकत्ता म्हणे सिंगापूरपेक्षा मोठ्ठं शहर आहे.

लगेचच माझ्या कल्पनाशक्तीला डोळे फुटले. स्वच्छ दिसलं--सिंगापूरच्या बॅटरी रोडपेक्षा रुंद अशा अनोळखी कलकत्त्याच्या बिनमाहितीच्या हमरस्त्यावरनं विजयोल्हासानं मार्च करत चाललीय् मुक्तिसेना. अन् त्यांच्यात सर्वांत पुढं आहोत आम्ही काही भारतीय स्त्रिया--लढून थकल्या-भागलेल्या, रक्तानं न्हालेल्या—झाशीच्या राणीच्या वारसदार ! वरनं गच्च्यांतनं, खिडक्यांतनं एकसारखी फुलं उधळली जाताहेत. अन् लोक आमचं स्वागत करताहेत, आपल्या कलकत्तैय्या भाषेत ! काही म्हणता काही समजत नाही ! अन् मग उत्तरादाखल आम्ही पण ओरडतोय्--नेताजी झिंदाबाद !...ओरडतोय्--जयहिंद !

नेताजींच्या आवाजानंच मी परत भानावर आले. लेफ्टनंट थीबर्सकडे वळून ते म्हणत होते--काय ग, तू काहींच बोलत नाहीस ते ?

लेफ्टनंट थीबर्स गंभीरपणानं म्हणाल्या-ही तुमची अमूल्य देणगी म्हणजे राणीच्या तुकडीचा मोठाच गौरव आहे. पण आमच्या सैनिकांच्या वतीनं मला एक भिक्षा घाला—

—भिक्षा ?

भिवया आकुंचित झाल्या नेताजींच्या. ते स्वत:पण कधीच कुणाच्याचकडनं काही मागायचे नाहीत. अन् त्यांच्याकडं कुणी काही मागितलं तर वाईट वाटायचं त्यांना. कारण मनानं ते लाख उदार असले म्हणून काय झालं, पैशाची तंगी कायमच मागं लागून राहिलेली होती. तुम्हांला माहीत आहे का नाही मला ठाऊक नाही-- जर्मनीत असताना भारताच्या स्वातंत्र्याच्या आंदोलनाकरता नेताजींना एकदा हिटलरकडूनं पैशाची मदत घ्यावी लागली होती. ती रक्कम त्यांनी स्वतंत्र भारताच्या वतीनं कर्जाऊ म्हणून घेतली होती! पूर्वआशियात पण पैशाची हलाखी होतीच. तरीदेखील तेवढ्यातसुद्धा १९४४ साली टोकियोतल्या जर्मन वकिलाला त्यांनी पाच लाख जपानी येन देऊन टाकले होते---कर्जफेडीचा पहिला हप्ता म्हणून! नंतर अर्थात हाच शेवटचा हप्ता ठरला! --कारण स्वतंत्र भारतानं काही उरलेलं कर्ज फेडलं नाही!

तर मी काय सांगत होते? हां--नेताजींनी भिवया चढवल्या. पण म्हणाले मात्र---बरं सांग.

--मला तुमच्याकडनं पाचशे बुलेट्सची भीक हवीय्. सध्याच्या काळात लढाईची सामग्री मिळवण्यासाठी तुम्हांला किती सायास पडताहेत हे मला ठाऊक आहे. पण अगदीच नाइलाजानं मी ह्या पाचशे बुलेट्सची भीक तुमच्याकडे मागतेय्.

चांगलेच विचारात पडल्यासारखे झाले नेताजी. काळजी नाही, पण कुतुहल वाटायला लागलं त्याना. म्हणाले---कशासाठी हवीयत इतकी बुलेट्स तुम्हांला?

---माझ्या तुकडीतल्या प्रत्येक मुलीला एक ताजं बुलेट बक्षिस द्यायचय् मला! हे बुलेट शत्रूवर मारलं जाणार नाही! जिवंत पकडलं जायचा प्रसंग ओढवलाच, तर ते स्वत:वर वापरायची परवानगी हवीय् मला तुमची!

हे दृश्य आज पण माझ्या नजरेसमोर स्पष्ट आहे! पुरतं एक मिनिटभर नेताजीं-कडनं काही उत्तर मिळालं नाही. लांबवरच्या क्षितिजाकडे नजर लावून ते गप्प उभे होते. मग सगळे लष्करी नियम गुंडाळून ठेवून अचानक जानकीताईंच्या डोक्यावर त्यांनी हात ठेवला! अगदी घरगुतीपणानं हात ठेवला! तोंडातल्या तोंडात काहीतरी म्हणाले वाटतं. काय मंत्र म्हणाले असतील? किंवा आशीर्वाद? दुसऱ्याच क्षणी परत ताठ उभे राह्यले. हात मागं घेतला. प्रेमळ समाजसेवक असलेले तत्त्वज्ञ सुभाषचंद्र नेताजींच्यात विलीन होऊन गेले.

एकाच उडीत ते जिपमध्ये बसले.

आमच्याकडे बघून अगदी स्पष्ट उच्चार करत म्हणाले---ग्रँटेड! --एवढंच म्हणाले.

कॉन्व्हॉय निघून गेला--नाकासमोरच्या रस्त्यानं. मागं धूळ उडवत.

आम्ही दोघीजणी सॅल्यूट ठोकून तशाच उभ्या होतो.

[ क्रमशः ]

## आदिवासींचे दोन उठाव

# भागोजी नाईक


■ डॉ. सुधीर फडके ■

नासिक जिल्ह्यातील नांदूर शिंगोटे गावचा भागोजी नाईक म्हणून एक भिल्ल-प्रमुख सरकारी नोकरीत होता. १८५५ साली शिस्तभंगाच्या आरोपावरून सरकारने त्याला शिक्षा करून तुरुंगात टाकले होते. याच सुमारास देशात सगळीकडे बंडाचा वणवा पेटत होता. भागोजी नाईक तुरुंगातून सुटण्याच्या सुमारास या बंडाच्या ज्वाला देशभर भडकलेल्या होत्या. भागोजी नाईकाने तुरुंगातून सुटण्याच्या सुमारास आपल्या भिल्ल जमातीची संघटना करून त्या बंडात उडी घेतली. नाशिक, पुणे रस्त्यावर नाशिकपासून सुमारे तीस मैलावर असलेल्या त्याच्या जन्मगावाजवळच्या एका डोंगरावर भागोजी नाईक व त्याचे भिल्ल साथीदार वस्ती करून राहिले होते. या ठिकाणावर ब्रिटिश सैन्याच्या एका तुकडीने हल्ला केला. भागोजी नाईकाचे सैन्य तयारीतच होते. त्यांनी या ब्रिटिश तुकडीचा धुव्वा उडविला. या चकमकीत ब्रिटिश सैन्यातील कॅप्टन हेन्री नावाचा अधिकारी मारला गेला. ही घटना ४ ऑक्टोबर १८५७ रोजी घडली. ब्रिटिशांच्या पराजयाची बातमी त्या सगळ्या विभागात पसरल्याबरोबर भिल्ल जमातीत मोठी खळबळ उडाली व ठिकठिकाणी भिल्लांच्या टोळ्या संघटित होऊ लागल्या. त्यांनी भागोजी नाईकाच्या सैन्यात नावे दाखल करावयाला सुरवात केली. नगर जिल्ह्यातील राहुरी गावच्या पुथरजी नाईक म्हणून दुसऱ्या एका भिल्ल प्रमुखाने खूप मोठ्या संख्येने भिल्लांची संघटना उभी करून भागोजी नाईकाशी हातमिळवणी केली. या संयुक्त सैन्याशी ब्रिटिश सैन्याचा नगर जिल्ह्यातील समशेरपूर येथे मुकाबला होऊन पुन्हा एकदा ब्रिटिश सैन्याचा पराभव झाला. या पुढच्या काही दिवसात अरब व रोहिले लोकांची एक तुकडी भागोजी नाईकाच्या मदतीला आली. या सर्वांनी मिळून नांदगाव तालुक्यातील मोहवड गावाजवळ ब्रिटिश सैन्याशी टक्कर दिली. यात एक ब्रिटिश मेजर मारला गेला व येथही ब्रिटिशांना माघार घेणे भाग पडले. एकामागून एक

# समाजवादी लोकशाही हीच खरी लोकशाही

समाजाचा प्रत्येक घटक संपूर्ण समाजाच्या कल्याणासाठी असतो. त्याचे हितसंबंध वेगळे नसतात. याच भावनेतून एकूण मानव जातीला आवश्यक अशी परिस्थिति निर्माण होते व अधिक उच्च विकास करून घ्यायला सामर्थ्य प्राप्त होते.

—श्री अरविंद



davp 72/135



भागोजीचे सैन्य
तयारीतच होते

होणाऱ्या पराभवामुळे ब्रिटिशांनी एका नव्या नीतीचे धोरण अवलंबिले. भिल्ल व कोळी जमातीचे पूर्वापार वैर लक्षात घेता त्यांनी जुन्नर, अकोला व नाशिक विभागातील डोंगराळ भागात वस्ती करून रहात असलेल्या कोळ्यांचे सैन्य उभारले. सुमारे ६०० कोळ्यांच्या पलटणीचा प्रमुख म्हणून त्यांनी पूर्वीच्या एका बंडखोर कोळ्याचा भाऊ राघोजी भांगरा याची नेमणूक केली. याच वेळी भागोजी नाईक सुरगण्याच्या आसपास सैन्याची जमवाजमव करीत होता. सुरगण्याचा राजा पण या सैन्यास मिळण्याचा बेत करीत होता. भागोजींच्या सैन्याने याच वेळी त्र्यंबक गावचा खजिना लुटला. डिसेंबरच्या मध्यावर पेठ तालुक्यात त्यांच्या बंडाचा वणवा पेटला. त्यांनी हरसूलवर हल्ला केला व तेथील सरकारी कचेरी लुटून कागदपत्र जाळून टाकले व खजिना लुटून घेतला. हरसूलनंतर पेठचा खजिना लुटला गेला, पण या ठिकाणी ब्रिटिश सैन्याने बंडखोरावर हल्ला करून त्यांना पकडून ठेवले. ही वातमी ऐकल्यावर हरसूलहून अधिक भिल्ल सैनिक आले व त्यांनी पेठ गावाला वेढा दिला. दुसऱ्या दिवशी भागोजी नाईक सुरगण्याहून १५०० ते २००० भिल्ल सैन्य घेऊन पेठला आला. आपले सैन्य वेढ्यात सापडल्याचे पाहून ब्रिटिशांनी सुरतेहून कुमक मागविली होती. ती आल्यावर ब्रिटिशांचे सैन्य व भागोजी नाईकाचे सैन्य या दोघात तुंबळ युद्ध झाले. या लढाईत भागोजी नाईकाचा भाऊ महिपत नाईक कामास आला व ब्रिटिश सैन्याचा कॅप्टन नुट्टल हा जखमी झाला. याच वेळी येवले तालुका, चाळीसगाव व निजामच्या सरहद्दीवर भागोजी नाईकाच्या सैन्याशी ब्रिटिश सैन्याच्या चकमकी चालूच होत्या. १८५८–५९ साल अशा लढण्यात गेले.

१८५९ सालच्या एप्रिल महिन्यात संगमनेरच्या अग्नेयेस असलेल्या अंभोरदऱ्यात भागोजी नाईक व हिरजी नाईक यांच्या अधिपत्याखाली असलेल्या भिल्ल सैन्याशी ब्रिटिश व कोळी पलटणीची लढाई झाली. त्यात भागोजीचा मुलगा यशवंत मारला गेला व हिरजी नाईक पकडला जाऊन भागोजीला माघार घ्यावी लागली. यापुढे मात्र ब्रिटिश सैन्याने भागोजीचा सारखा पाठलाग सुरू ठेवला. पण कोकणपट्टीचा सारा डोंगराळ भाग पायाखालचा असल्यामुळे भागोजीला पकडणे त्यांना शक्य झाले नाही. १८५९ च्या ऑक्टोबरमध्ये कोपरगाव तालुक्यातील कोऱ्हाळा गावावर हल्ला करून १८००० रुपयांची लूट भागोजीने नेली. ११ नोव्हेंबर १८५९ रोजी सिन्नर जवळील मीठसागर येथे ब्रिटिश सैन्याचा मुक्काम असताना शेजारच्या पांचाल गावच्या पाटलाने जंगलातील नदीकाठी नाईक व त्याचे साथीदार विश्रांती घेत असल्याची खबर आणली. ब्रिटिश सैन्याचा अधिकारी कॅप्टन सूटर याने तावडतोब आपले सैन्य एकत्र करून भागोजी नाईक विश्रांती घेत असलेल्या ठिकाणाला वेढा दिला. या वेळेस भागोजीबरोबर त्याचे फक्त ४९ साथीदार होते. त्या सर्वांना शरण येण्याविषयी ब्रिटिश सैन्याने सांगितले. पण त्यापैकी एकहीजण शरण न जाता सर्वांनी ब्रिटिश सैन्यावर निकराचा हल्ला चढविला व आपले प्राण धारातीर्थी ठेवले. या पन्नास जणापैकी फक्त एकजण ब्रिटिशांच्या हाती लागला. अशा रीतीने परकीय सरकारशी प्राणपणाने लढणाऱ्या आदिवासी जमातीच्या सशस्त्र उठावाचा शेवट झाला. □

# चणकापूरचा जंगल सत्याग्रह

**१९३०** साली राष्ट्रीय काँग्रेसने कायदेभंग करण्याच्या उद्देशाने अहिंसात्मक चळवळीचा आदेश दिला. या सत्याग्रहाची लाट ग्रामीण जनतेपर्यंत जाऊन पोचली. ग्रामीण जनतेतील आदिवासी विभागानेसुद्धा या चळवळीत इतर



शंभर लोक तरी मारले गेले

जनतेबरोबर भाग घेतला. असल्यास नवल नाही. त्या सगळया लढयांची नोंद घेणे शक्य नाही. परंतु सलग अशा आदिवासी विभागात झालेल्या सत्याग्रह चळवळी-पैकी ज्यात संपूर्णपणे आदिवासींनी भाग घेतला होता व सरकारच्या अमानुष दडपशाहीला धैर्याने तोंड दिले होते. अशा एका घटनेचा निर्देश करावयास हरकत नाही. नाशिक जिल्ह्यातील बागलाण व कळवण तालुक्यात जंगल सत्याग्रहाने उग्र रूप धारण केले होते. बागलाण तालुक्यात भिलवाड येथे जंगल सत्याग्रह झाला. या सत्याग्रहात आदिवासी जमातींनीच बव्हंशी भाग घेतला होता. तसेच कळवण तालुक्यातील सप्तशृंग नजिकच्या डोंगरावर झालेल्या जंगल सत्याग्रहातही आदिवासी कार्यकर्त्याचा पुढाकार होता. आदिवासी विभागात या चळवळीमुळे वातावरण तापू लागले होते. वनचराई देऊ नये, सरकारी नोकरांना मदत करू नये, अशा प्रकारचा प्रचार करीत देशगावचे दावल, बागूलवारे, देवतेचे पिराजी सयाजी गावीज, पळसदरचे काळू सोमा कुंवर, चिचपाडयाचे सखाराम ठाकरे, आमधरचे दामू वाघमारे इत्यादि आदिवासी तरुण १९३० च्या जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यात या तालुक्यातील जंगल विभागात प्रचार करीत हिंडले. ता. १८-१०-१९३० रोजी झालेल्या सत्याग्रहाची वर्दी गावोगाव लोकांना नगारे वाजवून देण्यात आली. त्या दिवशी कळवण तालुक्यातील चणकापूर गावातील तलावाजवळील टेकडीवर १०-१२ हजारांचा आदिवासी समाज हातात तिरकामठे, भाले, कुऱ्हाडी अशा प्रकारच्या हत्यारांनी सुसज्ज होऊन जमला. वास्तविक हा लढा संपूर्णपणे अहिंसात्मक व शांततेच्या मार्गाने चालवावयाचा होता. परंतु इंग्रज सर-कारशी लढावयाला जावयाचे होते. तेव्हा ही लढाई हत्यारांशिवाय कशी होणार ? या त्यांच्या नैसर्गिक भावनेने ते हत्यारे घेऊन डोंगरावर जमा झाले होते. त्यावेळच्या

राजसत्तेला ते एक आव्हानच होते. सरकारच्या शेकडो हत्यारी पोलिसांनी व काही लष्करी सैन्याने या टेकडीला वेढा दिला. पाटील-तलाठी यांनी लोकांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला; पण त्यांना कोणी दाद दिली नाही. पुढे काय होणार याची कोणालाच कल्पना नव्हती. गोऱ्या साहेबाला येथून हाकलून द्यावयाचा व गांधी बाबांचे राज्य चालू करावयाचे एवढेच त्यांना माहीत होते. १८ तारखेला लोक रात्रभर टेकडीवर बसून राहिले. पोलिसांनी टेकडीला गराडा घातलेलाच होता. दुसऱ्या दिवशी गोऱ्या पोलीस अधिकाऱ्याने लोकांना घरोघर जाण्यास सांगितले. पण त्याचे ऐकण्याच्या मनःस्थितीत कोणीही नव्हते. गोऱ्या अधिकाऱ्याने जमावाचे म्हणणे मांडण्यासाठी पाच जणांच्या शिष्टमंडळाला भेटण्याचेही कबूल केले. परंतु तरीसुद्धा जमाव ऐकेना. पुढे पोलिसांनी हवेत बायबार केले. त्याचे उत्तर जमावाने दगड, धनुष्यबाणांनी द्यावयास सुरवात केली. हवेत केलेल्या गोळीबारांमुळे एकही गोळी जमावाला लागली नाही. असे पाहून आदिवासींची नेहमीप्रमाणे भ्रामक कल्पना झाली की, मंत्रसामर्थ्याने बंदुकींची तोंडे बांधली गेली आहेत. त्यामुळे साहेबाची गोळी आपल्याला लागणार नाही. पोलिसांनी पुन्हा हवेत बायबार काढलेले पाहून लोकांना अधिकच चेव आला व त्यांनी मोठमोठे धोंडे टेकडीवरून खाली लोटून देण्यास सुरुवात केली. शेवटी जमावाची पांगापांग करण्यासाठी पोलिसांनी बेछूट गोळीबार करावयास सुरवात केली. गोळ्या कोणाच्या पायाला, कोणाच्या पोटावर, तर कोणाच्या छातीवर लागल्या. तरीही बराच वेळ लोकांनी दाद दिली नाही. पण काही लोक जेव्हा मरून पडलेले पाहिले तेव्हा मात्र लोक घाबरले व त्यांची धावपळ सुरू झाली. त्यात कित्येक लोक चेंगरले, तलावाच्या बाजूने पळणारे लोक तलावात पडले. अशा तऱ्हेने दीड दिवस चाललेली ही लढाई दुपारी अकरा वाजता संपली. मृतांचा नक्की आकडा कधीच कळला नाही. जुन्या लोकांच्या सांगण्यावरून शंभर लोक तरी मेले असावेत असा अंदाज आहे. चळवळीच्या पुढाऱ्यांपैकी ६ जणांना सश्रम कारावासाची शिक्षा झाली. या पुढाऱ्यांपैकी एकजण दावल देवाजी बागूल यांना चळवळीतील अतिरेकामुळे वेड लागल्याचे जुनी मंडळी सांगतात. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीच्या इतिहासात आदिवासी जमातींनी केलेल्या चणकापूरच्या या जंगल सत्याग्रहाची घटना अभूतपूर्व तशीच अभिमानास्पद आहे यात शंका नाही.

□ □ □



जी संपते ती क्रांती नव्हेच.
किंबहुना क्रांती ही कधीही न संपणारी प्रक्रिया.
चे गव्हेरा, फिडेल कास्ट्रो आणि क्यूबा
हे या अपरिहार्य प्रक्रियेचा केवळ एक पैलू दर्शवितात.



क्रांतीच्या यशाबरोबर फिडेलसह अनेक क्रांतिकारी क्यूबन तरुणांनी नव्या क्यूबाचे एक स्वर्गीय स्वप्न रंगविले होते. परंतु सर्वच नवोदित राष्ट्रांप्रमाणे क्यूबाचेही हे स्वर्गीय स्वप्न लवकरच आर्थिक वास्तवाच्या भोवऱ्यात सापडले. शेती-विषयकच्या जहाल धोरणामुळे, राज्य-

कास्ट्रोची सत्ता प्रस्थापित झाली होती.
राजवटीचे स्थैर्य निश्चित झाले होते.
अमेरिकन आक्रमणाची भीती निकालात निघाली होती.
आता कास्ट्रोचे लक्ष होते क्यूबाच्या आर्थिक उन्नतीवर.
आणि चे ?
चे ची नजर होती लॅटिन अमेरिकेतील दरिद्री देशांवर....

▪ अरुण साधू । लेखांक बारा ▪

# फिडेल चे आणि क्रांती

कर्त्यांच्या अनुभवामुळे आणि त्याचबरोबर अमेरिकेने लादलेल्या कडक व्यापारी नाकेबंदीमुळे पहिली काही वर्षे क्यूबामध्ये प्रचंड आर्थिक गोंधळ माजला यात शंका नाही.

विशेषत: जुना श्रीमंत वर्ग आणि उच्च मध्यम वर्ग यांच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास आर्थिक अराजकच माजल्याचे वाटले असते. कारण त्यांना आता अन्नधान्यासाठी रेशनच्या ओळींमध्ये उभे राहावे लागत होते. चैनीच्या वस्तू मिळेनाशा झाल्या होत्या. त्यांच्या दृष्टीने अन्नधान्याचा समतोलच बिघडला होता.

पण हेही खरे, की ज्या ग्रामीण क्यूबात १९५९ च्या क्रांतीपूर्वी अपुरे अन्न ही सर्वात मोठी समस्या होती, दरवर्षी केवळ अपुऱ्या अन्नामुळे जिथे असंख्य मुले रोगराईला बळी पडत, त्याच क्यूबात आता भूक ही समस्या राहिली नाही. पूर्वी दूध पिणे हे श्रीमंतीचे लक्षण होते. आता सात वर्षांखालील प्रत्येक मुलाला रोज मोफत

पावशेर दूध मिळू लागले. शाळा-कॉलेजातील लाखो मुलांना मोफत अथवा स्वस्त अन्न मिळू लागले. लक्षावधी कामगारांना अथवा कारकुनांनाही दुपारचे जवण असेच स्वस्त अथवा मोफत मिळू लागले. कामगारांना नोकरीची शाश्वती मिळाली. मुलांना शाळा मिळाल्या. या सर्वांच्या दृष्टिकोनातून अर्थातच क्रांती यशस्वी झाली हे निश्चित.

परंतु फिडेल कास्ट्रो आणि अर्नेस्टो चे गव्हेरा यांचे लक्ष केवळ क्यूबापुरते मर्यादित नव्हते. या दोघांनाही आंतरराष्ट्रीय क्रांतीचे वेड होते. १९५६ मध्ये फिडेलशी संबंध येण्यापूर्वीच लॅटिन अमेरिकेतील भीषण आर्थिक विषमतेने हेलावून जाऊन आणि भ्रष्ट व जुलुमी सत्ताधीशांना कंटाळून चे गव्हेराने सशस्त्र क्रांतीची शपथ घेतली होती. सत्तेवर येईपर्यंत फिडेलला केवळ क्यूबन क्रांतीचा ध्यास होता. १९५९ नंतर त्याच्या नजरेच्या टप्प्यात संपूर्ण लॅटिन अमेरिका आले. एवढेच नव्हे तर अॅटलांटिक महासागरापलिकडील आफ्रिका आणि आशिया खंडातील दलित देशांमध्येही फिडेल आणि चे क्रांतीची स्वप्ने पाहू लागले. याबाबतीत फिडेल आणि चे यांचे एकमत होते. अमेरिकेला क्यूबाविषयी जी भीती वाटत होती ती एका अर्थाने वास्तव होती ती यामुळेच.

लॅटिन अमेरिकन देशात आणि जगातील इतर पददलित देशांमध्ये क्यूबन क्रांतीचे स्थान रासायनिक स्फुल्लिगांप्रमाणे झाले पाहिजे असे चे गव्हेराला वाटत असे. नव्हे क्यूबन क्रांतीची प्रशस्ती करताना चे चा हा मुद्दा महत्वाचा आधारस्तंभ होता. क्यूबन क्रांतीवर आणि गनिमी युद्धपद्धतीवर चे गव्हेराने सविस्तर भाष्य केले आणि ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध केले ते क्यूबन क्रांतीचे हेच महत्त्व विशद करून सांगण्यासाठी. एरवी या लहान द्वीपकल्पातील मामुली क्रांतीला कोणी पुसले असते ? चे गव्हेराच्या या मताला फिडेलचा सक्रीय पाठिंबा होता.

जागतिक जबाबदारीच्या या जाणीवेनेच फिडेल कास्ट्रोने सत्तेवर येताच लॅटिन अमेरिकेतील देशोदेशीच्या सशस्त्र गनिमी चळवळींना सरसकट मदत करण्यास सुरुवात केली. एक मेक्सिको सोडल्यास उत्तर व दक्षिण अमेरिकेतील एकाही देशाने क्यूबाशी राजनैतिक संबंध जोडले नाहीत. एवढेच नव्हे तर उत्तर अमेरिकेच्या दडपणामुळे सर्व लॅटिन अमेरिकन देश क्यूबाशी व्यापारी संबंध ठेवण्याचेही टाळू लागले. अशा जबरदस्त आर्थिक व राजकीय नाकेबंदीला तोंड देत, क्यूबाची आर्थिक उन्नती साधण्याचे आटोकाट प्रयत्न करीत एका बाजूला लॅटिन अमेरिकन देशातील सशस्त्र क्रांतिकारकांना मदत करण्याचे धाडस फिडेल कास्ट्रो याने केले.

क्यूबन क्रांतिकारकांच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास लॅटिन अमेरिकन देशातील सर्व सरकारे प्रतीक्रांतिकारक आणि प्रतीगामी होती. जवळ जवळ या सर्व देशांमध्ये लष्करी हुकूमशाही कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपात अस्तित्वात आहेच. सर्वत्र परंपरागत भांडवलवादी वर्ग सत्तेशी निगडित आहेत. काही देशांमध्ये लोकशाही-

प्रणीत राजवटी आहेत. पण हेही देश इतर लष्करी अमलाखालील देशांप्रमाणेच क्रांतीपासून दूर आहेत. सामान्य जनता भरडली जात आहे. आणि विशिष्ट वर्ग मात्र समृद्धीच्या शिखरावर आहेत अशी परिस्थिती होती.

या परिस्थितीतून क्यूबन क्रांतिकारकांना एकच मार्ग दिसत होता. क्यूबन पद्धतीची क्रांती. क्यूबाच्या धर्तीवर लोकांच्या पाठिंब्यावर आधारलेले गनिमी युद्ध, सशस्त्र क्रांती चळवळी आणि नागरी असहकार अशा चळवळी चालविणाऱ्या देशादेशातील क्रांतिकारकांना उत्तेजन द्यायचे आणि सक्रीय सहाय्य करायचे.

लॅटिन अमेरिकन देशातील भयानक विषमता दूर करायची असेल, मूठभर लोकांच्या हाती केंद्रित झालेली संपत्ती जर न्यायाने वाटायची असेल तर क्रांती-शिवाय तरणोपाय नाही हे खुद्द अमेरिकनांनाही मान्य आहे. फक्त ही क्रांती कशी असावी हा वादाचा मुद्दा.

मागासलेपणा, दारिद्र्य, अज्ञान, रोगराई आणि वैफल्य यातून या लॅटिन अमेरिकन पददलितांना नव्या युगाकडे जाण्यासाठी क्यूबाने आशेचा किरण दाखविला आणि आपल्या मार्गाने आल्यास तुम्हीही आर्थिक दास्यातून मुक्त होऊ शकाल असा क्यूबन क्रांतिकारकांचा आग्रह आहे. क्यूबाचा अमेरिकेशी झगडा आहे तो याच मुद्यावर. रशियन कम्युनिस्टांचे फिडेलशी वाजले तेंही याच सशस्त्र क्रांतिच्या मुद्यावर. सशस्त्र क्रांतीच्या बाबतीत रशियाने स्वीकारलेल्या मिळमिळीत धोरणावर फिडेलने सडकून हल्ला चढविला आणि क्यूबन क्रांतीची निष्ठा व्हिएटनामशी जोडून आपला एक नवाच पंथ निर्माण केला.

फिडेल कास्ट्रोने अशा रीतीने व्हेनेझुएला, डोमिनिकन रिपब्लीक, आफ्रिकेतील कांगो, मेक्सिको आदी राष्ट्रातील क्रांतिकारकांना सढळ हाताने मदत केली.

## लक्ष लॅटिन अमेरिकेवर

फिडेल कास्ट्रो हा क्यूबाचा प्रधानमंत्री. सबंध क्यूबन क्रांतीची जबाबदारी त्याच्यावर होती. बाहेरच्या देशातील क्रांतिकारकांना मदत करणे तेवढे त्याच्या हाती होते. पण चे गव्हेराचे तसे नव्हते. फिडेलने त्याला क्यूबाचे नैसर्गिक नागरिकत्व जरी बहाल केले असले तरी तो मूळचा अर्जेंटीनीयन. क्यूबन क्रांतीत महत्त्वाचा भाग घेऊन त्यातील यशाचा त्याने वाटा घेतला. पण ही क्रांती पुढे चालविण्याची नैतिक जबाबदारी त्याच्यावर नव्हती. त्याची अस्वस्थ नजर होती लॅटिन अमेरिकेवर.

क्यूबन क्रांतीच्या लष्करी यशानंतर क्यूबाच्या आर्थिक परिवर्तनामध्ये जरी चे गव्हेरा मन लावून भाग घेत असला तरी त्याचा जीव अडकला होता लॅटिन अमेरिकेत. परदेशी नागरिक असला तरी क्यूबामध्ये त्याला क्रमांक दोनचे महत्त्व प्राप्त झाले होते. क्यूबन क्रांतीवरील त्याच्या भाष्यामुळे त्याला आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी लाभली होती.

क्रांतिकारक सैन्याच्या त्या तुकडीने हॅवानात प्रथम प्रवेश करून बाटीस्टाच्या सैन्याला धूळ चारली त्या तुकडीचा नेता चे गव्हेराच होता. विजयानंतर फिडेलने त्याला हॅवानाचा कमांडर म्हणून नेमले होते. डिसेंबर १९५९ मध्ये त्याला क्यूबाच्या राष्ट्रीय बँकेचे अध्यक्ष म्हणून नेमले होते. पुढे फिडेलने स्वतःचे मंत्रीमंडळ बनविले तेव्हा त्याला उद्योगमंत्री नेमले.

चे गव्हेराकडे जरी उद्योगखाते असले तरी क्यूबाच्या आर्थिक नियोजनामध्ये फिडेलएवढाच त्याचाही हात होता. रशियन कम्युनिस्टांना नाराज करून क्रांतिकारक भूमिसुधारणा आणि शेतीसुधारणा योजना क्यूबात राबविण्यास चे गव्हेराचाच आग्रह होता. या योजना फसल्या तेव्हा चे ने स्वतःची चूक प्रामाणिकपणे कबूल केली. अमेरिकन साम्राज्यवाद्यांप्रमाणेच रशियन कम्युनिस्ट राजवटही क्यूबाकडे भांडवलशाही दृष्टिकोनातूनच पाहते असा उघड आरोप करणाऱ्यांमध्ये चे च होता. अण्वस्त्रधारी अग्निबाणांच्या संबंधातल्या आणीबाणीच्या प्रसंगी रशियानेही माघार घेऊन सबंध लॅटिन अमेरिकेचा विश्वासघात केला हे फिडेलचे मत उघडपणे चे गव्हेरानेच व्यक्त केले.

चे गव्हेरा आणि फिडेल कास्ट्रो यांचे संबंधही अत्यंत प्रेमाचे होते. फिडेलच्या नेतृत्वावर त्याची संपूर्ण निष्ठा होती. नेहमीप्रमाणे अमेरिकन वृत्तपत्रांनी चे आणि फिडेल यांच्यात जबरदस्त सत्तासंघर्ष चालू असल्याच्या बातम्या उठविल्या होत्या. परंतु सत्तास्थान मिळविणे हे तर चे च्या स्वभावाशी पूर्णतः विसंगत होते. आणि फिडेलवर त्याची निष्ठाच नव्हे तर भक्ती होती.

क्यूबाच्या परराष्ट्र संबंधातही चे गव्हेराचा मोठा वाटा होता. क्यूबाचा प्रतिनिधी म्हणून चे ने अनेक राष्ट्रांशी व्यापारी करार केले. औद्योगिक संबंध जुळविले. सोव्हिएत रशिया, झेकोस्लोव्हाकिया, चीन, उत्तर कोरिया, व्हिएतनाम आदी राष्ट्रांचा झंझावाती दौरा करून त्याने आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीची प्रथमच जवळून पाहणी केली. अर्थात यामधून त्याने काढलेले स्वतंत्र निष्कर्ष त्याच्या स्वाभिमानी स्वभावाचे द्योतकच होते. डिसेंबर १९६४ मध्ये चे ने संयुक्त राष्ट्रसंघात क्यूबाचे प्रतिनिधीत्व करून अमेरिकेच्या व्हिएतनामवरील आक्रमणावर जोरदार हल्ला करून व्हिएतनामशी क्यूबाचे नाते जोडले. व्हिएतनामी जनतेची बेफाट प्रतिकार शक्ती चे ने ओळखली होती आणि वेळोवेळी तो व्हिएतनामचा आदर्श समोर ठेवण्याविषयी लॅटिन अमेरिकन क्रांतीकारकांना बजावून सांगत होता.

क्रांतीकारकांचे जीवन मोठे विचित्र असते. विशेषतः सर्वंकष क्रांतीचा वसा घेतलेल्या चे गव्हेरा सारख्यांचे चे ने आपल्या आईवडील आणि भावंडांना अर्जेंटिनामध्ये सोडले होते. गटेमालामध्ये त्याने एका पेरुव्हियन क्रांतीकारी युवतीशी विवाह केला होता. तिच्यापासून त्याला एक मूलही झाले होते. परंतु क्रांतीची हाक येताच तो गटेमाला सोडून मेक्सिकोत गेला तेव्हा त्या दोघांनाही त्याने

तेथेच ठेवले. क्यूबात आल्यावर त्याने अलैदा या तरुणीशी विवाह केला. लॅटिन अमेरिकन नितिमत्तेत हे सर्व चालते. तिच्यापासून त्याला चार अपत्येही झाली होती.

अशा रीतीने हा भटका क्रांतीकारक आता एका ठिकाणी स्थिर झाल्यासारखा वाटत होता. किमान सुखसोयी आणि स्थैर्य त्याला लाभले होते. पण सुखासीनता हा चे चा स्वभावधर्मच नव्हता. लॅटिन अमेरिकन देशातील गांजलेली जनता त्याला साद घालीत असताना हा अस्वस्थ क्रांतीकारक मंत्र्याच्या खुर्चीवर स्वस्थ कसा बसू शकेल? 'कोणत्याही औषधापेक्षा बंदुकीच्या नळीतून निघणाऱ्या दारुच्या धुरामुळे मला दम्यापासून अधिक आराम वाटतो', असे चे ने सिएरा मेस्त्रात एका अमेरिकन पत्रकाराला मोठ्या अभिमानाने सांगितले होते. बंदूक दूर जाऊन त्याच्या हाती आता लेखणी आली होती. तो मन लावून काम करीत होता. पण त्याचे मन रमत नव्हते. क्यूबा एक लहानसे द्वीपकल्प. क्रांतीच्या यशाचा पाया तर तेथे घातला गेला होता. पुढील प्रगतीची निश्चिती होती. आता क्यूबाला आपली फारशी गरज उरली नाही, इतर लॅटिन अमेरिकन देशांचे काय? सशस्त्र क्रांतीची अनिवार ओढ त्याला बोलावीत होती.

चे गव्हेरा हा कायम क्रांतीकारक होता. सत्ता राबविणे मात्र त्याला कंटाळवाणे वाटत होते. सिएरा मेस्त्राच्या काळात फिडेलबरोबर क्रांतीकारी चळवळीत असताना तो आपले सर्वस्व पणाला लावून काम करीत होता आणि आनंदी होता. परंतु क्रांतीच्या यशानंतर खुर्चीवर बसून करण्याची कामे त्याच्या हाती आल्यावर तो काहीसा निरुत्साही झाला. क्रांतीकार्य हा त्याचा धर्म होता. आणि एखाद्या कर्मठ भाविकाप्रमाणे त्याची आपल्या कार्यावर निष्ठा होती.

चे ची अस्वस्थता फिडेलच्या ध्यानी आली होती. क्यूबा सोडून जाण्याचा आपला मनोदय त्याने फिडेलला १९६४ मध्ये सांगितलाही होता. फिडेलने त्याचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. शेवटी त्याच्या मताला मान देऊन त्याने संमती


सरदारगृह

राहण्याची व भोजनाची उत्तम सोय. हीरक महोत्सवानिमित्त
विविध सुखसोयी—अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह.

**सरदारगृह प्रायव्हेट लिमिटेड**

क्राफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

मंगलकार्ये व मेजवान्यांची उत्तम व्यवस्था.

दिली. त्या दोघांनी एकत्र बसून गुप्तपणे एक योजना आखली. योजना कुणाला कळू द्यायची नव्हती.

अखेर १९६५ च्या मध्याला या तरुण व्रतस्थ क्रांतीकारकाने क्यूबातील आपले मंत्रीपद आणि इतर सर्व अधिकार पदे आपखुषीने सोडली. सर्व पाश तोडले. बायका-मुलांना मागे ठेवले आणि खांद्यावर किमान सामानाची पिशवी टाकून आणि हाती बंदूक घेऊन एका अज्ञात स्थळी हा कलंदर क्रांतीकारक रवाना झाला.

जाण्यापूर्वी त्याने फिडेलला पत्र लिहिले.

---

प्रिय फिडेल,

क्यूबन क्रांतीमध्ये माझ्या वाटयाला आलेली कामगिरी मी पूर्णपणे पार पाडली आहे असा माझा विश्वास आहे... खरोखर या क्रांतीमध्ये मी उत्कृष्टरीतीने जगलो. जगातील इतर देश माझ्या तुटपुंज्या कर्तुत्वाच्या मदतीची साद घालीत आहेत. राज्याचा प्रधानमंत्री या जबाबदारीच्या नात्याने तुला जे करता येत नाही ते सुदैवाने मला आता साध्य आहे. आपल्या ताटातुटीची वेळ आता आली आहे. हर्ष आणि दु:ख यांचे विचित्र मिश्रण मनात घेऊन मी निघतो आहे हे मात्र लक्षात ठेव. निर्मितीच्या सर्व शुद्ध आशा आकांक्षा मी इथे सोडून जात आहे. माझ्या प्रिय आप्त जनांना मी इथेच सोडतो आहे. ज्यांनी मला आपले मानले अशा जनतेलाही सोडून जात आहे.

पक्षाच्या सर्व जबाबदाऱ्या, मंत्रीपद मेजरची रँक आणि क्यूबन नागरिकत्व यामधून मी आता मुक्त होत असल्याचे जाहीर करतो आहे.

---

योग्य वेळ येईल तेव्हा हे पत्र जाहीर करण्यासंबधीही चे ने फिडेलला सांगितले. स्वत:ची पत्नी आणि मुले यासंबंधी त्याने लिहिले " मी त्यांच्यासाठी काही मागत नाही. कारण क्यूबन सरकार त्यांच्या शिक्षणाची व गरजांची काळजी घेईलच.'

गव्हेराने हे पत्र एक एप्रिल १९६५ रोजी लिहिले होते. फिडेलने ते गुप्त ठेवले. चे गव्हेरा कोणत्या स्थळी आणि कोणत्या कामगिरीवर निघाला आहे हे कुणाला कळता कामा नये असा त्याचा उद्देश होता. कारण सी. आय. ए आणि तिच्या उपशाखा यांची जबरदस्त जाळी सर्व लॅटिन अमेरिकेत विखुरली होती. चे गव्हेरा हा महत्त्वाचा माणूस होता. चे क्यूबा सोडून निघाला आहे हे त्यांना कळणे देखील धोक्याचे होते.

फिडेलने हे पत्र चे त्याच्या अज्ञात इप्सित स्थळी पोचला आहे हे कळल्यावर ऑक्टोबर १९६५ च्या दुसऱ्या आठवड्यात जाहीर केले. हॅवानामधल्या एका सभेत त्याने ते वाचून दाखविले. या सभेला पुढच्या रांगेत चे ची पत्नी अलैदा बसली होती. आपला ज्वालामुखीसारखा धगधगणारा नवरा नेमका कुठे निघून

गेला आहे हे तिलाही माहित नव्हते. चे च्या पत्रातील आपल्या बायको-मुलांचा उल्लेख फिडेलने वाचला तेव्हा ती स्फुंदुन स्फुंदून रडू लागली.

परंतु त्या अगोदर कुठल्यातरी अज्ञात स्थळाहून चे ने आपल्या आईवडिलांना पत्र लिहिले होते,

---

**प्रिय आई-बाबा,**

पुन्हा एकदा माझ्या पायांना भिंगरी लागली आहे. पुन्हा एकदा हाती शस्त्र घेऊन मी रस्त्यावर आलो आहे.

जवळ जवळ दहा वर्षापूर्वी मी तुम्हाला असेच निरोपाचे पत्र लिहिले होते. मला आठवते, त्या पत्रात स्वतः चांगला डॉक्टर आणि चांगला सैनिक नसल्याबद्दल मी दुःख व्यक्त केलं होतं. डॉक्टरकीत आता मला रस नाही; पण मी एक बऱ्यापैकी सैनिक आहे.

माझ्यात फारसे मूलभूत बदल झालेले नाहीत. पण आता माझ्या जाणीवा अधिक जागृत झाल्या आहेत आणि माझा मार्क्सवाद आता अधिक शुद्ध झाला असून त्याने पक्के मूळ धरले आहे. स्वातंत्र्यासाठी आसुसलेल्या लोकांना सशस्त्र लढा हाच एकमेव मार्ग आहे असा माझा विश्वास आहे आणि माझी श्रद्धा कायम आहे. बरेच लोक मला धाडसी म्हणतील. मी आहेच. पण वेगळ्या प्रकारचा. आपल्या तत्त्वांसाठी प्राणाचे मोल देण्याची तयारी असलेला.

हा माझा शेवटही असू शकेल. ती शक्यता धरायलाच हवी. तसं झालं तर हा माझा शेवटचा प्रणाम.

मी तुमच्यावर नेहमीच माया केली आहे. पण माझ्या भावना व्यक्त करणे मला नेहमीच जमले नाही. मी वागण्यात अतिशय कठोर आहे आणि कधी कधी गैरसमजुती झाल्याही असतील. मला समजणे नाहीतरी कठीणच आहे....

कधीतरी या विसाव्या शतकातल्या सैनिकांची आठवण काढीत चला.

तुमच्या या चळवळ्या आणि बंडखोर मुलाचा प्रणाम.

**अर्नेस्टो.**

---

क्यूबामधून चे गव्हेरा एकाएकी नाहीसा झाल्याने तर्कवितर्क सुरू झाले. त्याच्या नाहीसे होण्याबद्दल फिडेल किंवा इतर कोणीही काहीही माहिती देण्यास तयार नव्हते. या रहस्यमयतेमुळे तर शंका कुशंकांमध्ये अधिकच भर पडली. फिडेलचे शत्रू तर चे ची लोकप्रियता सहन न होऊन फिडेलनेच त्याला निकालात काढले असावे असे बोलू लागले.

खरोखर चे गव्हेरा कुठे गेला होता ?

गव्हेरा मार्च १९६५ मध्ये क्यूबातून नाहीसा झाला. ऑक्टोबर मध्ये फिडेल कास्ट्रोने त्याचे पत्र वाचून दाखविले. पुढे अनेक वेळा चे गव्हेराची पत्रे आणि लेख क्यूबात प्रसिद्ध झाले. पण चे चा नेमका ठावठिकाणा कोणालाच माहीत नव्हता. अमेरिकन पत्रकार तर चे जिवंत आहे यावर विश्वास ठेवायलाच तयार नव्हते. चे पाईन बेटावरील तुरुंगात खितपत पडला आहे, येथपासून तो त्याला फिडेलने ठार मारले अशा अफवा घुमत होत्या.

अखेर चे च्या मृत्यूची बातमी १०–११ ऑक्टोबर, १९६७ मध्ये बोलीव्हियन अधिकाऱ्यांनी त्याच्या छायाचित्रासकट प्रसिद्ध केली तेव्हा कुठे चे चा नेमका पत्ता जगाला कळला आणि क्यूबावर दुःखाची छाया पसरली.

गव्हेरा क्यूबामधून सरळ बोलीव्हियात गेला नव्हता. त्याचा पहिला मुक्काम आफ्रिकेत होता. जानेवारी १९६५ मध्ये तो काँगोमध्ये अधिकृत दौऱ्यावर गेला असताना त्याने किन्शासाच्या डाव्या बंडखोरांना मदतीचे आश्वासन दिले होते. त्याचप्रमाणे टांझानियामधील बंडखोरांच्या गुप्ततळांनाही त्याने भेटी दिल्या आणि फिडेलच्या संमतीने मदत करण्याचे आश्वासन दिले.

हॅवानात परतल्यावर चे आणि फिडेल या दोघांनी मिळून गुप्तपणे १२५ क्यूबन गनिमी सैनिक जमविले. चे च्या नेतृत्वाखाली या छोटयाश्या तुकडीने एका रात्री गुप्त रीतीने किन्शासा बंडखोरांच्या मदतीसाठी कांगोडाकडे प्रयाण केले.

टांझानिया व पूर्व काँगो यांमधील टांगायनिका सरोवर ओलांडून चे च्या तुकडीने किन्शासा बंडखोरांच्या प्रदेशात प्रवेश केला. बंडखोरांना रशियन शस्त्रांची मदत होती. अल्जेरियन तज्ञ सल्लागार म्हणून होते. चे च्या तुकडीचे देखील बंडखोरांनी स्वागत केले.

परंतु चे ला तेथे फारसा चांगला अनुभव आला नाही. बंडखोरांचा लढा अगदीच धीम्या गतिने चालू होता. पुढे लवकरच त्याला आढळून आले की, बंडखोरांमध्ये आपापसातच मारामाऱ्या आहेत, ते बेशिस्त आहेत आणि मुख्य म्हणजे लढयाची त्यांच्यात जिद्द नव्हती. त्यांच्यापैकी बरेच लोक तर लाचखाऊ होते. अखेर बंडखोरांची आपले पक्के तळ टिकविण्याचीही तयारी राहिली नाही, तेव्हा चे गव्हेराने, वैतागून त्यांचा नाद सोडला, सर्व मदत बंद करण्याचा त्याने फिडेलला सल्ला दिला आणि तो स्वतः आपल्या तुकडीसह नोव्हेंबर–डिसेंबर १९६५ मध्ये हॅवानात परतला. गुप्त रीतीने. क्यूबात परतल्याबरोबर विश्रांती न घेता चे ने लगेच आपल्या पुढच्या योजना आखायला सुरुवात केली. बोलीव्हिया विषयीच्या.

लॅटिन अमेरिकेच्या मुक्ती लढयाची सुरुवात बोलीव्हियापासून करायची हा चे आणि फिडेल यांनी निर्णय घेतला त्याला अनेक कारणे असतील. परंतु हा निर्णय घातक ठरला. चे चा शेवट करणारा ठरला. बोलीव्हिया दक्षिण अमेरिकन भूभागाच्या अगदी मध्यभागी आहे. उत्तरेला अल्जेरिया, पूर्व आणि उत्तरेला

ब्राझील, पश्चिमेला चिली आणि पेरू आणि दक्षिणेला पराग्वे असे लॅटिन अमेरिकेतील पाच महत्त्वाचे देश बोलीव्हियाच्या सरहद्दीला लागून आहेत. बोलीव्हिया एकदा पेटून उठला की क्रांतीच्या ज्वाळा भराभर या देशांमधून पसरून सबंध खंडाला ग्रासून टाकतील असा सरळ हिशेब फिडेल आणि चे यांचा होता. शिवाय बोलीव्हियर हा अत्यंत डोंगराळ आणि जंगली मुलूख. अद्यापही तिथे आदिवासी अमेरिकनांची लोकसंख्या भरपूर आहे.

## बोलिव्हियाची निवड पक्की झाली

बोलीव्हिया राजकीय दृष्ट्या अशांत होता. बारियेन्तो हा एकेकाळचा धडाडीचा क्रांतिकारक अध्यक्षपदी होता. लष्कर हाच जरी त्याच्या राज्ययंत्रणेचा कणा असला तरी क्रांतिकारी प्रक्रियेतूनच बारीयेन्तो सत्तेवर आला असल्याने त्याला जनतेच्या आशा-आकांक्षांची चाड होती. परंतु राजकीय दृष्ट्या बोलीव्हिया क्रांतिसाठी परिपक्व नसला तरी चे आणि फिडेल ने त्याचदेशाची निवड केली. 'क्रांतीसाठी परिपक्व परिस्थिती निर्माण होण्यासाठी वाट बघत बसण्याची नेहमीच आवश्यकता नाही. क्रांतिकारी दल ते कार्य करू शकते,' असे चे गव्हेरानेच म्हटले होते.

बोलीव्हियन मोहिमेची पूर्व तयारी फिडेल आणि चे यांनी मोठ्या काळजीपूर्वक केली होती. या तयारीसाठी चे गव्हेरा तीन-चार महिने क्यूबातच होता. पण कुणाला ते माहीत नव्हते. हळूहळू एकेक क्रांतिकारक गुप्त मार्गाने बोलीव्हियात उतरू लागला. असे अठरा क्यूबन बंडखोर बोलीव्हियात जमले.

चे क्यूबातून सरळ बोलीव्हियात गेला नाही. क्रांतिकारकांच्या आघाडीच्या तुकडीने बोलीव्हियातल्या न्यान्कावाझू या ठिकाणी डोंगराळ जंगलात एक तळ स्थापन केल्यावर चे हॅवानाहून युरोपास प्रागला गेला. तेथून जर्मनीत फ्रँकफुर्टची फेरी मारून ब्राझीलची राजधानी साव-पावलो येथे तो ३ नोव्हेंबर १९६६ रोजी पोचला आणि तेथून विमानाने त्याने सरळ बोलीव्हियन राजधानी ला पाझ ला धडक मारली.

बोलीव्हियाच्या राजधानीत सरळ घुसणे धोक्याचे होते. परंतु चे ने बेमालूम वेशांतर केले होते. त्याच्याजवळ एक बनावट पासपोर्ट होता. डोक्याला अर्धवट टक्कल पडलेले, नाकावर जाड चष्मा, गुळगुळीत दाढी केलेली, अंगावर अद्ययावत सूट. अशा वेशात हाच तो सुप्रसिद्ध क्रांतिकारक चे गव्हेरा असे कुणी ओळखू शकले नसते. पासपोर्टावर त्याचे वर्णन व्यापारी म्हणून केले होते. ते त्याला बरोबर लागू पडत होते. विमान तळावर एक मोटार त्याचीच वाट पाहत उभी होती.

स्थानिक क्रांतिकारकांशी पुढील योजनांची निश्चिती करण्यापुरताच चे ने ला पाझ येथे मुक्काम केला. नंतर लगेच चार जणांसह दोन जीपमधून त्याने आपल्या तळाकडे कूच केले. मोठ्या शहरी वस्त्या टाळीत तीन दिवस प्रवास करून एका



क्यूबा स्वतंत्र झाला.
एक स्वप्न साकार झाले.



तरफ्यातून रीयो ग्रान्द्रे ही मोठी नदी ओलांडून न्यान्कावाझू येथे पोचला. चे चे आगमन एवढे गुप्त ठेवण्यात आले होते, की जीपमधल्या तिघा सहकाऱ्यांनाही आपल्या शेजारी बसलेला व्यापारी आपल्याबरोबर का पाठविण्यात आला हे कळत नव्हते. चे चे टोपणनाव रमन असे होते. एकाएकी त्याच्या जीपच्या ड्रायव्हरला रमन म्हणजे दुसरा तिसरा कुणी नसून खुद्द चे गव्हेराच आहे अशी अचानक ओळख पटली आणि त्याला इतका आश्चर्याचा धक्काच बसला, की त्याने आपली जीप सरळ एका कड्यावर घातली. सुदैवाने मोठा अपघात झाला नाही. नाही तर चे चे क्रांतीकार्य तेथेच संपले असते.

तळावर पोचल्यावर चे ने नवी डायरी उघडली. पोचल्याचा दिवस होता सात नोव्हेंबर १९६६. चे ची ही डायरी पुढे संपूर्ण प्रसिद्ध झाली. बोलीव्हियन मोहिमेची साद्यंत वस्तुस्थिती निवेदन करणारी ही रोजनिशी खरोखर उत्कृष्ट साहित्यकृतीचा नमुनादेखील ठरू शकेल. चे गव्हेराचे रोमहर्षक आणि करुणगंभीर दर्शन या रोजनिशीत घडते. त्याचप्रमाणे या मोहिमेमध्ये त्याने किती भयंकर परिस्थितीत धैर्याने दिवस काढले आणि शेवटपर्यंत जिद्द सोडली नाही हेही दिसते.

डायरीची सुरुवात चे ने केली. आज एका नव्या पर्वाला प्रारंभ होत आहे—

आणि खरेच पुन्हा एकदा चे चे क्रांतीकारी जीवन सुरू झाले. हाती बंदुका घेऊन भटकणे, आसपासच्या क्रांति-कारकांशी संपर्क साधणे, स्थानिक

लोकांशी संपर्क साधणे. डोंगर दऱ्यांमध्ये अन्नासाठी वणवण हिंडणे, पोलिसांना आणि सैनिकांना चुकविण्यासाठी नियमितपणे राहण्याचे ठिकाण बदलणे असा जीवनक्रम सुरू झाला.

सुरुवातीचा न्यान्कावाझू हा लहानसा तळ अत्यंत दुर्गम प्रदेशात होता. आजूबाजूला चित्त्यासारखी रानटी जनावरे हिंडत असत. गनिमी तळाला आवश्यक असणाऱ्या सोयी उभारण्यात पहिले काही दिवस गेले. हळूहळू नवी माणसे येऊ लागली. डिसेंबरपर्यंत एकूण चोवीस क्रांतिकारक जमले. पण त्यापैकी फक्त नऊच बोलीव्हियन होते. पुढे चे च्या क्रांतिसैन्याला एकूण २९ बोलीव्हियन्स येऊन मिळाले. त्याची तुकडी आंतरराष्ट्रीय होती. क्यूबन्स, पेरुव्हियन्स्, ब्राझीलियन्स् सैनिक त्याच्या तुकडीत होते. पण चेला त्याचा फारसा अभिमान नव्हता. त्याला अधिक बोलीव्हियन्स हवे होते. पण बोलीव्हियनांचा फारसा पाठिंबा त्याला कधीच मिळाला नाही. हेच त्याच्या अपयशाचे कारण.

बोलीव्हियन जंगलातील परिस्थिती अत्यंत खडतर होती. तशा स्थितीतही आपल्या गनिमी सैनिकांना प्रशिक्षण देण्यासाठी आणि बोलीव्हियन भूभागाची माहिती करून घेण्यासाठी चे गव्हेराने जानेवारी १९६७ मध्ये एक मार्च आखला. बोलीव्हियन शेतकऱ्यांना आपल्या तुकडीत आकर्षित करून घेणे हाही उद्देश होताच.

ही चाल मोठी हालाची झाली. मार्च पूर्ण होण्यास योजनेपेक्षा दुप्पट—म्हणजे



आता नजर होती बोलिव्हियावर



४८ दिवस लागले. कारण परतताना बंडखोरांना न्यान्कावाझूचा रस्ताच सापडत नव्हता. मार्च १९ ला आपला जिकिरीचा प्रवास संपवून तळावर पोचला तेव्हा ते थकव्याने अर्धमेले झाले होते, नाउमेद होते, आणि पूर आलेली एक नदी ओलांडताना दोघेजण बुडून मरण पावल्याने संख्येने कमी झाले होते. सर्वांत नाउमेद करणारी गोष्ट म्हणजे या अठ्ठेचाळीस दिवसांच्या अवधीत सबंध प्रवासामध्ये त्यांना एकही शेतकरी येऊन मिळाला नव्हता. एवढेच काय जे जे ग्रामीण लोक त्यांना भेटले त्यांच्यापैकी फारच थोड्या लोकांनी त्यांना सहानुभूती दर्शविली. अशा निरुत्साही अवस्थेत धडपडत ते आपल्या तळावर पोचले तेव्हा त्यांना कळून चुकले की या तळाचाही बोलीव्हियन लष्कराला आता सुगावा लागला आहे.

दोन तीन दिवसातच एक लष्करी तुकडी या तळाकडे येत आहे असा पत्ता लागला. बंडखोरांनी या बत्तीस जणांच्या तुकडीला २३ मार्च रोजी एका खिंडीत गाठून लढत दिली. सात सैनिक ठार झाले, सहा जखमी झाले आणि अकरा बंडखोरांच्या हाती पडले. इतर पळून गेले. बंडखोरांना काही बंदुकी आणि दारूगोळाही मिळाला.

हा विजय अनपेक्षित होता. या चकमकीला जोरदार प्रसिद्धी मिळाली. त्यामुळे बंडखोरांना नव्याने हुरूप आला खरा. परंतु त्यामुळे चे च्या क्रांतीतळाचा पूर्ण मागोवा लष्कराला लागला होता. आता लष्कर आपल्या पूर्ण शक्तीनिशी तुटून पडण्याचा संभव होता. चे च्याच तत्वांप्रमाणे स्थानिक जनतेच्या पाठिंब्याशिवाय लढा सुरू करणे धोक्याचे होते.

विजयानंतर पुन्हा निष्क्रीयतेचे दिवस आले. अठ्ठेचाळीस दिवसांच्या प्रवासात सगळ्यांचीच प्रकृती खालावली होती. चे ला पुन्हा दम्याने ग्रासले होते आणि सबंध बोलीव्हियात त्यांच्या मदतीला धावून येणारी कोणतीही संघटना नव्हती. लष्कर अंगावर ओढवून घेण्यासारखी ही परिस्थिती नव्हती. पण आता इलाज नव्हता.

त्यानंतर लगेच आठवडाभरात गनिमी सैनिकांना न्यान्कावाझू तळ सोडावा लागला. हा तळ म्हणजे डोंगर कपारीतील कित्येक गुहा. तळ सोडताना अनेक गुहांमधून त्यांनी आपले काही सामान लपवून ठेवले आणि पाय काढले.

## तानिया ऊर्फ लारा

चे ची बोलीव्हियामधील सर्वात महत्त्वाची हस्तक असलेली व्यक्ती म्हणजे तानिया उर्फ लॉरा. तानिया चे ची प्रेयसी. पूर्व जर्मनीत गेला असताना चे ला ती भेटली. चे ने तिला क्यूबा भेटीचे निमंत्रण दिले. १९६१ मध्ये ती क्यूबात आली आणि हळूहळू तिने आपले सर्वस्व क्यूबाला वाहून टाकले. गनिमी युद्धतंत्रात ती तयार झाली आणि १९६२–६३ मध्ये बोलीव्हियात तिने गुप्तरीतीने प्रवेश करून तेथेच ती स्थायिक झाली. ला पाझ येथे तिने आपले चांगलेच बस्तान बसविले. अगदी बोलीव्हियन अध्यक्षांच्या कचेरीपर्यंत तिचे हात पोचले होते. एका रेडियो

स्टेशनवर तिचा ' प्रियकरास विरहिणीची पत्रे ' अशा अर्थाचा एक नियमित कार्यक्रम होत असे. तिची ही पत्रे बहुतेकांच्या डोक्यावरून जात. पुढे कळून चुकले की ही पत्रे म्हणजे चे गव्हेरा आणि त्याच्या साथीदारांना पाठविलेले संदेश होत.

जे काही बोलिव्हियन्स् चे ला येऊन मिळाले ते तानिया च्या प्रयत्नामुळे. तानिया स्वतःही जानेवारीच्या सुमारास न्यान्कावाझू तळावर येऊन मिळाली. तेथून सैनिकांच्या गोळ्यांना बळी पडेपर्यंत म्हणजे ३१ ऑगस्टपर्यंत ती चे बरोबर होती. क्यूबामध्ये ती क्रांतिकारक तानिया म्हणून प्रसिद्ध आहे.

पुढे तानिया रशियन गुप्तहेरांची हस्तक असल्याचे काही अमेरिकन प्रत्रकारांनी सूचित केले. चे गव्हेराच्या हालचालीवर नजर ठेवण्यासाठी रशियानी तिला नेमले होते असे त्यांनी सांगितले, ते काहीही असो. बोलीव्हियात चे गव्हेराला तानियाची मोठीच मदत झाली यात शंका नाही.

न्यान्कावाझूचा तळ सोडल्यावर मात्र काही दिवस चे च्या लहानशा तुकडीने आसपासच्या सैनिकांना सळो का पळो करून सोडले. रस्ते अडवून सैनिकांना कापणे, खिंडीत गाठणे, रसद तोडणे अशा मार्गांनी त्यांनी काही दिवस सैनिकांना बेजार केले. पण या यशामुळे काही त्यांना जीवनावश्यक वस्तू मिळत नव्हत्या. अन्न, विश्रांती, झोप, मदत काही मिळत नव्हते.

एका ठिकाणी बंडखोरांच्या दोन तुकड्या पडल्या. ठरलेल्या ठिकाणी दोन्ही तुकड्या काही एकमेकांना गाठू शकल्या नाही. मग त्या निबिड अरण्यात त्या दोन्ही तुकड्या एकमेकांचा मार्ग काढीत राहिल्या. तीन महिनेपर्यंत हे असे चालले. अखेर दुसरी तुकडी बोलीव्हियन सैनिकांनी गाठून कापली. त्यातच तानिया मेली.

या काळात क्रांतिकारकांचा प्रमुख शत्रू होता निसर्ग. ते जंगल आणि त्या डोंगर-कपारी खरोखरच महाभयानक आहेत. बडखोर सतत मार्ग विसरीत होते. अन्न मिळविणे महाकठीण होऊन बसले होते. भुकेमुळे बेशिस्त माजली होती. नद्या ओलांडणे हे महा दुरापास्त काम होऊन बसले होते. जूनच्या शेवटापर्यंत स्वतः चे दम्याच्या विकाराने आजारी आणि अत्यंत अशक्त झालेला होता. त्याला पायी चालणे अशक्य झाल्याने खेचरावर बसावे लागत होते. औषधं मिळत नव्हती.

अशा स्थितीतही बंडखोर बोलीव्हियन सैन्याला दाद देत नव्हते. कारण बोलीव्हियन लष्करही त्यावेळी अगदीच निकृष्ट दर्जाचे होते. अशा स्थितीतही बंडखोरांनी सात जुलै रोजी सेमईपाता या लहानशा शहरात प्रवेश करून आपला सर्वात मोठा विजय मिळविला. या लहानशा शहरात घुसण्यामागे चे चा उद्देश होता काही औषधे व अन्न मिळविणे. औषधे मिळाली नाहीत. पण बोलीव्हियात गनिमी क्रांतिकारक सैन्याने एक शहर व्यापल्याच्या बातमीला जगभर प्रसिद्धी मिळाली.

बोलीव्हियात एकच खळबळ माजली आणि आता जणू सारा दक्षिण बोलीव्हियाच गनिमी क्रांतिकारकांच्या ताब्यात जात आहे अशी भिती निर्माण झाली.

परंतु तसे काहीच नव्हते. हवी तेवढी खरेदी करून गव्हेराने जंगलात काढता पाय घेतला. लष्कराची नाचक्की झाली होती. त्यामुळ आता खरोखरच बंडखोरांचा निःपात करण्याची मोहीम बोलीव्हियन लष्कराने हाती घेतली आणि तेथूनच बंडखोरांच्या पूर्ण ऱ्हासाला सुरुवात झाली.

दुर्दैवाने गनिमी सैनिकांच्या दोन तुकड्या झाल्या होत्याच. एक चे गव्हेराची आणि दुसरी तानियाची. दोन्हीही तुकड्यांनी एकमेकांना शोधण्यासाठी रियो ग्रंदो ही नदी दोनदा पार केली. चे नदीच्या उत्तरेला गेला तेव्हा तानियाची तुकडी दक्षिणेला होती आणि चे नदी पार करून दक्षिणेला आला तेव्हा तानिया उत्तरेला गेली होती. उत्तरेचीच एक लहानशी नदी तानियाची तुकडी पार करीत असताना त्यांच्या मागावरच असलेल्या एका लष्करी गटाने दुरून पाहिले आणि गोळ्या झाडल्या. प्रथम मरणाऱ्यांमध्ये तानिया होती. दहाजणांपैकी एकच वाचला आणि त्याने चे च्या तुकडी विषयीची माहिती पुरविली.

इकडे गव्हेराच्या मागावरही लष्कर होतेच. गव्हेरा आता अतिशय डोंगराळ भागात लष्कराला हुलकावणी देण्यासाठी घुसला होता. त्यामुळे हालअपेष्टाही वाढल्या. अधून मधून चकमकी झडू लागल्या. गव्हेराचा एकेक साथीदार बळी पडू लागला. त्याच्यावरही आता निराशेचे सावट पडू लागले. मृत्यूची छाया दिसू लागली.

सप्टेंबरमध्ये तर चे ची प्रकृती अधिकच खालावली होती. दमा प्रमाणाबाहेर गेला होता. अन्नाचा प्रश्न एवढा बिकट झाला होता की, चे ज्यावर बसून हिंडत होता ते खेचरही मारून खावे लागले. पुढे तर आधी मरून पडलेल्या सडत चाललेल्या कुत्र्या-मांजरांचे मास खाण्याचाही प्रसंग बंडखोरांवर आला. सर्वांचीच प्रकृती क्षीण झाली होती. अन्नपाण्याविना बंडखोरांना घेऱ्या येऊ लागल्या.

सैन्य मागावर होतेच. नव्हे तीन बाजूने चेला कोंडीत पकडीत होते. शेतकरी आता लष्कराच्या सान्निध्यामुळे मुळीच मदत करीत नव्हते. एवढेच नव्हे तर चे च्या हालचालीची इत्थंभूत माहिती पुरवू लागले होते. चे ला मात्र सैन्याच्या हालचालीची काहीही माहिती मिळत नव्हती. रेडिओच्या सेन्सॉर केलेल्या बातम्यावरून जेवढे कळेल तेवढेच. पण त्यांची काहीच मदत नव्हती आणि अगदी अपरिहार्यपणे चे आपल्या अनुयायांसह सैन्याच्या कोंडीत लोटला जात होता. चे ला कळत होते, की आपण कोंडले जात आहोत. कोंडीतून सुटका करून घेण्याचा त्याचा प्रयत्न होता. पण सर्वच बंडखोरांच्या अशक्त अर्धमेल्या अवस्थेमुळे त्यांचा वेग खूपच मंदावला होता. रात्रंदिवस ते चालतच होते.

सात ऑक्टोबरच्या दिवसभर आणि रात्रभर बंडखोर चालतच होते. अखेर

अतिश्रमाने पहाटे २ वाजता क्वेबाद्रा देल युरो या एका ओहोळात त्यांनी मुक्काम टाकला. तशा स्थितीतही चे ने आपल्या रोजनिशीचे एक पान लिहून काढले आणि मग तो झोपला. भयानक धोक्याच्या अवस्थेत, थकल्याने गलितगात्र झालेला असतानाही एवढ्या रात्री जिद्दीने रोजनिशी लिहून काढणाऱ्या चे ची कमालच म्हटली पाहिजे.

आठ ऑक्टोबरच्या सकाळी बंडखोर उठून बघतात तो चारी बाजूच्या कड्यांवर सशस्त्र सैनिक उभे आहेत.

शरण तर जायचे नव्हतेच. दुपारी दीड वाजता चकमकीला आरंभ झाला. दोन्ही बाजूंनी जोरदार गोळा गोळी सुरू झाली. एकेक जण गोळी लागून पडू लागला. गव्हेराच्या पायात गोळी लागली. त्याचा बोलीव्हियन साथीदार विली याने चे ला त्या ओढ्यातून ओढत ओढत, संरक्षणासाठी गोळ्या झाडीत वर काढले. वर एका झाडाला चे टेकून उभा राहिला आणि तशा जखमी अवस्थेतही हुकूम सोडू लागला. सगळे बंडखोर ओहोळातून सुखरूप बाहेर पडून उंच जागी आले तर चांगली लढत देता येईल असे त्याला वाटत होते.

चे च्या हाती एक रायफल होती. एका बंदुकीच्या गोळीने त्याचा हात जायबंदी झाला आणि रायफल गळून पडली. त्याच्या संरक्षणासाठी प्रतिकार करणाऱ्या विलीच्या डोक्यात गोळी घुसून तो ठार झाला आणि चार बोलीव्हियन सैनिकांनी चे गव्हेराला पकडले.

त्याबरोबर चे ला दम्याची एक अशी जोरदार उबळ आली की काही क्षण त्याला श्वासही घेता येईना.

सैनिकांच्या अधिकाऱ्याने हाच बंडखोरांचा पुढारी आहे हे हेरले होते. त्याने

टोप्या, होजियरी व अद्यावत
तयार कपड्यांचे खरेदीसाठी

एन्. व्ही. गोखले

प्रार्थनासमाजजवळ, गिरगांव–मुंबई ४
यांचे दुकानीच जाणे श्रेयस्कर

चे ला स्वत:ची ओळख पटवून देण्याचे सांगताच चे म्हणाला,

'मी आहे चे गव्हेरा.'

चकमकीमध्ये चे गव्हेरा अटक झाल्याची वातमी बोलीव्हियन सरकारने प्रसिद्ध केली असली तरी न्यूयॉर्क टाईम्स्चा वातमीदार जुआन डी ओनीस याने गव्हेराला कसा मृत्यू आला याचे वर्णन केले आहे.

पकडल्यानंतर चे ला जवळच्याच खेड्यातील एका शाळेत रात्रभर ठेवण्यात आले. दुसरे दिवशी सकाळी सी. आय. ए.च्या एका एजंटाने त्याला दोन तीन तास प्रश्न विचारून छेडले.

ही प्रश्नोत्तरे चालू असतानाच बाजूच्या खोलीतून बंदुकीच्या गोळ्यांचा आवाज ऐकू आला. दुसऱ्या एका बोलीव्हियन गनिमी सैनिकाला ठार मारण्यात आले होते.

चे काही क्षण गप्प बसला. नंतर म्हणाला,

'ते आता मलाही ठार मारणार आहेत. पण त्यामुळे काही क्रांती थांबणार नाही. क्रांतीचा विजय निश्चित आहे.'

तेवढ्यात बोलीव्हियन लष्कराचा एक सैनिक आत घुसला. सी. आय. ए. एजंट निघून गेला.

तशा जखमी अवस्थेतही गव्हेरा उठून ताठ उभा राहिला आणि म्हणाला, 'माणूस कसा मरतो हे तुला बघायला मिळेल.'

त्या सैनिकाच्या बंदुकीतून चार गोळ्या निसटल्या आणि गव्हेरा खाली कोसळला.

गव्हेराचे शरीर त्या शाळेतच दिवसभर लोकांना पाहण्यासाठी ठेवले होते. एक बोलीव्हियन अधिकारी त्याच्या मृत शरीरावरची जखम दाखवीत आहे असे फोटोही बोलीव्हियन सरकारने प्रसृत केले.

त्यानंतर चे गव्हेराचे मृत शरीर कुठे गेले कुणास ठाऊक. बहुधा ते जाळून टाकले गेले. त्याचे स्मारक नको म्हणून ती शाळाही जाळून टाकण्यात आली. गव्हेराचे तेथे थडगेही नाही. इतिहासात मात्र त्याचे नाव कायम कोरले गेले आहे.

चे चा मृत्यू हा लॅटिन अमेरिकेतील क्रांतिकारी चळवळीला, विशेषत: क्यूबाला, जबरदस्त धक्का होता. लॅटिन अमेरिकेतील ठिकठिकाणच्या क्रांतिकारी चळवळी सुरुवात होण्यापूर्वीच कोसळून पडत होत्या. तेव्हा अनुभवी, धाडसी आणि क्रांतिशील चे गव्हेरा हाच सगळ्यांच्या आशेचा किरण होता. चे ने स्वत: गनिमी युद्धाचे जे नियम घालून दिले होते तेही त्याला बोलीव्हियात पाळता आले नाहीत आणि या शूर क्रांतिकारकाला वयाच्या अवघ्या एकोणचाळीसाव्या वर्षी असा रोमांचकारी मृत्यू आला. त्याच्या या नाट्यमय मृत्युमुळे तर त्याच्या प्रतिमेभोवती अधिकच तेजस्वी वलय निर्माण झाले आणि देशोदेशीच्या तरुण बंडखोरांचा तो अधिदैवत बनला.

चे च्या हालचालींची फिडेल कास्ट्रोला पूर्ण कल्पना होती. जोवर शक्य होते

तोवर क्यूबातून अनेक मार्गांनी चेला मदत जात होती. पुढे संबंध तुटले. ला प्लाझा-मधील हस्तक पकडले गेले. चे जवळील रेडिओ सेट सैनिकांच्या हाती पडला आणि मदत बंद झाली.

चे च्या मृत्यूने फिडेल कास्ट्रोच्या लॅटिन अमेरिकन धोरणांवर मोठाच परिणाम झाला. याचा अर्थ सशस्त्र क्रांतीचे मूलभूत तत्त्वच फिडेलने झिडकारले असा नव्हे. परंतु ही पद्धत केव्हा स्वीकारायची यावर फिडेलने आपले मत बदलले असले पाहिजे.

कारण चे गव्हेराच्या बोलीव्हियन मोहिमेच्या अपयशामुळे हे स्पष्ट झाले की जिथे सामान्य जनतेचा पाठिंबा नाही, तिथे अशा तऱ्हेची क्रांती घडवून आणणे अशक्य आहे. बोलीव्हियात आपल्याला पाठिंबा नाही हे स्वत: चे ला ही जाणवले होते आणि त्याने तसे आपल्या रोजनिशीत नमूदही केले होते. बोलीव्हियाची निवडच चुकली होती.

ते काहीही असले तरी चे ची प्रतिमा क्यूबनांच्या आणि तरुण बंडखोरांच्या मनात कायमची कोरलेली आहे. एखाद्या अग्निशिखेप्रमाणे त्याचे जीवन होते. तेवढेच भडक आणि शुद्ध. पैसा, ऐश्वर्य, सुखासीनता या भावनाच त्याला माहीत नव्हत्या. त्याने आपली सारी ताकद दुसऱ्यांसाठी वाहिली. अंगिकारलेल्या व्रता-

पृष्ठ ११७ वर

नामवंत रहस्यकथाकार श्री.जयंत ग. देवकुळे यांच्या
७ रहस्यांकित कादंबऱ्या व
१ दीर्घ रहस्यकथा संग्रह
आठहि पुस्तकांची मूळ किंमत रु.४२.००
सवलतीची किंमत रु.३५.०० फक्त
आपल्या नजीकच्या विक्रेत्याकडे अथवा
मॅजेस्टिक बुक स्टॉल { गिरगाव नाका. मुंबई ४ / शनिपाराजवळ. पुणे
(दि. ३० सप्टेंबर १९७२ पर्यंत नोंदणी केल्यास)
पुस्तके २.१०.७२ ला निश्चित प्रसिद्ध होणार

# स्मृती

वयाच्या अवघ्या एकोणचाळीसाव्या वर्षी चे गव्हेराला मृत्यू आला. त्याच्या नाट्यमय मृत्यूमुळे तर त्याच्या प्रतिमेभोवती अधिकच तेजस्वी वलय निर्माण झाले आणि देशोदेशीच्या तरुण बंडखोरांचा तो अधिदैवत बनला. त्याच्या पहिल्या स्मृतीदिनी दोन कवींनी वाहिलेली ही श्रद्धांजली.

---

Put a bullet in his head
Fields are dumb the earth is dead
Shoot the rebel from behind
Walls are deaf the roof is blind
Burn his body pound his flesh
Blood and water dry to ash

Cut his finger from his hand
Print it as his last command

After Zapata
Lumumba
Nadie y nada

Put a bullet in his head
Fields are marching earth is red
Shoot the rebel from behind
Walls have ears the roof a mind
Burn his body pound his flesh
Blood and water flood the ash
Cut his finger from his hand
Print it as his last command


After Zapata
Lumumba
GUEVARA
Viva la tierra

Andrew sinclair
(England)

# दोन कविता

Che, your comrades will create
A hymn from you of love and hate
    Your body is their instrument
    Of faith and courage and dissent
Keys have been made from all your bones
To play the scale of human groans
    Your skin is stretched to make a drum
    That plays the beat of fights to come
From your throat they've made a flute
That pleads for those who are still mute
    From your lips a whistle calls
    Every time a just man falls
Your heart's a bell that rings each time
An unjust man commits a crime
    A guitar from your rib-cage
    Plays the sorrow of our age
Your sinews have become the strings
That weep each time the guitar sings
    Each of your words is now a song
    Which has the power to right a wrong
Each deed a note, each note a word
Each word a song that can be heard
    And the foe learns to his cost
    That nothing of you has been lost
Do you see, Che, what love can do
For those you loved who now love you ?

B. Stephens
(USA)





You were a real
and actual man
Che Guevara
In your dying.

पृष्ठ ११३ वरून

विषयीच्या त्याच्या निष्ठा सखोल होत्या आणि त्यासाठी त्याने दिव्यही सोसले भयानक.

त्याला श्रद्धांजली वाहताना फिडेलने म्हटले, "चे सारखा माणूस एकच. चे गव्हेरा."

गव्हेराच्या मृत्यूमुळे लॅटिन अमेरिकेतला लढा संपला नाही. चे चे अपुरे राहिलेले कार्य फिडेल कास्ट्रोने पूर्ण करण्याचे अंगिकारले आहे. चे च्या मृत्यूमुळे गनिमी युद्ध तंत्र नष्ट थोडेच होणार आहे? त्याचे नाव आता एक स्फूर्तिचिन्ह झाले आहे. अन्याय, विषमता, दारिद्र्य आणि साम्राज्यशाही याविरुद्धच्या लढ्याचे. एका लढ्यात स्वत: चे जरी अयशस्वी झाला असला तरी जिथे जिथे तरुण बंडखोर प्रस्थापित समाजव्यवस्था आणि गुलामगिरीविरुद्ध लढे उभारतील तिथे तिथे चे चे नाव घेतले जाईल. फ्रान्समध्ये सुरू असलेल्या नवतरुणांच्या आणि डाव्या चळवळीचा प्रमुख स्फूर्तिदाता चे गव्हेराच. चे गव्हेराच्या व्यक्तिमत्वाला केवळ हिंसक आकर्षण आहे असे नव्हे तर एक गूढ रोमांचवादी, काव्यमय अर्थ आहे. त्यामुळेच छातीवर चे गव्हेराचे चित्र असलेले शर्ट्स् घालून हिंडत असलेले तरुण तरुणी युरोपातल्या रस्त्यावर दिसतात. मुंबईतही मधूनच असे एखादे जोडपे पाहावयास मिळते. चे ची टोपी, दाढी, त्याचे गबाळे भटके कपडे हा जणू आधुनिक तरुणांचा गणवेश झालेला आहे.

परंतु केवळ वैयक्तिक बुद्धिमत्तेच्या जोरावर अचाट साहसे करणारा व्यक्तित्ववादी हिरो म्हणून एकांगी दृष्टीने चे गव्हेराकडे पाहणे चूक ठरेल. ज्या लोकांमधून तो निर्माण झाला त्यांचा वास्तव प्रतिनिधी म्हणून त्याला ओळखले पाहिजे. जनतेच्या महान आणि खडतर लढ्यांमधून तावून सुलाखून निघालेले प्रतिनिधीच असे नेते, हुतात्मे किंवा हिरो बनू शकतात.

क्यूबन क्रांतीचे सर्वोत्कृष्ट प्रतीक म्हणजे चे गव्हेरा. नव्या क्रांतीची आणि नव्या आंतरराष्ट्रीय समाजवादाची स्वप्ने पाहणारा, जगातील जुलमी, भ्रष्ट सत्तास्थाने उलथून टाकण्याची स्वप्ने पाहणारा. क्यूबापुरते त्याचे स्वप्न सफल झाले आणि सबंध लॅटिन अमेरिका ढवळून काढण्याच्या ईर्षेमध्ये त्याने देह ठेवला. परंतु त्याच्या मृत्यूबरोबर क्रांतीची प्रक्रिया संपली नाही. जी संपते ती क्रांती नव्हेच. किंबहुना क्रांती ही कधीही न संपणारी प्रक्रिया. चे गव्हेरा, फिडेल कास्ट्रो आणि क्यूबा हे या अपरिहार्य प्रक्रियेचा केवळ एक पैलू दर्शवितात. या ना त्या मार्गाने क्रांती पुढे जातच राहते. बंदूक हाती असो वा नसो.

# स मा प्त

१२ ऑगस्ट १९७२

 पृष्ठ ६३ वरून

व घायाळ झालेल्या जवानांची संख्या तीनशेवर होती. दुष्मनची शेकडो प्रेते इतस्तत: पसरली होती. या हृदयद्रावक देखाव्यानं त्यांची मनं खिन्न झाली होती. इतक्यात थोरातांना टेकडीच्या पूर्वेकडील भागात एक विलोभनीय दृश्य दिसलं.

या हल्ल्यात एअर सपोर्ट देताना एका विमानाने नापाम बाँब फेकला. तो या भागात पडला. तेथील एक-दोन खंदकात दहा जपानी सैनिक होते व या फुटलेल्या बाँबची आग त्यांच्या सभोवती पसरली होती. ते या आगीत होरपळून जळणार हे लक्षात येताच आठ-दहा शीख व डोग्रे जवान आत घुसले व आत सापडलेल्या जखमी आणि जिवंत जपान्यांना बाहेर घेऊन आले. काही क्षणापूर्वी याच जवानांचा शत्रू म्हणून नरडीचा घोट घ्यायला आसुसलेले जवान समरप्रसंग संपताच त्यांचं रक्षण करतात, हे चित्र पाहून थोरातांचं हृदय भरून आलं. डोळे पाणावले. या दृश्याने त्यांच्या मनात कायमचं घर केलं. तबी त्यांच्याजवळच उभा होता. तो म्हणाला–

–"सर थ्री हंड्रेड ऑफ आवर बॉईज शेड देअर ब्लड टूडे. व्हॉट फॉर ?"–

त्याच्या बोलण्यातली खोच ओळखून हसत ते म्हणाले–

–"टूडे इट वॉज फॉर दि ऑनर ऑफ दि बटालियन. वन डे इट मे बी फॉर दि ऑनर ऑफ फ्री इंडिया. बट लेटस गेट ऑन दि जॉब नाऊ, ओल्ड बॉय."–

टेकडीच्या माथ्यावर चौफेर फिरून त्यांनी कंपनी कमांडर्सना तावडतोब मोर्चे खोदण्याचा हुकूम सोडला. क्षणाचीही उसंत दिली नाही. मिळालेला विजय टिकवायचा असेल तर त्वरित मोर्चेबंदी करणं जरूर होतं. अधिकाऱ्यांपासून जवानांपर्यंत सर्वांनी खोदकाम केले पाहिजे, असा सक्त हुकूम त्यांनी सोडला. जीव वाचवण्याचा सद्य:स्थितीत तोच एक मार्ग होता. जवानांच्या पोटात आग पडली होती. पोटभर पाणीसुद्धा मिळाले नव्हते. पण परिस्थिती जाणून सारेजण कामाला लागले. डिफेन्सची पहाणी करत हिंडताना थोरातांनी एका जवानाला फक्त एकाच हाताने खंदक खणताना पाहिले. ते भडकले नि म्हणाले–

–"बेवकूफ, तुम मोर्चा खोद रहे हो या मजाक कर रहे हो. मोर्चा कभी एक हातसे खोदते है ?"–

जवानाने दुसरा हात वर उचलला. तो पहाताच थोरातांचा गळा दाटून आला. तोफेच्या गोळ्याच्या एका तुकड्याने त्याच्या हाताचा चुराडा केला होता.

–"डॉक्टरसाबके पास जाव और बँडेज लगाव"–थोरात बोलले. तो जवान हसत म्हणाला–

" जी साब. लेकिन मेरे हिस्सेकी खोदाई मुझे पहले करने दो. " —

त्याच्या जखमी हाताकडे आणि विजयाने फुललेल्या निरागस बालीश चेहऱ्याकडे पाहून थोरात निघून गेले.

समरांगणावर रक्ताचा सडा पडला होता. ठिकठिकाणी मोर्चातून, हत्यारावर, उघड्यावर दोन्ही बाजूच्या सैनिकांची शेकडो प्रेते पडली होती. त्यांच्याबद्दल दुःख करायलाही सवड नव्हतो. आताची सर्वात महत्त्वाची गरज होती ती पलटणीतल्या उरल्या सुरल्या जवानांना एकत्र करून त्यांची प्लटूनवार पुनर्रचना करण्याची, व्यवस्थित डिफेन्स लावण्याची. खर्च झालेला दारूगोळा काडतुसे, ग्रिनेडस वगैरेंचा त्वरीत पुरवठा करण्याची.

थोरात एकेठिकाणी म्हणतात——

'— पलटणची अपरिमित जीवित हानी झाली होती. माझ्या मनात असंख्य दुःखद विचार आले पण मी ते दूर सारले. माझ्यापुढं प्रचंड कामाचा डोंगर उभा होता. अधिकारी व जवानात त्राण उरलं नव्हतं. विश्रांतीची गरज होती. पण मी त्यांना क्षणाचीही उसंत द्यायला तयार नव्हतो. किंवा त्यांच्या जिवाभावाच्या साथीदारांच्या मरणाचे दुःख व्यक्त करायला सवड देऊ शकत नव्हतो. काही झालं तरी ते गेले आहेत, ही घटना आहे. पण जर आमची बचाव फळी तातडीने तयार झाली नाही, तर उरलेले आम्हीसुद्धा त्याच मार्गाने जाऊ. मन घट्ट करून निष्ठुरपणानं अक्षरशः गुलामासारखं मी त्यांना कामाला जुंपलं आणि शत्रूचा प्रतिहल्ला येण्यापूर्वी बचाव फळी मजबूत केली—'

आणि तो प्रतिहल्ला आलाच. मोर्चे व खंदक खणून तयार होतात न होतात तोच शत्रुच्या तोफखान्याने या टेकडीवर प्रचंड प्रमाणात चौफेर गोळे फेकायला सुरुवात केली आणि याच आच्छादनाखाली जपानी सेना मोठ्या संख्येने चालून आली. तिने निकराने प्रतिहल्ला चढवला. शत्रूला माहीत होतं की या मेलरोज टेकडीवरून पंजाब्यांना हुसकून काढण्याशिवाय त्यांचा दक्षिण बर्मात जाण्याचा मार्ग सुकर होणार नाही. म्हणून ही टेकडी पुन्हा काबीज करण्यासाठी जपानी सैनिकांच्या लाटांमागून लाटा हल्ला चढवू लागल्या. पंजाब पलटण अक्षरशः भितीला पाठ टेकून दात-ओठ चावत लढली. तोफांचे गोळे, मशीनगन, रायफलींचा मारा असताही स्वतःच्या जीवाची पर्वा न करता प्रत्येक सेक्शन पोस्टवर जातीने जाऊन थोरात सांगत होते——

—" आत्ताची झुंज ही शेवटचा जवान आणि शेवटची गोळी मारेपर्यंत लढायची आहे. या टेकडीवरच जगायचं किंवा मरायचं "—

पलटणची संख्या खूपच घटली होती. लढणाऱ्या जवानांना दारूगोळ्याच्या पेट्या स्वतः थोरात, सुबेदार मेजर लछमनसिंग, तबी कुरेशी व नंदराम नेऊन देत होते. दिलेर, जिवाला जीव देणाऱ्या बहाद्दर जवानांनी पराक्रमाची शर्थ केली.

निकराने लढून जपान्यांचा हल्ला परतवून लावला. शत्रूच्या प्रेतांचा खच पडला. रक्तबंबाळ होऊन तो परतला. पण त्या सबंध रात्रींत त्याने चिडलेल्या वाघाप्रमाणे एका पाठोपाठ एक असे सहा हल्ले चढवले. पण जवानांनी निकराने सारे परतवून लावले. घायाळ झालेला दुष्मन आपल्या जखमा चाटत दुसऱ्या दिवशी माघारी गेला. पुन्हा त्यानं या पंजाब्यांच्या पहाडीकडं वळून पाहिलं नाही.

या धुमश्चक्रीत भारतीय ब्रिगेडचे एक हजार जवान कामी आले. दुष्मनची २००० प्रेते मोजली गेली. थोरातांच्या पंजाब बटालियनचं व या ब्रिगेडचं नाव आराकान आघाडीवर दुमदुमलं.

२१ ते २९ जानेवारी या नऊ दिवसांच्या काळात थोरातांना फक्त सहा तास झोप मिळाली. या लढाईत त्यांनी दाखवलेले शौर्य, खंबीरपणा, उद्देशाला चिकटून रहाण्याची जिद्द, स्वतःच्या जीविताविषयीची बेफिकीरी, दुर्दम्य आशावाद, ओसंडून जाणारा उत्साह आणि बेछुट बृत्ती हे गूण प्रकर्षाने दिसून आले. त्यांनी निकराने लढून मेलरोज टेकडी जिंकली व टिकवून धरून दुश्मनला नामोहरम केले. या भरघोस यशाबद्दल व वैयक्तिक पराक्रम गाजवल्याबद्दल समरांगणावरच लग्नाच्या ९ व्या वाढदिवशी त्यांना डी. एस. ओ. (डिस्टिंगवीश सर्व्हिस ऑर्डर) हे सध्याच्या महावीर चक्राच्या तोडीचे बहुमानाचे पदक बहाल करण्यात आले. योगायोग असा की याच दिवशी भारतात, कॅप्टन मिसेस लीला थोरात यांना त्यांच्या उत्कृष्ट सेवेबद्दल "कैसरे हिंद" पदक बहाल करण्यात आले.

या संग्रामात वैयक्तिक पराक्रम गाजवलेल्यांची संख्या बरीच मोठी आहे. एक व्ही. सी. ५ डी. एस. ओ. ज आणि ८० इतर वीर पदके जवानांनी मिळवली. कर्नल थिमय्या व कर्नल सेन यांनाही वैयक्तिक पराक्रम व कुशल नेतृत्वाबद्दल डी. एस. ओ. पदके बहाल करण्यात आली.

सुप्रीम कमांडर ॲडमिरल लॉर्ड माऊंट बॅटन यांनी या समराचे वर्णन—"दि ब्लडीयेस्ट बॅटल ऑफ आराकान" असे केले आहे. अशी ही अद्वितीय लढाई होऊन गेली. जिचे, थोरात एक मानकरी आहेत.

कांगॉवच्या लढाईनंतर काही दिवसांनी हिंदुस्तानी सेनेचे सरसेनापति फिल्ड-मार्शल सर ऑकिनलेक लाहोरच्या मिलिटरी हॉस्पिटलला भेट देण्यासाठी गेले असता त्यांची तेथे काम करत असलेल्या कॅप्टन मिसेस थोरातांशी ओळख करून देण्यात आली. ते म्हणाले—

"मिसेस थोरात ? व्हॉटस युवर हजबंड डुईंग ? त्या सावकाश, हळू आवाजात बोलल्या—

"ही इज कमांडिंग सेकंड, सेकंड पंजाब इन आराकान, सर."

—"गुड ग्रेशस"—ऑकिनलेक म्हणाले, "यू मीन दॅट थोरात ? ही हॅज डन ए रियल फाइन पीस ऑफ वर्क. आय ॲम प्राऊड ऑफ हिम अँड सो शुड यू बी."

□ □ □

## सामान्य जन.... पृष्ठ ५ वरून

यावर आणखी काय प्रश्न विचारणार ? डोकं सुन्न झालं होतं. त्याच्या हातावर रुपाया टेकवून मी त्याचा निरोप घेतला. ◻

# शांताराम जाधव

त्या कोपऱ्यावरील चांभाराशी सुसंवाद साधायला पाहिजे म्हणून एक तुटकं चप्पल उगीचच शिवायला घेऊन गेलो.

त्याने ते चप्पल शिवून दिले. त्याने सांगितलेले पैसे हातावर टेकवले.

पैसे हातावर पडताच तो म्हणाला, 'चप्पल खूपच जुनी झाली आहे. आता ते टाकूनच द्या.

' अरे पावसाळ्यात वापरायची व मग टाकूनच द्यायची जाता जाता मी म्हटले, एका बुटाला सोल मारायचा आहे उद्या घेऊन येतो.

दुसऱ्या दिवशी बूट घेऊन गेलो. शांत्या जाधव त्याचे काम करीत होता. मी त्याच्या नकळत माझे प्रश्न त्याच्या पुढे टाकीत होतो. हो सांगायचे राहिलेच की, त्याचे नाव शांताराम जाधव. पण सर्व जण त्याला शांत्या म्हणतात. त्याचा पोरगाही त्याला अरेतुरेच म्हणतो. म्हणजे ती त्यांच्या घरातील व जमातीतील पद्धतच आहे.

मी पहिलाच प्रश्न विचारला–पैसे बरे मिळतात का या धंद्यात ?

कुठले आलेत चांगले पैसे. विडीकाडी सिनेमावर भरमसाठ खर्च करणारे लोक चप्पल दुरुस्तीसाठी येतात आणि १५ ते २० पैसे द्यायलाही घासाघीस करतात. एवढेच नाही तर सांगितलेल्या पैशा पेक्षा पाच एक पैसे कमीच देऊन जातात. उजाडल्यापासून काळोख पडून दिसेनासे होईपर्यंत मान मोडेपर्यंत काम करावे तेव्हा कुठे भाकरीचा तुकडा तोंडात पडतो. काकुळतीला येऊन लोकांना सांगितले तरी लोक पैसे कमीच देऊन जातात. चांगले मिळविणाऱ्या माणसाने पाच दहा पैशांसाठी असे का करावे ? शांत्या त्याची तळमळ सांगत होता.

महागाई फक्त लोकांसाठी आहे. आमच्यासाठी महागाई झाली नाही काय ? शांत्यानेच मला प्रश्न विचारला.

तुझ्या व्यवसायातही भाववाढीचा फरक कितपत बसला आहे रे–मी

खिळे महाग झाले आहेत. वस्तूंचे भाव वाढले आहेत. पण गेल्या वर्षी तू दहा पैशात चप्पल लावून दिले होतेस आता पंधरा पैसे मागतोस काय, असे लोक

म्हणतात. मग आम्ही जगायचे कसे ?

साफ झिजलेला बुटाचा तळ लावून घ्यायला लोक यतात आणि कमीत कमी आठएक आणे तरी कमी देऊन जातात अशा वेळी जीव तळमळतो. पण सांगायचे कोणाला ? रडून ओरडून सांगावे असे वाटते चांभाराला काय पोट नाही ?

आपलं सरकार महागाई रोखते आहे असे वाटते का ? मी प्रश्न विचारला.

कसली रोखणार महागाई हे सरकार ?

राहायला चागलं घर आहे का ? मी पुढील प्रश्न केला.

महालक्ष्मीजवळच्या झोपडीत मी राहतो. आमची झोपडपट्टी कोण सुधारणार ? कधी सुधारणार ?चांगल्या घरात रहावंसं वाटतं पण कोण देणार हे घर ? आमच्या झोपडपट्टीत संडासची वा पाण्याची सोय नाही. लांबून पाणी आणतो आम्ही. संडास नाही म्हणून बसतो उघड्यावर. आमच्या बाईमाणसालाही आता लाज वाटत नाही याची. करणार काय ?

पण आपल्या सरकारने गरिबांसाठी बरंच काही केलं आहे की ! मागासलेले वर्ग व आर्थिक दृष्टचा मागासलेल्या जाती जमातीच्या मुलांना बऱ्याच सवलती मिळतात. शाळेत फी माफ मिळते. शिक्षण मिळते. तुमची मुले शाळेत जातात का ? मी जरा मायबाप सरकारची तरफदारी केली.

त्यावर शांत्याने शांतपणे उत्तर दिले. पोरं जात होती शाळेत पण गरिबांची पोरं शाळेत जाऊन काय करणार आणि भागणार कसं ? दोन पोरं शाळेत जात होती. त्यांना काढलं शाळेतून आणि लावलं कामाला. हे पोर मला येथे मदत करतं. पोरच ते. खेळाकडं लक्ष असतं पण काम शिकतं आहे माझ्याकडे. मदत करतं मला.

मोफत शिक्षणाची सोय असूनही शांत्याची मुलं शाळेत जाऊ शकत नाहीत कारण अतीव दारिद्र्य. शांत्याचा बापही चांभार काम करीत होता. शांत्या तेच करतो आहे. सारखे खाली वाकून काम करायला लागते म्हणून त्याच्या पाठीला बाकही आला आहे. त्याच्या मागोमाग त्याचं पोरगंही हाच व्यवसाय करणार. काम करता करता शांत्याने मागवलेला चहा आला होता. त्याच घाण हाताने त्याने चहा घेतला आणि मग तंबाखू मळली. ◻

# गणपत सावंत !

हप्ते घेणारा प्राणी म्हणजे पोलिस असं समीकरणच झालं आहे. सरकारी वा खाजगी क्षेत्रातील एवढेच नव्हे तर पोलिस खात्यातील बड्या साहेबाने मोठा हप्ता घेतला तरी त्याकडे थोडाफार कानाडोळा करण्याची सर्वसाधारण प्रवृती

असते, पण एखादा रुपाया वा दोन रुपये घेणारा तो हवालदार उर्फ ' सखाराम ' प्रत्येकाच्या डोळ्यात सलतो. त्याने पैसा खावा याचे हे समर्थन नाही पण पोलीस लाईनीतील त्याची रुम पाहिली की त्यांच्या राहाणीमानाची किव येते.

बऱ्याच पोलिसांना गाठले पण कोणीही काहीही बोलायला तयार होईना ! शेवटी एक हवालदार बोलायला तयार झाला. बोलला, पण ' साहेब नाव छापू नका ' असे म्हणाला तेव्हा त्याला गणपत सावंत या नावाने संबोधू या !

मी प्रथमच सावंतांना विचारले–स्वतंत्र भारतात संप वगैरे करण्याची तुम्हाला मुभा नाही यामुळे तुम्ही तुमची दुःखे वेशीवर टांगू शकत नाही. तर याबद्दल काय वाटते ?

सावंत : डोळे आहेत, पाहू शकतो. कान आहेत, ऐकू शकतो पण तोंड असूनही बोलू शकत नाही. ही आमची अवस्था. पायापासून ते डोक्यापर्यंत आम्हाला बांधून ठेवण्यात आले आहे. कसं टांगायचं आपलं दुःख वेशीवर ? आता एक पोलिस मित्र-मंडळ निघाले आहे. ते लोक काहीतरी खटपट करतात. पण सरकारनेच काहीतरी करायला पाहिजे. आम्ही २४ तास बांधलेले. डयूटीची वेळ केव्हाही व कितीही वेळ असते. काही वेळा डयूटी संपली तरी काम करावे लागते. हा सारा तोंड दाबून बुक्क्याचा मार आहे.

हे पहा सावंत, मी म्हणालो, पोलिस हप्ता घेतात असे लोक बोलतात त्याबद्दल काय वाटते. कमी मिळणाऱ्या पगारामुळे पोलिस हप्ता घेतात, की ती एक प्रवृती झाली आहे म्हणून ?

सर्वांनाच हप्ता मिळतो हा चुकीचा समज आहे. फारच थोडया पोलिसांना हप्ता खाण्याची संधी मिळते आणि संधी मिळाली तरी सगळेच हप्ता खातात असे तरी का समजता ? अनेक चांगले लोकही आमच्या खात्यात आहेतच की, पण थोडया हप्ता खाणाऱ्या लोकांमुळे सर्वांनाच दोष लागतो. आमचे बडे बडे साहेब लोक हप्ता खात नाहीत का ? पण लोक बोट दाखवतात निळया कपडयातील पोलिसांकडे. पगार हे एक त्याचे कारण आहे. लोक आमची चेष्टा करतात. सखाराम काय म्हणतात. कावळा काय म्हणतात. मानाने जगावे असं आम्हांला नाही का वाटत ?

तुमच्या कामाबद्दल काय वाटते. रक्षक वगैरे असल्याचा अभिमान वाटतो का ?

आमची एकूण अवस्थाच इतकी विकट आहे, की अभिमान वगैरे वाटण्यासारख काही राहिलेच नाही. धड कौटुंबिक जीवनही नाही. खास कामगिरीबद्दल गौरव झाला, मेडल मिळाले तरच अभिमानाचा एखादा दिवस उजाडल्यासारखे वाटेल.

तुम्ही पोलिस लाईनीत रहाता का ? जागा कशी काय आहे ? –मी

होय. पोलिस लायनीत राहतो. तुम्ही पोलिस लायनीतील जागा पाहिली आहे का ? आता पोलिस लाईनीतील जागेचे वर्णन काय करायचे ? काही ठिकाणी तर अजून विजेचे दिवे नाहीत. मुंबईत रात्री जाहिरातीसाठी दिव्यांची आरास असते. उधळपट्टी असते पण आमच्यातील काही लोक अजून अंधारातच आहेत. कायदा राखणाऱ्या

# ‘प्रभावी विचार भौतिक संस्थाना स्वरूप देतो’*

कधीकधी एखादा प्रभावी विचार अनेक सामान्य विचारांमधून उठून दिसतो आणि राष्ट्राच्या विचारप्रणालीत, किंबहुना एकंदर जीवनपद्धतीत, परिवर्तन घडवून आणतो.

अशाच प्रभावी विचारांपैकी एक म्हणजे बँकिंग व्यवहाराचे उद्दिष्ट केवळ नफा वाढविणे हे न ठेवता अधिकाधिक जनतेला सहाय्य देऊन पर्यायाने देशाची भरभराट घडवून आणावी हा होय. हेच उद्दिष्ट गाठण्यासाठी स्टेट बँक प्रयत्नशील आहे.

स्टेट बँक आपल्या देशातील कानाकोपऱ्यात बँकिंगची सोय उपलब्ध करून देत आहे, सामान्य माणसाला आर्थिक मदत देऊन त्याला स्वतःचा विकास घडवून आणण्याची संधी देत आहे, शेती व उद्योगाना सहाय्य आणि निर्यातीला चालना देत आहे. थोडक्यात, राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा पाया भक्कम करण्यासाठी स्टेट बँक सक्रिय हातभार लावीत आहे.

आपल्या स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सवाच्या या मंगल प्रसंगी आपली सामाजिक व आर्थिक उद्दिष्टे गाठण्याच्या दिशेने वाटचाल करून स्वातंत्र्याला खराखुरा अर्थ प्राप्त करून देण्यासाठी सतत झटण्याच्या आकांक्षेचा स्टेट बँक पुनरुच्चार करीत आहे.

• हे अवतरण श्री अरविंद यांचे असून त्यांची जन्मशताब्दी आपल्या स्वातंत्र्याच्या २५व्या वर्धापनदिनीच येत आहे. या प्रसंगी या द्रष्ट्या क्रांतिकारकास स्टेट बँक अभिवादन करीत आहे.

स्टेट बँक

AIYARS-S

सेवकाची मुंबई शहरात ही अवस्था आहे.

पोलिस हा लोकांचा मित्र आहे या भावनेने लोक तुमच्याकडे पाहत नाहीत तेव्हा हे सारे बदलले पाहिजे असे नाही वाटत ? याबद्दल दोन्ही बाजूने काय करता येईल ?

लोकांची आंदोलने, मोर्चे फोडणारा म्हणजे पोलिस असा लोकांचा समज. हे काम आम्ही काय मुद्दाम करतो ? पोट कोणाला चुकले आहे ? त्यासाठी हे सारं काम करावं लागतं ना. ? लोकांनी आम्हांला समजून घेतले तर बरे होईल असे वाटते.

तुमची अवस्था सुधारण्यासाठी सरकारने काय करावे असे वाटते ? –मी

सरकारबद्दलचा असा प्रश्न विचारू नका. पंचाईत होईल.

अर्थातच या उत्तराबरोबरच मुलाखतही संपवायला हरकत नव्हती. सावंतांचे आभार मानले तेव्हा हात जोडून त्यांनी नाव न छापण्याची पुन्हा विनंती केली. ☐

---

# कांबळी

खाकी कपड्यामधील पोस्टमनची आपण सर्वच आतुरतेने वाट पाहतो. त्याची म्हणजे येणाऱ्या पत्राची आपण वाट पहात असतो. पोस्टमन श्री. कांबळी यांना यासंबंधी प्रश्न विचारला असता ते म्हणाले, 'की लोक आमची कशाला वाट पहातील ! लोकांच्या दृष्टीने आम्ही खाकी कपड्यातील एक 'ठोकळा'च. पत्र मिळाले की काम झाले. अनेक ठिकाणी साधी माणुसकीही दाखवली जात नाही.'

हो बरी आठवण झाली या तुमच्या 'माणुसकीवरून'. फोर्ट किंवा श्रीमंत वस्त्यातील काही ठिकाणी उंच उंच इमारतीतील लिफ्ट पोष्टमनने वापरण्यावर मज्जाव आहे. या अपमानास्पद वागणुकीबद्दल काय वाटते ? याविरुद्ध कधी लढा दिला आहे काय संघटीतपणे—मी श्री. कांबळींना म्हणालो.

खरं म्हणजे या अपमानास्पद वागणुकीबद्दल पोष्ट खात्यानेच काहीतरी केले पाहिजे, पण आमचे अधिकारी अजून सुखात आहेत. आमच्या संघटनेनेही याबाबत अजून संघटीतपणे काही केलेले नाही. माणूस म्हणून साधी चांगली वागणूकही नाही. उन्हातान्हातून पावसातून पायपीट करायची. एकेका पत्रासाठी चार-चार पाच-पाच मजले चढून जायचे आणि वर माणुसकीचा अभाव असलेली वागणूक–हे तशी वागणूक देणाऱ्यांनाच लांच्छनास्पद आहे की –श्री. कांबळी

कांबळी तुमचं शिक्षण किती झालं आहे ?

इंटर आर्टस् पास झालो आहे मी.

मग यात कशासाठी खितपत पडला आहात ?

पोस्टमनची नोकरी. रात्रीच्या शाळेत जाऊन शिक्षण घेतले. मग कसंतरी करून इंटरपर्यंत शिकलो. वाटलं पोस्ट खात्यातच कारकुनी मिळेल. वाढत्या वयाच्या माणसाला, तेही अनेक पदवीधर उपलब्ध असताना बाहेर चांगली नोकरी कोण देणार ? म्हणून मग इथेच रखडत पडलो. या शिक्षणाला काय अर्थ आहे का ?

मग इथेच प्रमोशन वगैरे मिळणार नाही का ? मी.

होय मिळेल. पण वेळ लागेल. काही वर्षात मी कारकून होईन. तोपर्यंत पोस्टमनच राहाणार.

पगार वगैरे बरा आहे का? घरी किती मंडळी आहेत ?

पुरा दोनशेही पगार मिळत नाही. दरवर्षी पगारवाढ किती मिळते ? माहिती आहे का ? पुरा एक रुपया ! यावर चार-पाच माणसांचे कुटुंब कसे काय भागवणार ? पे कमिशन बसून तीन एक वर्षे झाली. अजून निकाल आलेला नाही. बरं मागण्यांसाठी संप करावा तर अत्यावश्यक सेवा कायद्यानुसार संप करण्यासही बंदी आहे. पोस्टमनचे पगार कमी असल्यामुळेच एखाद्या वेळी एखाद्याला मनिऑर्डरचे पैसे खाण्याचा मोह होतो किंवा एखाद्या टोळीच्या जाळ्यात सापडलेला असा एखादा माणूस चेक लांबवण्याच्या मागे लागतो.—

तुमचा गणवेश धुलाईचा खर्च पोस्टखाते देते का ?—मी.

छे हो. म्हणून तर मळका गणवेश घालून हिंडावे लागते. अनेक दिवस आमचा गणवेश धुतला जात नाही कारण तो सारखा सारखा धुणे आम्हांला परवडणारे नाही.

स्वातंत्र्योत्तर काळात सामान्य माणसाची परिस्थिती सुधारली का ? वाढत्या महागाईबद्दल काय वाटते ?—मी.

परिस्थिती सुधारलेली नसून विकट होत चालली आहे. महागाई तर भडकते आहे. सामान्य माणसाने जगायचे कसे ? सरकारी नोकरीपेक्षा खाजगी नोकरी परवडली. निदान पगार तरी बरे असतात. आमच्या कारकुनाला जेवढा पगार मिळतो तेवढा खाजगी नोकरीतील शिपाई घेतो. शिवाय त्याला वॉशिंग अलाउन्सही मिळतो. दिवसेंदिवस जगणेच मुष्किल होत चालले आहे. ¤

# जगजीतसिंग !

हा एक तरुण शिख. एम्. ए. झाला आहे, पण नशिबी मात्र टॅक्सीचे व्हीलच आहे. मराठी आणि गुजराती भाषा इतक्या सफाईदारपणे बोलतो, की तो सरदारजी असावा यावर विश्वास बसत नाही. त्याच्या एम्. ए. च्या डिग्रीपुढे त्याने टी. डी.

(म्हणजे टॅक्सी ड्रायव्हर) अशी एक उपाधी लावली आहे.

सिंग, आपण टॅक्सी केव्हापासून चालविता ?

१९६५ पासून टॅक्सी ड्रायव्हर म्हणून काम करतो आहे. शिक्षणाचा खर्च भागेना पण शिकण्याची जबरदस्त इच्छा होती. टॅक्सी चालवून गुजराण करणे हा घरातील परंपरागत व्यवसाय. त्यापासून मी दूर जावे ही साऱ्यांची इच्छा. शेवटी या व्यवसायापासून दूर जाण्याकरिता याच व्यवसायाची मदत घ्यायचे ठरविले. विल्सन कॉलेजात शिकत होतो आणि फावल्या वेळी टॅक्सी चालवून पैसे मिळवीत होतो. बी. ए. झालो. एम्. ए. ला ॲडमिशन घेतली आणि त्याच वेळी बी. इ. एस्. टी.त कारकुनाची नोकरी मिळाली. पण जानेवारी ७२ मध्ये ऑटोमेशनमुळे बेस्टने १५० लोकांना कमी केले. त्यात माझाही नंबर लागला. पुन्हा टॅक्सी ड्रायव्हर बनलो आहे.

बेस्टचा काय न्याय पहा. २४ व्या वर्षी नोकरी दिली, २६ व्या वर्षी बेकार केले. आता या वयात नोकरी कोण देणार ? बेस्टला २५ वर्षे पूर्ण झाली म्हणून लक्षावधी रुपये खर्च करून समारंभ केले जाणार आहेत. पण आम्हा १५० लोकांना परत सामावून घेऊन आमच्या जीवनात रोषणाई करण्याचा विचारही बेस्ट अधिकाऱ्यांच्या मनात येत नाही. याला गरिबी हटावो म्हणायचे, की गरीबको हटावो म्हणायचे ? घरचे लोक आता म्हणतात, एम्. ए. होऊन टॅक्सीच चालवायची होती तर कशाला झालास एम्. ए. ?

पण काय हो जगजीतसिंग, याचा अर्थ स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षण हे स्वातंत्र्यपूर्वकाळाइतकेच अर्थशून्य आहे असाच का ?

इंग्रजांनी आम्हाला बाबू बनविणारे शिक्षण दिले. तेच आजही मिळते आहे. गाईडे वाचा, परीक्षा पास व्हा. आमच्या सरकारने बदलत्या काळानुसार शिक्षणात फेरफार केलेले नाहीत.

असे आहे तर मग राष्ट्रीयकृत बँकेकडून कर्ज घेऊन एखादी टॅक्सीच का नाही विकत घेत ? –मी



स्वातंत्र्य मिळून २५ वर्षे झाली, पंचवीस योजना आखल्या गेल्या. पण त्याचे फायदे सामान्य माणसाला मिळालेच कुठे ? गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी वाढतच राहिली. गरीब हा गरीबच राहिला. समाजवादी समाजरचना हे ध्येय ठरविले गेले. पण समाजवाद आहेच कुठे. गरिबी हटावोच्या घोषणा झाल्या पण गेल्या २५ वर्षांत यात काही सुधारणा झाल्या नाहीत. नाहीतर नक्षलवाद आलाच नसता. बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले पण त्याचा फायदा ठराविक लोकांनाच मिळतो. वशिल्याशिवाय राष्ट्रीयकृत बँकांतूनही कर्ज मिळत नाही, तेव्हा असे कर्ज घेऊन टॅक्सी विकत घ्यायची इच्छा नाही.

तुमच्या टॅक्सी ड्रायव्हर्सची अवस्था कशी आहे ? तुम्ही लोक लोकांशी योग्य प्रकारे वागत नाही त्याचे काय ?

टॅक्सी ड्रायव्हर्सची अवस्था चांगली नाही आणि वागण्याबद्दल म्हणाल तर टॅक्सी ड्रायव्हरही सामान्य माणूसच आहे. तो समाजाचाच घटक आहे. तोही प्रामाणिकपणे वागू इच्छितो, पण व्यवसायात येऊन समाजाचे धक्के खाल्ले, की मग चांगला माणूसही बदलतो. दूरदूरच्या ठिकाणी टॅक्सी नेऊन गुंड आम्हाला लुबाडतात. जीव हा प्रत्येकालाच प्यारा असतो, म्हणूनच मग रात्री अपरात्री दूरच्या ठिकाणी यायला टॅक्सी ड्रायव्हर नाराज असतो आणि असे केले, की टॅक्सीवाला वाईट ठरतो. लोक काय आम्हाला कमी लुबाडतात ? पंधरा दिवसांपूर्वी 'लारसन अॅन्ड टोब्रो' कंपनीत काम करणाऱ्या एका 'चांगल्या' माणसाने मला ४९ रु. ५० पैशाला गंडवले. कंपनी व पोलिसात तक्रार देऊनही अजून काहीही झालेले नाही. तर दोन दिवसांपूर्वी अल्टा मांऊंट रोडवर या पॉश वस्तीतील गिरिराज या बिल्डिंगमध्ये गेलेल्या एका श्रीमंत माणसाने क्षुल्लक अशा १ रु. २० पैशांना गंडविले. यामुळे ड्रायव्हरच्या प्रवृत्तीत बदल झाला तर दोष कुणाचा. काही ड्रायव्हर्स वाईट आहेत, पण चांगलेही खूप आहेत. लोक हजारो रुपये वा मूल्यवान वस्तू टॅक्सीत विसरून जातात, पण त्याही प्रामाणिकपणे परत करणारेही टॅक्सी ड्रायव्हर्स आहेतच की ! स्वातंत्र्योत्तर काळात लाचलुचपत सर्वच ठिकाणी वाढली आहे. टॅक्सी ड्रायव्हरही काही प्रमाणात त्याचा शिकार बनला आहे हे खरे, पण चांगलेही बरेच आहेत. लोकांनी आम्हाला समजावून घ्यावे.

□ ❘ □

---

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही.
ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

---

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS WEEKLY One Rupee Regd. No. MH 649

# फिडेल चे आणि क्रांती

प्रकाशित होत आहे

राजहंस प्रकाशन पुणे